सोलापूर तरुण भारत
आसमंत



# मैं झुकेगा नही...!

विशेष

**प्रशांत माने, मुख्य संपादक**
भ्र.९८८११९१४४३

**भारतद्वेषी राहिलेल्या नतदृष्ट्या पाकड्यांनी कायमच भारतविरोधी दहशतवादी कृत्यांना खतपाणी घातले. पहलगामच्या हल्ल्यानंतर मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला धडकी भरेल आणि जगाला इशारा जाईल, असा हल्ला करत बदलत्या भारताचे सामर्थ दाखविले. गळीतगात्र पाकिस्तानने शरणागती पत्करल्यानंतरच भारताने ऑपरेशन सिंदूर तात्पुरते स्थगित केले. मात्र, 'नोबेल'च्या प्रेमात पडलेले अमेरिकेचे राष्टाध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे युध्द आपण थांबविल्याचे स्व-घोषित केले. मात्र, बाणेदार पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते ठामपणे नाकाल्याने दुखावलेल्या ट्रम्प यांनी वेगळी कारणे देत मोठ्या प्रमाणात भारतावर टेरिफ लादले. तेव्हा धुरंधर मोदींनी मैं झुकेगा नही...! चा निश्चय करत जगभरातील नेत्यांशी ठेवलेला सलोखा, केलेले करार आणि त्याचे भविष्यकालीन परिणाम ओळखुन अमेरिकेचे बनिया राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील टेरिफ कमी केले हा भारताच्या राष्ट्रहिताचा विजयच आहे.**

भारताने वारंवार सूचित करूनही न सुधारणाऱ्या पाकड्यांनी भारतविरोधी दहशतवादी कृत्यांना खतपाणी घालण्याचे अविरतपणे सुरुच ठेवले आहे. पाकड्यांनी पहलगाम येथे दहशतवादी हल्ला करीत निष्पाप हिंदूंचा जात विचारून नाहक बळी घेतला. निष्पाप माता- भगिनींचे कुंकु पुसणाऱ्या पाकड्यांना धडा शिकविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूर मोहिम फत्ते करत पाकड्यांना धडा तर शिकवलाच पण हल्ला करताना तेथील एकाही निष्पापाचा बळी जाणार नाही याची दक्षता घेतली. भारतविरोधी दहशतवादी कृत्यांना खतपाणी घालण्याचे पाकड्यांनी बंद नाही केले तर अवघ्या काही तासात जगाच्या नकाशावरून पाकिस्तानाचे नामोनिशान पुसून टाकू, असा संदेश दिला. घाबरलेल्या पाकिस्तानने शरणागती पत्करल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित केली. मात्र नोबेलच्या प्रेमापोटी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण मध्यस्थी करून हे युध्द थांबविल्याचे स्व-घोषित केले. परंतू भारताने जगासमोर स्पष्ट केले की, भारत-पाक युध्दजन्यस्थिती ही पाकिस्तानकडून शरणागती पत्करल्यानंतर युध्दस्थगिती दिली. यामध्ये जगातील कोणत्याही देशाने मध्यस्थी केलेली नाही. त्यामुळे दुखावलेल्या ट्रम्प यांनी भारतावर मोठ्या प्रमाणात टेरिफ लादले आणि याला कारण दिले ते असे की, भारत रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याने युक्रेन विरोधात लढण्यासाठी रशियाला मदत होत आहे. परंतू ट्रम्प यांचे अनेक फंडे धुडकावत भारताने कोणापुढेही झुकणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले. 'भारत कधीही आपल्या शेतकऱ्यांच्या, पशुपालकांच्या हिताची तडजोड करणार नाही. वैयक्तिकरित्या, मला मोठी किंमत मोजावी लागेल, पण मी त्यासाठी तयार आहे.' असे घोषित करत विश्वगुरु नरेंद्र मोदी यांनी भारताची विकासाची वाटचाल आता कोणीही रोखू शकणार नसल्याचा संदेश जगाला दिला. मोदींच्या या मुत्सदिगीरीचे जगात कौतुक तर झालेच पण अखेर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना भारतावर लादलेले टेरिफ कमी करावे लागले. इतकेच काय भारताच्या अटी मान्य करीत अमेरिकेने भारताबरोबरच्या व्यापार करारालादेखील मंजूरी दिली.

अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क कमी करतानाच, दीर्घकाळ प्रलंबित असणाऱ्या व्यापार करारालाही चालना दिली आहे. युरोपीय महासंघाने केलेल्या ऐतिहासिक करारानंतर लगेचच अमेरिकेला ही उपरती झाली आहे, हे लक्षात घेण्याजोगे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या अनिश्चिततेच्या काळात भारत- अमेरिका होत असलेला व्यापार करार आजच्या बहुध्रुवीय जगात भारताच्या स्वायत्ततेची आणि दीर्घकालीन रणनीतीचे उदाहरण ठरला आहे. अमेरिकेचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत आहे. भारत ही निव्वळ बाजारपेठ नाही; तर तो चीननंतरचा पर्याय, जागतिक पुरवठा साखळीतील विश्वासार्ह दुवा आणि आशिया-प्रशांत क्षेत्रातील सामरिक भागीदार आहे. त्यामुळे व्यापार करारात राजकीय अपेक्षाही गुंतलेल्या आहेत. भारत-अमेरिका व्यापार कराराचा खरा अर्थ आकड्यांपलीकडे आहे. भारताने अतिशय ठामपणाने या करारामध्ये वाटाघाटी केल्या, परराष्ट्र धोरणातील स्वातंत्र्य आणि आर्थिक सार्वभौमत्वाला कमजोर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजनैतिक दबावाला न जुमानता राष्ट्रहिताची ठाम भूमिका घेतली. त्यामुळे हा करार भारताच्या वाढत्या आत्मविश्वासाचा, त्याच वेळी जागतिक दबावांना सामोरे जाण्याच्या वास्तवाचा आरसा आहे.

'संपूर्ण जग विश्वगुरुंचा लोहा मान्य करीत असताना आपले पप्पू मात्र पप्पूगिरी करण्यापासून बाज येत नाहीत, ही शोकांतिका आहे. एकूणच या घटनेची जागतिक पातळीवरील पार्श्वभूमी पाहता ती अशी की, डोनाल्ड ट्रम्प यांनी ५ सप्टेंबर रोजी सोशल मीडिया साइट 'ट्रुथ'वर लिहिले, 'असे दिसते आहे की आपण भारत आणि रशियाला चीनकडून गमावले आहे. त्यांचे भविष्य चांगले होईल अशी आशा आहे.' बाराच तासांनंतर, संध्याकाळी ६ वाजता, व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेदरम्यान, ट्रम्प पत्रकारांशी बोलले आणि म्हणाले, मी नेहमीच मोदींचा मित्र राहीन. ते एक महान पंतप्रधान आहेत. मी भारताशी संबंध पुनर्संचयित करण्यासाठी नेहमीच तयार आहे. तथापि, मी निराश आहे की भारत रशियन तेल खरेदी करत आहे आणि मी ५०% शुल्क (टेरीफ) लादून त्यांना हे सांगितले आहे. तर मित्र असल्याबद्दल ट्रम्प यांच्या विधानावर, पंतप्रधान मोदींनी ६ ऑगस्ट रोजी 'द' वर लिहिले, 'मी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या भावनांचे आणि आमच्या संबंधांबद्दलच्या त्यांच्या मतांचे मनापासून कौतुक करतो आणि त्यांचे पूर्ण समर्थनही करतो. भारत आणि अमेरिका यांच्यात सकारात्मक, दूरदर्शी आणि जागतिक राजनैतिक भागीदारी आहे.' दोन्ही नेत्यांच्या या विधानांनंतर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचे विधान आले. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी अमेरिकेच्या भागीदारीला खूप महत्त्व देतात. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याबद्दल बोलायचे झाले तर, पंतप्रधान मोदींचे ट्रम्पशी नेहमीच चांगले संबंध राहिले आहेत. तथापि, ४ सप्टेंबर रोजी ट्रम्प यांच्या टिप्पण्यांपूर्वी, अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन म्हणाले होते की ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील पूर्वीची खास मैत्री आता संपली आहे. दोन्ही देशांमधील जुने संबंध आता बिघडले आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. ट्रम्प यांना अमेरिकन जीएम पिके आणि मांसाहारी गायींचे दूध भारताला विकायचे होते, परंतु भारत त्याला कडाडून विरोध करत होता. त्यामुळे, अनेक फेऱ्यांच्या चर्चे नंतरही दोन्ही देशांमध्ये व्यापार करार होऊ शकला नाही. ऑपरेशन व्हर्मिलियन नंतर, ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान दरम्यान अनेक वेळा युद्धबंदीचा दावा केला होता, परंतु भारताने तो नाकारला होता. अमेरिकन मीडिया 'ब्लूमबर्ग' च्या वृत्तानुसार, युद्धबंदीनंतर, पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात पस्तीस मिनिटे बैठक झाली. त्यात तणावपूर्ण चर्चा झाली, ज्यामध्ये पंतप्रधान मोदींनी स्पष्टपणे सांगितले की ते पाकिस्तान आणि काश्मीरच्या मुद्द्यावर सहमत होणार नाहीत. कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थांना स्वीकारले जाणार नाही. परराष्ट्र व्यवहारातील तज्ज्ञ जेएनयूचे प्राध्यापक यावर म्हणाले, 'ट्रम्प यांना भारताचा हा दृष्टिकोन आवडला. नाही, आणि भारतावर राजनैतिक दबाव आणण्यासाठी ट्रम्प यांनी शुल्क जाहीर केले.'अमेरिकेचा भारतावर २५% कर ७ ऑगस्टपासून लागू झाला. यापूर्वी ६ ऑगस्ट २५ रोजी ट्रम्प यांनी भारतावर २५% अतिरिक्त कर जाहीर केला होता, जो २७ ऑगस्टपासून लागू झाला. ट्रम्पच्या कार्यकारी आदेशात म्हटले आहे की, 'भारत रशियाकडून तेल आयात करणे थांबवेल.' तर रेडहेड म्हणाले. अशा परिस्थितीत, अमेरिकेत प्रवेश करणाऱ्या भारतीय वस्तूंवर २५% अतिरिक्त दंड कर लागू होईल. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनच्या स्ट्रॅटेजिक स्टडीज प्रोग्रामकडहूनही असे स्पष्ट करण्यात आले की, 'प्रतिशोधात्मक शुल्क लादण्याऐवजी, भारताने संवादाचा पर्याय निवडला आणि अमेरिकेला शुल्क कमी करण्यास सांगितले, परंतु ट्रम्प यांनी यावर सहमती दर्शवली नाही. अतिरिक्त दंड शुल्कावर प्रतिक्रिया देणारा भारत पहिला होता कारण त्याचा देशाच्या अंतर्गत व्यापारावर परिणाम होईल. ७ ऑगस्ट रोजी, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने ट्रम्पचा निर्णय फेटाळून लावला आणि म्हटले की, 'तेल खरेदीचे आमचे उद्दिष्ट १४० कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे आहे. भारत आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.' पंतप्रधान मोदींनी असेही म्हटले होते की, 'भारत कधीही आपल्या शेतकऱ्यांच्या, पशुपालकांच्या हिताची तडजोड करणार नाही. वैयक्तिकरित्या, मला मोठी किंमत मोजावी लागेल, पण मी त्यासाठी तयार आहे.'

(पान ६ वर)

# 'विकसित भारता'चा 'कर्तव्य'संकल्प

लक्ष्यवेध

प्रतिनिधी

अर्थसंकल्प हा सत्ताधाऱ्यांचा राजकीय दस्तऐवज नसतो; तर ती देशाच्या आर्थिक विचारांची कसोटी असते. म्हणूनच अर्थसंकल्प समजून घेणे, त्याचा अर्थ उलगडणे आणि त्यामागील दिशा ओळखणे हे अत्यंत महत्त्वाचे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'बजेट मेड ईझी' या पुस्तकाची आठवण करून देताना नेमकेपणाने हीच बाब अधोरेखित केली आहे. अर्थसंकल्प हा निव्वळ अर्थतज्ज्ञांसाठी नव्हे, तर सामान्य नागरिकांनाही समजण्याजोगा असावा. केंद्रीय अर्थसंकल्प याच कसोटीवर तपासला, तर तो आकड्यांपुरता मर्यादित न राहता, देशाच्या पुढील टप्प्याचा आराखडा असल्याचे स्पष्ट होते. या अर्थसंकल्पाचा गाभा एकाच वाक्यात सांगायचा झाला, तर तो असा की, खर्चावर शिस्त, गुंतवणुकीवर भर आणि विकासाला देण्यात आलेली गती. सरकारने लोकाभिमुख सवलतींपेक्षा दीर्घकालीन संरचनात्मक बदलांवर भर दिला आहे. कृषी, ग्रामीण अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि करप्रणाली या सर्व क्षेत्रांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन, एक व्यापक विकासकथा मांडण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसतो.

कृषिक्षेत्राबाबत गेल्या काही वर्षांत सरकारवर सातत्याने टीका होत आली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न, बाजारभाव, नैसर्गिक आपत्ती आणि खर्चवाढ यांमुळे कृषी अर्थव्यवस्था ताणाखाली आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र, यंदाच्या अर्थसंकल्पात कृषीला अनुदानाच्या चौकटीत मर्यादित न ठेवता, उत्पादनक्षमता आणि स्थैर्याच्या दृष्टीने मोठा आधार देण्यात आला आहे. पारंपरिक शेती, किमान आधारभूत किंमत आणि अनुदान यांवर केंद्रित धोरणांच्या मर्यादा सरकारने अप्रत्यक्षपणे मान्य केल्याचे संकेत येथे मिळतात. शेतकऱ्यांनी भात, गहू, कडधान्ये यांवर अवलंबून न राहता उच्च-मूल्य पिकांकडे वळावे, हा देण्यात आलेला संदेश धोरणात्मक दिशानिर्देश आहे. नारळ, काजू, कोको, अक्रोड, पाईन नट्स आणि चंदन यांसारख्या पिकांना प्रोत्साहन देणे म्हणजे, कृषी उत्पन्नवाढीचा नवा मार्ग स्वीकारणे. शेतीतील उत्पन्नवाढ ही केवळ उत्पादन वाढवून साध्य होत नाही; ती मूल्यवर्धनातूनच शक्य होते, हे सरकारने ओळखलेले दिसते. त्यामुळेच कृषिक्षेत्रातील तरतुदी या आर्थिक व्यवहार्यतेवर आधारलेल्या दिसून येतात.

उत्पादनक्षेत्राबाबत हा अर्थसंकल्प अधिक ठाम भूमिका घेतो. गेल्या दशकात भारताने उत्पादनक्षेत्रात जागतिक पातळीवर स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, घोषणा करून उत्पादन वाढत नाही, तर पायाभूत सुविधा, भांडवल, कुशल मनुष्यबळ आणि धोरणातील स्थैर्य आवश्यक असते. या अर्थसंकल्पात भांडवली खर्चावर दिलेला भर हा उत्पादनक्षेत्रासाठी निर्णायक ठरतो. रस्ते, बंदरे, रेल्वे, ऊर्जा आणि लॉजिस्टिक्स यासाठीची गुंतवणूक ही थेट उत्पादन खर्च कमी करणारी आहे. लघु आणि मध्यम उद्योगांसाठी तरलता, कर्जसुलभता आणि अनुपालन सुलभ करण्यावर दिलेला भर हा उत्पादनक्षेत्राचा कणा मजबूत करणारा आहे. रोजगारनिर्मितीचा प्रश्न केवळ सरकारी भरतीने सुटत नाही; तो उद्योगांच्या विस्तारातूनच सुटतो. या अर्थसंकल्पात हा वास्तववादी दृष्टिकोन जाणवतो.

पर्यटनक्षेत्राकडे पाहिले, तर अनेक वर्षे हे क्षेत्र घोषणांपुरतेच मर्यादित राहिले होते. यंदाच्या अर्थसंकल्पात पर्यटनाला आर्थिक विकासाचे साधन म्हणून पाहण्याचा प्रयत्न दिसतो. धार्मिक, सांस्कृतिक, साहसी आणि पर्यावरणपूरक पर्यटनासाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला आहे. पर्यटन हे केवळ हॉटेल्स आणि विमानसेवेपुरते मर्यादित नसून स्थानिक रोजगार, हस्तकला, वाहतूक आणि सेवाक्षेत्राशी थेट जोडलेले आहे. त्यामुळे पर्यटनातील गुंतवणूक ही रोजगारनिर्मितीची साखळी उभी करते.

विशेष म्हणजे, पर्यटनक्षेत्रात खासगी गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी धोरणात्मक सुसूत्रता दाखवण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसतो. राज्ये आणि स्थानिक प्रशासनाची भूमिका अधोरेखित करून केंद्र-राज्य समन्वयावर भर देण्यात आला आहे, ही बाबही महत्त्वाची आहे.




**केंद्र सरकारने लोकाभिमुख सवलतींपेक्षा दीर्घकालीन संरचनात्मक बदलांवर दिलेला भर, शाश्वत विकासाकडे वाटचाल करण्यासाठीच्या तरतुदी या मोदी सरकारचा 'विकसित भारता'चा 'कर्तव्य' संकल्पच सर्वार्थाने अधोरेखित करणाऱ्या ठरल्या आहेत.**

माहिती-तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्था हा या अर्थसंकल्पाचा आणखी एक मजबूत पाया आहे. भारताने गेल्या दशकात डिजिटल व्यवहार, प्रशासन आणि सेवाक्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. या पार्श्वभूमीवर डिजिटल पायाभूत सुविधा, डेटा केंद्रे, सायबर सुरक्षा आणि कौशल्यविकासासाठी केलेल्या तरतुदी या केवळ भविष्यासाठीच्या गुंतवणुका आहेत. आयटी क्षेत्राला करसवलतींपेक्षा स्थिर धोरणे आणि विश्वासार्ह वातावरण अधिक महत्त्वाचे असते. या अर्थसंकल्पात ते संकेत स्पष्टपणे दिसतात. स्टार्टअप्स, नवउद्योजकता आणि तंत्रज्ञानाधारित उद्योगांसाठी निधी आणि नियामक सुलभता ही भारताच्या स्पर्धात्मकतेसाठी आवश्यक आहे. यंदाचा अर्थसंकल्प या दिशेने सावध, पण ठाम पावले टाकतो.

या सर्वक्षेत्रीय मांडणीच्या पार्श्वभूमीवर भारत-युरोपीय महासंघ कराराचा उल्लेख आवश्यक ठरतो. भारताची कृषी उत्पादने, उत्पादनक्षेत्र, पर्यटन आणि आयटी सेवा या सर्व क्षेत्रांना युरोपियन बाजारपेठेची मोठी संधी आहे. मात्र, ही संधी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी देशांतर्गत पायाभूत सुविधा, मानके, गुणवत्ता आणि धोरणातील स्पष्टता आवश्यक असते. यंदाचा अर्थसंकल्प या दृष्टीने भारताची तयारी मजबूत करतो. म्हणजेच हा करार अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू नसला, तरी अर्थसंकल्प त्या करारासाठी आवश्यक असलेली आर्थिक आणि धोरणात्मक जमीन तयार करतो, एवढेच त्याचे खरे महत्त्व.

अर्थसंकल्पाचे खरे सामर्थ्य कुठे दिसत असेल, तर ते पायाभूत सुविधांमध्ये. कारण, शेती, उद्योग, पर्यटन किंवा माहिती-तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांची वाढ रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा आणि शहरी सोयीसुविधांवरच अवलंबून असते.

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चावर दिलेला भर हा आर्थिक धोरणातील ठाम निवड असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकार पायाभूत सुविधांकडे खर्च म्हणून नव्हे, तर गुंतवणूक म्हणून पाहात आहे. यंदाचा अर्थसंकल्प हीच भूमिका कायम ठेवणारा आहे.

महामार्ग, द्रुतगती मार्ग, रेल्वे नेटवर्क, मालवाहतूक मार्गिका, बंदरे आणि नागरी वाहतूक व्यवस्थेसाठी करण्यात आलेली तरतूद ही उत्पादनखर्च कमी करणारी आहे. ऊर्जा पायाभूत सुविधांबाबतही हा अर्थसंकल्प स्पष्ट दिशा दाखवतो. नवीकरणीय ऊर्जा, विद्युत जाळे बळकट करणे आणि ऊर्जा साठवणूक यांसाठीचा खर्च हा दीर्घकालीन स्पर्धात्मकतेचा पाया घालणारा आहे. उद्योगांसाठी ऊर्जा खर्च नियंत्रणात राहणे, हे जागतिक बाजारात टिकण्यासाठी महत्त्वाचे ठरते. शहरी पायाभूत सुविधांवर दिलेला भरही दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि गृहनिर्माण या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर आर्थिक वाढीवर परिणाम होतो. अर्थसंकल्पातील शहरी विकासाशी संबंधित तरतुदी या शहरसौंदर्यापुरत्या नसून, त्या उत्पादकतेशी थेट जोडलेल्या आहेत. कार्यक्षम शहरे म्हणजेच कार्यक्षम अर्थव्यवस्था, ही संकल्पना या तरतुदींमागे स्पष्ट दिसते. एकूण अर्थसंकल्पाचा विचार केला, तर तो अतिरंजित अपेक्षा निर्माण करत नाही आणि हीच त्याची जमेची बाजू म्हणावी लागेल. वित्तीय शिस्त, तुटीवर नियंत्रण आणि खर्चातील प्राधान्यक्रम यांबाबत तो सावध आहे. लोकाभिमुखतेच्या नावाखाली अनियंत्रित खर्च टाळण्याचा प्रयत्न दिसतो. त्यामुळे हा अर्थसंकल्प लोकप्रियतेपेक्षा विश्वासार्हतेवर भर देणारा ठरतो.

अर्थसंकल्प समजून घेण्याची भाषा बदलण्याचा आग्रह करणारे 'बजेट मेड ईझी'सारखे प्रयत्न या अर्थसंकल्पासंदर्भात अधिक अर्थपूर्ण वाटतात. जेव्हा अर्थसंकल्प समजतो, तेव्हाच त्यावर चर्चा प्रगल्भ होते आणि जेव्हा चर्चा प्रगल्भ होते, तेव्हाच धोरणांची खरी कसोटी लागते. हा अर्थसंकल्प क्रांतिकारी नाही, पण दिशादर्शक नक्कीच आहे. तो तत्कालिक लाभांपेक्षा दीर्घकालीन स्थैर्याचा विचार करतो. त्यामुळेच हा अर्थसंकल्प राजकीय घोषणांपेक्षा आर्थिक शहाणपणाचा दस्तऐवज ठरतो.

# बाल्टिक समुद्रकाठी, रशियाची नवी झोंबटी

विश्वसंचार


**मल्हार कृष्ण गोखले**

'साब' याचा अर्थ 'साहेब' नव्हे. 'स्वेन्स्का एरोप्लेन अ‍ॅक्टायबोलागेट' किंवा साध्या इंग्रजीत 'स्वीडीश एरोप्लेन कॉर्पोरेशन' या नावाचे स्वीडीश भाषेत लघुरूप 'एस.ए.ए.बी.' असे होते. तर, ही 'साब' कंपनी मुळात विमान बांधणी करायची. मध्यंतरी तिने मोटरकार निर्मितीही सुरू केली होती. आता ती विमाने, विविध प्रकारची क्षेपणास्त्रे यांसह पाणबुड्यासुद्धा बांधू लागली आहे. 'ए-२६' ही तिची नवी पाणबुडी सगळ्याच 'नाटो' करार राष्ट्रांना फारच उपयुक्त वाटते आहे. युरोप खंडाच्या पार उत्तरेला नॉर्वे, डेन्मार्क आणि स्वीडन असे देश आहेत. त्यांना 'स्कँडिनेव्हियन देश' किंवा 'नॉर्डिक देश' असेही म्हणतात. या तीन देशांसह जर्मनी, फिनलंड, पोलंड, एस्टोनिया, लिथुएनिया, लॅट्व्हिया आणि रशिया अशा दहा देशांना बाल्टिक समुद्राची किनारपट्टी लाभली आहे.

कुणाला थोडी, कुणाला जास्ती. दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत रशियाने पूर्व युरोपातल्या अनेक देशांमध्ये आपल्या हस्तकांना शासनप्रमुख बनवले. त्यानंतर उरलेले पश्चिम युरोपीय देश आणि मग क्रमाक्रमाने अमेरिका, आशिया, आफ्रिका ही सगळीच खंडे व्यापून जगभर सोव्हिएत लाल साम्राज्य पसरवायचे, अशी स्टॅलिनची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. या वेगळ्या प्रकारच्या साम्राज्यवादाला रोखण्यासाठी अमेरिका आणि तिचे मित्र देश यांनी 'नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन- एन.ए.टी.ओ' किंवा 'नाटो' असा एक गट स्थापन केला. ही घटना १९४९ सालची. १९९१ साली सोव्हिएत रशिया कोसळला. त्याच्या पंजाखालून निघून स्वतंत्र बनलेल्या पोलंड, एस्टोनिया वगैरे देशांनी भराभर 'नाटो'चे सदस्यत्व घेऊन आपले नवे स्वातंत्र्य सुरक्षित बनवले. स्वीडन हा दोन्ही महायुद्धांत अलिप्त राहिला.

पहिल्या महायुद्धात फारसा प्रश्न आला नाही; पण दुसऱ्या महायुद्धात स्वीडनने जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरावे म्हणून हिटलरने खूप दबाव आणला. स्वीडनने हिटलरला कच्चे पोलाद आणि बॉल बेअरिंग्जचे साहित्य हवे तेवढे पुरवले; पण प्रत्यक्षात तो युद्धात उतरला नाही. त्याचप्रमाणे दोस्त राष्ट्रांना नाझींची गुप्त माहिती पुरवणे, नाझीविरोधी भूमिगत लढवय्यांना आश्रय देणे इत्यादी कामे करून तो दोस्त राष्ट्रांच्याही मित्रत्वात राहिला. १९४५ ते १९९१ या रशिया-अमेरिका शीतयुद्धाच्या काळातही स्वीडनने आपला अलिप्तपणा कसोशीने टिकवला. २०२२ साली रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यावर मात्र स्वीडनने आणि त्यांच्यासोबत फिनलंडनेदेखील 'नाटो'मध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. त्यासंबंधीच्या सर्व औपचारिकता पूर्ण होऊन २०२४ साली दोघांनाही 'नाटो'चे सदस्यत्व देण्यात आले. त्यामुळे आजमितीला या दोघांसह एकंदर ३० देश 'नोटो'चे सदस्य आहेत. हे सगळे युरोपीय देश आहेत. उर्वरित दोन देश म्हणजे अमेरिका आणि कॅनडा. हे दोन्ही अटलांटिकच्या पलीकडे अमेरिका खंडात आहेत, हे आपल्याला माहीतच आहे.

**गेल्या आठवड्यात आपण 'बोफोर्स' तोफांबद्दल आणि त्या कंपनीचा मालक आल्फ्रेड नोबेल याच्याबद्दल काही मल्लिनाथी केली होती. आता पाहूया 'बोफोर्स' कंपनीची मालकी ज्यांच्याकडे आहे, त्या 'साब' या कंपनीबद्दल. कारण 'साब' कंपनीच्या वजनाने हलक्या, त्यामुळे चपळ अशा 'ए-२६' नामक पाणबुड्या देशोदेशींच्या नौदलांना पसंत पडत आहेत. नुकतीच पोलंडने 'साब'कडे तीन 'ए-२६' पाणबुड्यांची मागणी नोंदवली आहे. त्यांची किंमत आहे २० कोटी, ८० लक्ष डॉलर्स!**



एकंदर, ३२ देशांची 'नाटो' संघटना लष्करीदृष्ट्या चांगलीच समर्थ आहे. तिच्या या सामर्थ्यात स्वीडनच्या सामीलीकरणामुळे भरघोस भर पडली आहे. कारण, स्वीडन गेल्या १०० वर्षांपासून तर्हे तर्हेची उत्कृष्ट शस्त्रसामग्री बनवतो आहे. बाल्टिक समुद्र. झेनोफोन, प्लीनी इत्यादी ग्रीक, रोमन सेनापती, विद्वान यांना तो समुद्र पट्ट्यासारखा बेल्टसारखा भासला. त्यावरून त्याला बाल्टिक समुद्र हे नाव मिळाले. आता या सागराच्या किनाऱ्यावर जे दहा देश आहेत, त्यांपैकी रशिया हा सर्वात अवाढव्य देश आहे. पण, त्याच्या वाट्याला किनारपट्टी मात्र अगदीच थोडी आलेली. उर्वरित नऊ देशांना बर्यापैकी समुद्रकिनारा मिळाला आहे. पण, एकंदरीतच बाल्टिक समुद्राची अटलांटिक महासागराशी जिथे भेट होते, तिथला सागरी भाग फारच अरुंद आहे. त्यामुळे अटलांटिकचे खारे पाणीदेखील पुरेशा प्रमाणात बाल्टिकमध्ये येत नाही. त्या कारणाने इतर सागरांप्रमाणे बाल्टिकमध्ये सागरी जीवांची विविधता खूपच कमी आहे.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, व्यापारी आणि लष्करी नौकानयनावरसुद्धा खूप मर्यादा येतात. त्यातच आता रशिया सोडून उरलेले नऊ देश 'नाटो'चे सदस्य आहेत म्हणजेच एकमेकांचे मित्र आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी एकमेकांच्या सहकार्याने बऱ्याच नव्या गोष्टी उभ्या केल्या आहेत. फिनलंड आणि एस्टोनिया यांच्या दरम्यान द्रवरूप निसर्ग वायूची नळ योजना सुरू झाली. हे नळ अर्थातच बाल्टिक समुद्राच्या तळातून जातात. नॉर्वे आणि पोलंड यांच्या दरम्यानही असेच नळ आहेत. बाल्टिकच्या एकंदर किनारपट्टीवर या सर्व देशांची मिळून द्रवरूप इंधनाची दहा टर्मिनल्स आताच कार्यरत आहेत. आणखी दोन उभी रहात आहेत. डेन्मार्क आणि जर्मनी यांनी आपापल्या किनाऱ्यांवर शेकडो पवनचक्क्या उभारल्या आहेत. या पवनचक्क्यांमधून भरपूर आणि स्वस्त वीज उपलब्ध होत आहे म्हणून एस्टोनिया, लॅट्विया आणि लिथुएनिया या देशांनी आता २०२५ मध्ये रशियन पॉवर ग्रीडची कंत्राटे थांबवली आणि जर्मनी-डेन्मार्कबरोबर वीजपुरवठ्याचे करार केले. या सगळ्या लाईन्स बाल्टिक समुद्राच्या तळातून जातात. आता 'नाटो' राष्ट्रांचे हे सगळे उद्योग सुशेगात-सुरळीत चाललेले रशियाला कसे बघवतील? मग त्यांनी काय केले असेल? रशियन व्यापारी जहाजे प्रवास करताना आपला नांगर ढिला सोडून देतात. जहाजाबरोबर नांगर तळ खरवडून काढत पुढे जात राहतो. त्याच्या आकड्यात या लाईन्स अडकतात. अगदी तुटत नाहीत; पण त्यांना गंभीर हानी पोचते. रशियाचा तोच हेतू आहे. पुरवठा लाईन्स पूर्ण तुटल्या, तर खूपच बभ्रा होईल. तिथपर्यंत जायचे नाही; पण गंभीर क्षती पोचवून त्रास देत रहायचे.

२०२३ ते २०२५ या काळात ११ वेळा अशा घटना घडल्या. 'रँड' या संशोधन संस्थेने या लाईन्स दुरुस्तीसाठी विविध राष्ट्रांना किती खर्च आला, हे आकडेवारीनिशी जाहीर केले आहे. टेलिकॉम केबल्ससाठी २० लक्ष, ८० हजार डॉलर्स; तेलवाहिन्यांसाठी चार कोटी, २० लक्ष डॉलर्स; तर गॅसवाहिन्यांसाठी आठ कोटी, २० लक्ष डॉलर्स खर्ची पडले. खर्च हा मुद्दा तर आहेच; पण या लाईन्स नीट दुरुस्त होईपर्यंत फार वेळ जातो. तोपर्यंत पुरवठ्यावर जो परिणाम होतो, त्यातून पुढच्या सगळ्याच गणितात फरक पडत जातो. मग हा खर्च वारंवार करत बसण्यापेक्षा २० कोटी, ८० लक्ष किमतीच्या पाणबुड्या एकदाच घेतल्या की बरे, असा विचार पोलंडने केलेला आहे. आता आजच्या घटकेला रशियन नौदलासमोर पोलंडचा काय पाड लागणार? रशियाकडे आण्विक पाणबुड्या आहेत. एकाहून एक बलाढ्य अशा विमानवाहू नौका नि युद्धनौका आहेत. इथे पुन्हा पारंपरिक युद्धातला अनुभव काय म्हणतो पाहा. अवजड गजदळ ही मोठी शक्ती आहे, यात वादच नाही; पण चपळ घोडदळ अवजड हत्तीदळाच्या बगलेवरून पिछाडीला पोचले की, गजदळाचे वांधे होतात. ते वेगाने मोहरा वळवू शकत नाही. 'ए-२६' फक्त ६६ फूट लांबीच्या हलक्या, चपळ पाणबुडीला समोरासमोर युद्ध करायचेच नाही. चपळाईने आणि चाहूल लागू न देता सर्वत्र म्हणजे बाल्टिक समुद्रात सर्वत्र संचार करून रशियन व्यापारी नि लष्करी जहाजांवर बारीक नजर ठेवणे, हे तिचे काम आहे. सध्या पोलंडकडे फक्त एक पाणबुडी आहे. ती खूपच जुनाट आहे.

समुद्रतळाचा शोध घेणारी तिच्यावरची 'सोनार' नामक इलेक्ट्रॉनिक यंत्रणा खूपच जुनी आहे. शिवाय, बाल्टिक समुद्राचा तळ म्हणजे युरोपीय देशांचा उकिरडा झालेला आहे. असंख्य कचर्यात टाकायच्या वस्तू हे देश सरळ बाल्टिकमध्ये फेकून देत असतात. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीला पूर्णपणे नि:शस्त्र बनवायचे ठरवले. मग नाझींचे शस्त्रसाठे त्यांनी काय केले? तर सरळ बाल्टिकमध्ये फेकून दिले. ते तिथेच गंजत पडलेले आहेत. दारुगोळ्यांमधली विविध रसायने हळूहळू पाण्यात विरघळत असतात. अशा कारणांनी बाल्टिकच्या पाण्याखालची दृष्यमानतादेखील खूप कमी आहे. 'ए-२६' पाणबुडीत या सर्वच अडचणींवर मात करणारी अत्याधुनिक उपकरणे आहेत. शिवाय, त्या पाणबुडीतून ड्रोन्स सोडली जाऊ शकतात. 'अनमॅन्ड एरियल व्हेईकल' म्हणजेच वैमानिक विरहित टेहळणी करणारे, छायाचित्रे घेणारे विमान किंवा ड्रोन, हे आपल्याला माहीतच आहे. 'यू.ए.व्ही.' हे त्याचे लघुरूप. तशी या पाणबुडीत 'अनमॅन्ड अंडरवॉटर व्हेईकल' म्हणजे 'यू.यू.व्ही.' आहेत. ही पाण्याखालची ड्रोन्स कोणत्याही प्रकारच्या पाण्यात सहजतेने संचार करत सर्वेक्षण करू शकतात. आता पुढचा मुद्दा असा आहे की, समजा पोलंडने या पाणबुड्या घेतल्या. त्या पाणबुडीने रशियन जहाजाला केबल खरवडताना रंगेहाथ पकडले. चित्रे घेतली.

मग पुढे काय? रशियन नौदलाशी युद्ध करण्याची पोलंडची किंवा कोणत्याही बाल्टिक देशाची क्षमता आहे का? हा प्रश्नच गैरलागू आहे. बाल्टिक किनार्यावरचे हे नऊही देश 'नाटो'चे सदस्य आहेत. याचाच अर्थ त्यांच्यामागे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स ही अण्वस्त्रसज्ज राष्ट्रे उभी आहेत. म्हणजेच पुन्हा एकदा 'रशिया विरुद्ध अमेरिका' असाच हा सामना आहे. हा सामना अटलांटिक आणि बाल्टिक या युरोप खंडाला जोडलेल्या सागरांमध्ये होणार असल्याने चीन, अरब, इस्रायल वगैरे मंडळी मात्र इथे नाहीत. जी काही खडाखडी होईल, ती गोर्या लोकांमध्येच होईल. सगळे भिडू आपापली शस्त्रे परजून सिद्ध होत आहेत.

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# चांगली बाजू आहे

सध्याच्या नव्या काळात तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींचे वागणे किती वाईट आहे याबद्दलचे वेगवेगळे प्रसंग एका लग्नामध्ये चर्चिले जात होते. ती सारी चर्चा मी ऐकत होतो व त्यामध्ये माझ्याही गाठीशी असलेले काही प्रसंग समाविष्ट करीत होतो. खरोखरीच विषय चिंताजनक होता व त्या चिंतेची तीव्रता दिवसेंदिवस जास्त वाढतेच आहे. मुला-मुलींचे वाटेल तसे वागणे, शिक्षणाकरिता मोठ्या शहरात राहताना आई-वडील सोबत नसल्याचा फायदा वेगवेगळ्या प्रकारे घेतला जाणे, पार्टीसाठी रात्री बाहेर राहणे, सिगारेट पिणे, दारू पिणे किंवा त्याच्याही पुढे जाऊन मादक पदार्थांचा वाढता अंमल या सर्व चिंतेच्या बाबी त्या ठिकाणी चर्चिल्या गेल्या. यापैकी काही बाबी तर मी देखील प्रत्यक्ष बघितलेल्या असल्याने त्या चर्चेमध्ये मी देखील काही गोष्टींबद्दल भर घातली. या सर्व प्रकारांमुळे मोठ्या शहरांमध्ये मुला- मुलींना शिक्षणासाठी पाठविणे हा पालकांसाठी धास्तीचा विषय बनलेला आहे. या शहरांबद्दलची ही प्रतिमा मनात असताना या सर्व प्रकारांसोबत एक दुसरी बाजू अनुभवण्याची संधी मला अचानक मागच्या महिन्यात प्राप्त झाली.

एका मैत्रिणीचा, तिच्या क्लासचे एक प्रदर्शन आहे, असा संदेश आला. मैत्रिणीने मोठ्या कष्टाने आयोजित केलेल्या इव्हेंटला भेट देणे आवश्यकच होते म्हणून मी एक दोन मित्रांसोबत ते प्रदर्शन बघायला गेलो. तो सारा इव्हेंट बघितल्यावर त्या गावातील मुला-मुलींबद्दल मनात तयार असलेली किंवा अनुभवलेली जी प्रतिमा होती त्याची एक चांगली व संपूर्णपणे वेगळी बाजू बघायला मिळाली. त्या दिवशीच्या लग्नातील त्या महाचर्चेमध्ये जे बोलले गेले त्यापेक्षा संपूर्णपणे वेगळे चित्र मला अनुभवायला मिळाले. ज्या तरुणतरुणींच्या वागण्यामुळे शहरांची प्रतिमा मलिन होते आहे, त्याच गावातील काही तरुण- तरुणी मात्र एखादा इव्हेंट असा काही करतात की तो बघितल्यानंतर छान वाटायला लागते आणि सर्वांत जास्त मनाला भावते ती म्हणजे त्या सर्व इव्हेंटमधून जाणवणारी तरुणाईची अत्यंत सकारात्मक ऊर्जा. या मोठ्या शहरांमध्ये नांदणाऱ्या मुला-मुलींची ही चांगली बाजू अनुभवून या गावात शिक्षणासाठी मुलीला पाठविलेल्या माझ्यासारख्या मनातून जरा धसका घेतलेल्या पालकाला मोठाच दिलासा मिळाला. तो इव्हेंट होता जपानी भाषा शिकणाऱ्या मुला-मुलींच्या सेंटरचे प्रात्यक्षिक सादरीकरण. या मोठ्या शहरांचे एक वैशिष्ट्य असेही आहे की, मराठी भाषेच्या जपणुकीसोबत महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय भाषा शिकविणारी काही प्रतिथयश आणि प्रभावी केंद्रे या गावात आहेत. यामध्ये जर्मन, फ्रेंच तसेच जपानी भाषा शिकविणारी केंद्रे व शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील मोठी आहे. अशाच एका जपानी भाषा शिकविणाऱ्या केंद्रामध्ये माझी मैत्रीण ती भाषा शिकविण्याचे काम करते. त्या वर्गाचे प्रात्यक्षिक सादरीकरण असे त्या प्रदर्शनाचे स्वरूप होते.

भाषा शिकत असताना त्या देशाच्या सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक चळवळींचा देखील अभ्यास केला जातो हे मला त्या प्रदर्शनात पाऊल ठेवताक्षणी लक्षात आले. आपली मातृभाषा का जपावी लागत असते व मातृभाषा केवळ एक भाषा नसून त्यामधून संपूर्ण संस्कृती प्रतिबिंबित होत असते हे न कळणाऱ्या प्रत्येकाला मला त्या प्रदर्शनाबद्दल सांगावेसे वाटते. जपानी भाषा शिकत असताना, जपानमधील संस्कृती व त्या अंतर्गत असलेले खानपान, तेथील वेगवेगळ्या परंपरा, तेथील समाजमान्यता, तेथील आधुनिक विकासात्मक वाटचाल, तेथील तंत्रज्ञान, तेथील पुरातन वैचारिक लोकचळवळी, तेथील काही अंधश्रद्धा, काही मजेदार गोष्टी, तेथील वेगवेगळे सण, त्या प्रसंगी परिधान केले जाणारे पेहराव, अशा विविध गोष्टींचे दर्शन घडविणारे ते अफलातून प्रदर्शन होते. जपानमधील सामाजिक व्यवस्थांमधील छोट्या छोट्या गोष्टी फार बारकाईने मांडण्याचा प्रयत्न या प्रदर्शनात करण्यात आला होता. याच्या तयारीसाठी ती सारी तरुणाई तीन दिवस रात्र अक्षरशः झटत होती. वेगवेगळ्या प्रकारे व कलात्मक पद्धतीने त्यांनी ते प्रदर्शन सजविले होते. वेगवेगळ्या स्टॉल्सवर मुले-मुली वेगवेगळ्या प्रकारची माहिती देत होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ही सारी माहिती देताना त्यांचा उत्साह बघण्यासारखा होता.

जपानी पोशाख परिधान केलेल्या त्या मुलीने जपानी पद्धतीने आम्हाला अभिवादन केले व त्यानंतर जपानमध्ये सदोदित भूकंपाची भीती असल्याने त्यांच्या नव्या व आधुनिक इमारती बांधताना कोणते नवे तंत्रज्ञान वापरले जाते आहे याबद्दल तिने फार छान माहिती दिली. जपानी परंपरागत भविष्य सांगण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आम्हाला बघायला मिळाल्या. सोबतच काही मुला- मुलींनी जपानी पदार्थ बनवून त्याचा स्वाद मिळवून दिला, तर त्याच्याच सोबत काड्यांनी भात कसा खाता येऊ शकेल याबाबत एक छोटीशी परीक्षा पण त्यांनी घेतली. ओरीगामी हे जपानमधील विशेष तंत्र जे आता केवळ कागदांच्या वस्तू बनविण्यापुरते मर्यादित नसून सौर ऊर्जा तयार करण्यासाठी देखील या डिझाईन्सचा वापर केला जातो आहे, हे सांगणारा तो २१ वर्षांचा पोरगा इतक्या उत्साहाने सारे सांगत होता की, मनाला प्रसन्न वाटत होते.

एकंदरीत त्या मोठ्या सभागृहात तरुणाईचा तो सळसळता उत्साह आणि त्या ठिकाणी आढळणारी सकारात्मक ऊर्जा खरोखरीच त्या गावातील मुला-मुलींची एक अतिशय वेगळी आणि आकर्षक बाजू मला दाखवत होती. आमच्या मैत्रिणीने दिलेली माहिती देखील रंजक व प्रेरणादायीच होती. त्या इव्हेंटसाठी ती मुलं गेल्या महिनाभरापासून विचार व प्रक्रिया करीत होते. वेगवेगळे प्रकार त्यांनी ठरविले, त्यानंतर त्याबाबत माहिती प्राप्त केली, त्यानंतर मॉडेल किंवा उपक्रम चांगल्यात चांगला कसा होईल यासाठी त्यांनी आपल्या शिक्षकांची मदत घेतली. शिक्षक देखील भाषा शिकवून सिलॅबस पूर्ण केल्याची धन्यता मानणाऱ्यांपैकी नव्हते. त्यामुळे त्यांचे भरपूर पाठबळ या मुलांना मिळाले. त्यानंतर फायनल रीहर्सल सुरू झाल्या. कुणी काय सांगायचे, कसे सांगायचे, वेशभूषा काय करायची इथपासून तो सभागृहाची सजावट कशी करायची इथपर्यंत योजना करण्यात आली. त्यानुसार आपल्या अत्यंत समर्पित प्राध्यापकांच्या मदतीने त्या मुलांनी सुंदर इव्हेंट साजरा केला तो देखील त्यांच्यावर लादल्या गेलेल्या मरगळीत प्रस्तुतीसह नाही तर प्रचंड सकारात्मक ऊर्जेचा साक्षात्कार घडविणाऱ्या संवादाच्या आणि संपूर्णपणे मनापासून केल्या गेलेल्या सादरीकरणासह. जपानी भाषा शिकणाऱ्या मुला-मुलींनी भाषेसोबतच त्या देशाची सांस्कृतिक व सामाजिक वाटचाल समजून घेण्याचा व त्याला सादर करण्याचा हा प्रयत्न मला या शहरातील तरुणाईची एक अनोखी वेगळी आणि चांगली बाजू दाखवून गेला. खरोखरीच आपल्या जीवनात आपण काही स्वतःच्या किंवा इतरांच्या अनुभवांच्या आधारे कोणत्याही बाबतीत किंवा व्यक्तींच्याबाबत आपले मत तयार करतो. ही एक अत्यंत स्वाभाविक मानसिक प्रक्रिया आहे. परंतु या मतांना बरेच वेळा बदल न करण्याच्या प्रवृत्तीची जोड मिळाली की मग प्रत्येक गोष्टीमध्ये किंवा व्यक्तीमध्ये असलेली चांगली बाजू स्वीकारणे जड व्हायला लागते. समाजातील प्रत्येक सुशिक्षित व विचारी मंडळींनी जमेल त्या प्रमाणात या चांगल्या बाजू शोधून त्या समाजापुढे आणण्याचे कार्य केले पाहिजे. त्याकरिता आपल्याला प्रत्येकच बाबीसंबंधी ठाम मत बनवून न ठेवता चांगली बाजू शोधण्याची मानसिकता विकसित करणे गरजेचे आहे. वर्तमानाचे वर्णन करणारी समाजमाध्यमे देखील जेव्हा आपल्यासमोर आपले वर्तमान ठेवतात तेव्हा नकारात्मकता जास्त जाणवते.

दोष समाजमाध्यमांचा नाही, नकारात्मकतेतून निर्माण होणारी वृत्ते आपल्याला खळबळजनक वाटतात व तीच मनाला भावतात. परंतु प्रत्येक बाबतीत चांगली बाजू बघण्याच्या सवयीमुळे आपल्याला आपले जग सुंदर वाटू लागते व आपले जीवन आनंदी करण्याचा यापेक्षा सोपा मार्ग नाही. प्रदर्शनातील एका छोट्या मित्राने मला माझी इच्छा लिहून गमतीने झाडाला बांधायला सांगितली. त्या मुलाने स्वतः तयार केलेल्या त्या जपानी पद्धतीच्या कार्डवर मी त्या मुलाच्या नावे लिहिले, ''मित्रा, तुझ्या ठायी असलेली आनंद निर्माण करणारी सकारात्मक ऊर्जा मला उमजली. ती माझ्या ठायी येऊन माझे आयुष्य त्यामुळे आनंदी व्हावे ही माझी इच्छा पूर्ण व्हातवी.''

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# अन्नप्राशन- १




भारतीय भूमीच्या मातीत काही विलक्षण अशी किमया आहे. इतरत्र कुठेही नाही अशा संकल्पना, विचार, चिंतन, दर्शन, तत्त्वज्ञान, संस्कार इथेच कसे काय प्रकट होतात हे कोडंच आहे. आईच्या गर्भाशयाच्या आतील भिंतीवर अतिशय मृदू ऊतकांचा एक थर असतो. त्यात एक नलिकेच्या माध्यमातून फलित बीज रुजतं. तिला नाळ म्हणतात. याच काळात ते फलित बीज अतिशय वेगानं आपली कोशिका संख्या वाढवत असतं. कोशिकांचा एक पुंजका तयार होईपर्यंत नाळ जोडली जाते. आईच्या शरीरातून त्या कोशिका पिंडाला अन्नरसाचा पुरवठा होतो. नऊ महिने नऊ दिवस भ्रूण वाढत जातं.

शरीराचे विविध अवयव तयार होतात आणि वाढ पूर्ण झाली की ते अर्भक आपसूकच गर्भाशयातून बाहेर येण्याचा प्रयत्न करू लागतं. बाळंतपण झालं की ते आईच्या दुधावर पोसलं जातं. याविषयी आचार्य रजनीश 'ओशो' यांची एक टिप्पणी मनभावक आहे. ते म्हणतात, खरं तर, इतर सस्तन प्राण्याची पिल्लं जन्म झाल्याझाल्या आपल्या पायांवर उभी राहतात. काही वेळातच चालू लागतात. आपल्या आईच्या मागोमाग फिरू लागतात. पण माणसाच्या बाबतीत मात्र बाळाच्या जन्मापासून ते चालायला लागण्यासाठी, जन्म ल्यापासून सर्वसाधारणपणे ९ ते ११ महिने लागतात. म्हणजे तसं पाहिलं तर मग गर्भधारणेचा कालावधी किमान २० महिन्यांचा असायला हवा. पण माणसाची मादी गर्भधारणेला नऊ महिने नऊ दिवस झाले की गर्भाला गर्भाशयातून बाहेर टाकते. कारण तो गर्भ इतका मोठा असतो की या पलीकडे त्याला गर्भाशयात वाढवणं तिला शक्य होणार नसतं. मग ती त्याची/तिची जोपासना आपल्या अंगाखांद्यांवर करते. त्याला स्वत:च्या हातापायांवर रांगता येणं, दोन पायांवर उभं राहून तोल सांभाळता येणं आणि त्यानंतर चालता येणं हा सगळा विकासक्रम खरं तर इतर सस्तन प्राण्यांप्रमाणे गर्भाशयातच व्हायला हवा. पण त्यासाठी लागणारा वेळ आणि गर्भार स्त्रीची भार वाहण्याची क्षमता यांचा ताळमेळ बसत नसल्यानं निसर्गानं हा मार्ग निवडला. साहजिकच बाळाचा जन्म जरी झाला असला तरीही ते परावलंबीच असतं. त्याच्या शरीराच्या मानानं डोकं काहीसं मोठंच असतं. कारण मानवी मेंदू शरीराच्या मानाने मोठा असून तो विचार, भावना आणि हालचालींवर नियंत्रण ठेवतो. यामुळेच मानवी बुद्धिमत्ता वाढते. मेंदूचा आकार बुद्धिमत्तेशी जोडलेला असला तरी, त्याचा विकास आणि कार्यप्रणाली अधिक महत्त्वाची आहे. त्याचं शरीर हे डोकं सांभाळायला सक्षम नसतंच. त्यामुळे बाळाला मान सावरण्याचा सराव करावा लागतो. त्यानंतर ते पालन करणाऱ्या व्यक्तीपासून काहीसं सुटं होतं. पालथं पडून पुढे सरकण्याचा प्रयत्न करू लागतं. त्यात सहा महिने सहज जातात. आता त्याला दोन पायांवर उभं राहण्यासाठी अधिक शक्तिशाली शरीराची आवश्यकता असते. आईच्या दुधापेक्षा अधिक काहीतरी खाऊन त्याची वाढ होणं अपेक्षित असतं. मग पहिल्यांदाच त्याला बाहेरचं अन्न द्यायचं तर हा त्याच्या आयुष्यात घडणारा मोठा बदल आहे. भारतीय संस्कृतीत ज्या ज्या वेळी आयुष्यात एक मोठं परिवर्तन होणं अपेक्षित असतं त्या प्रत्येकवेळी संस्कारविधी सांगण्यात आलेला आहे. यात दोन गोष्टी आवर्जून करण्यात येतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे शुभमुहूर्त शोधणं. सनातनी व्यक्ती हे एक वैश्विक अस्तित्व आहे. त्यामुळे त्या व्यक्तीच्या आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रत्येक प्रसंगाकरिता तिला अनुकूल अशा ग्रह, नक्षत्र, ताऱ्यांची सुसंगती असणं अपेक्षित आहे. त्यासाठी आकाशवाचन करून आकाशस्थ पिंडांच्या मेळाच्या परिणामांचे काही ठोकताळे मांडण्यात आले आहेत. त्यानुसारच शुभमुहूर्त शोधण्याची एक विविक्षित पद्धत भारतीयांनी शोधून काढली आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे प्रसंगानुरूप त्या त्या नावाचा अग्निदेव स्थापन करण्यात येतो, हे आपण पाहिलं आहे. पृथ्वीपासून उत्पन्न होणारं जे अन्न खाऊन बाळाचा देह पोसला जाणार आहे. त्या अन्नाचं भक्षण करायला सुरुवात करण्यासाठी 'पार्थिव' नावाच्या अग्नीचं आवाहन करण्यात येतं. बाळ जर मुलगी असेल तर तिच्या वयाच्या पाचव्या, सातव्या किंवा नवव्या महिन्यात आणि मुलगा असेल तर त्याच्या वयाच्या सहाव्या, आठव्या किंवा दहाव्या महिन्यात अन्नप्राशन विधी करावा असं शास्त्रकार सांगतात. मुळात अन्नप्राशन हा संस्कार करण्यामागचा हेतू संकल्पाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आलेला आहे. गर्भावस्थेत असताना भ्रूणाच्या तोंडात स्वत:चेच मलमूत्र जात असतं. तो दोष दूर व्हावा आणि बाळाला चांगल्या चवीचं, उत्तम पोषणमूल्य असणारं अन्न खाण्याची सवय लागावी हा या संस्कारामागचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी सूर्याच्या पूषन् नावाच्या स्वरूपाची पूजा करतात. त्याचं संबोधन रूप आहे पूषा. या पूषाचं कार्य फार महत्त्वाचं आहे. सूर्याची ऊर्जा ज्या स्वरूपात धान्य, भाज्या आणि फळ फळावळीत साठवली जाते त्या स्वरूपाला पूषन् म्हणतात. आजकालच्या भाषेत कॅलरी. भ्रूणावस्था ते मरण येईपर्यंत माणसाचं पोषण ज्याच्यावर होतं तो पूषन्! या देवतेला आवाहन करून बाळाचा पिता एक संकल्प सोडतो, ''माझ्या बाळाने मातेच्या गर्भातील मलाचे प्राशन केल्यामुळे तिला/त्याला लागलेल्या दोषांचा नाश व्हावा. तिला/त्याला शुद्ध अन्न इत्यादिकांची प्राप्ती व्हावी, ब्रह्मवर्चसाचा (तेजाचा) लाभ, इंद्रिये आणि आयु यांची सिद्धी, बीजगर्भापासून झालेल्या पापांचे निरसन व्हावे, पूषा देवाची प्रीती आणि कृपा व्हावी म्हणून हा 'अन्नप्राशन' नावाचा संस्कार करतो आहे.'' भारतीय लोकांनी अन्नाची विभागणी चार प्रकारांत केली आहे, खाद्य- चावून खाण्याचे, पेय - पिण्याचे, लेह्य- चाटून खाण्याचे, चोष्य- चावून रस गिळून चोथा फेकून देण्याचे. तर चवीचे म्हणजेच रसाचे सहा प्रकार सांगितले आहेत, आंबट, गोड, तिखट, तुरट, खारट, कडू या सगळ्या प्रकारांचा आणि रसांचा आस्वाद आयुष्यभर बाळानं घ्यावा. सेवन केलेल्या अन्नावर त्याचं शरीर धष्टपुष्ट आणि सुदृढ व्हावं या शुभकामनेसह हा अन्नप्राशन विधी पूर्ण करायचा असतो. अशा प्रकारचा कोणताही विधी अन्य कोणत्याही रिलिजन किंवा मजहबमध्ये नाही.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे



# हिमालयात बर्फाचा दुष्काळ

**दिल्लीसारख्या महानगरांमधून येणारी प्रदूषित हवा केवळ लोकांच्या आरोग्याला हानी पोहोचवत नाही, तर हिमालयालाही संक्रमित करत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, शहरी भागातील वायू प्रदूषण सीमा ओलांडून हिमालयात पोहोचत आहे. हे सीमापार प्रदूषण केवळ हिमालयातील हिम नद्या वितळण्यास गती देत नाही, तर संपूर्ण प्रदेशाच्या हवामान चक्रांवरही परिणाम करत आहे. हिमालयात आता बर्फाचा दुष्काळ असून, हे संकट गंभीर आहे.**

काठमांडूमधील 'आयसीएमओडी', पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था आणि नैनितालमधील आर्यभट्ट संशोधन संस्था (एआरआयईएस) यांनी केलेल्या अभ्यासानुसार, हिमालयातील बर्फावर साचलेला काळा कार्बन त्याचे परावर्तक गुणधर्म (अल्बेडो) २० ते ३० टक्क्यांनी कमी करतो. यामुळे अधिक सौर ऊर्जा शोषून हिमनद्या वितळण्याचा दर वाढतो आणि हिमनदी तलाव फुटण्याचा धोका वाढतो. इथे काळ्या कार्बनचा प्रसारही महत्त्वाचा ठरतो. कार्बन हा डिझेल, कोळसा, लाकूड आणि इतर जैवइंधनांच्या अपूर्ण ज्वलनामुळे निर्माण होणारा सूक्ष्म कण आहे. त्याचा आकार अडीच मायक्रोमीटरपेक्षा कमी असतो. त्यामुळे तो बराच काळ वातावरणात राहू शकतो आणि श्वसनाद्वारे फुफ्फुसांपर्यंत पोहोचू शकतो. आयआयटी दिल्ली आणि कानपूर तसेच 'टेरी' यांच्या अभ्यासानुसार दिल्लीसारख्या महानगरांमध्ये पीएम २.५ प्रदूषणात काळ्या कार्बनचा वाटा १० ते ३० टक्के आहे.

२०१३ ते २०२३ पर्यंतच्या दशकभराच्या विश्लेषणातून दिसून आले आहे की मध्य गंगेच्या मैदानात काळ्या कार्बनचे सरासरी प्रमाण प्रति घनमीटर पाच ते दहा मायक्रोग्रॅम असते. ते हिवाळ्यात जवळजवळ दुप्पट होते. 'आयआयटीएम' आणि अमेरिकेची 'नॅशनल ओशनिक अ‍ॅण्ड अ‍ॅटमॉस्फेरिक अ‍ॅडमिनिस्ट्रेशन'च्या विश्लेषणानुसार, शहरांमधून निघणाऱ्या हवेच्या वस्तुमानांपैकी २३ ते ४० टक्के हिमालयीन प्रदेशात पोहोचतात. धुळीची वादळे ही प्रक्रिया आणखी वेगवान करतात. 'आयसीएमओडी', स्वित्झर्लंडमधील 'ईटीएच झुरिच' आणि 'वाडिया इन्स्टिट्यूट'च्या अभ्यासातून आढळून आले की मध्य आणि पश्चिम हिमालयात ६० ते ७० टक्के काळा कार्बन जीवाश्म इंधनातून येतो. 'नासा'च्या मते, काळ्या कार्बनचा पातळ थरदेखील बर्फ पाच ते दहा टक्के कमी करतो. त्यामुळे पृष्ठभागाचे तापमान दोन ते चार अंश सेल्सिअसने वाढते. २०२५ मध्ये झालेल्या 'आयसीएमओडी'च्या अभ्यासात आढळून आले की पूर्व हिमालयात काळ्या कार्बनचे प्रमाण वाढल्याने बर्फाच्या खोलीत ३० ते ४० टक्के घट होऊ शकते. जागतिक बँक आणि 'आयसीएम ओडी'च्या मते, काळ्या कार्बनमुळे हिमनद्यांचा विसर्ग २० ते २५ टक्क्यांनी वाढू लागला आहे. त्यामुळे गंगा आणि ब्रह्मपुत्रसारख्या नद्यांचा प्रवाह वाढला आहे.

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की दक्षिण आशियाई देशांनी उत्सर्जन मानकांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास हिमालयातील हिम नद्यांवरील काळ्या कार्बनचे प्रमाण अंदाजे २३ टक्क्यांनी कमी होऊ शकते. 'यूएनईपी'च्या मते स्वच्छ इंधनांचा वापर करून इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देऊन आणि पिकांचे अवशेष जाळण्यावर नियंत्रण ठेवून काळ्या कार्बनचे उत्सर्जन ५० ते ८० टक्क्यांनी कमी करता येते. आशियातील पाण्याचा बुरूज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिमालयाला वाचवण्यासाठी आता प्रादेशिक सहकार्य आवश्यक आहे.

'आयसीएमओडी'च्या मते अनियंत्रित काळ्या कार्बन उत्सर्जनामुळे २०५० पर्यंत हिमालयातील ३० ते ४० टक्के बर्फाचे नुकसान होऊ शकते. हिमालयाच्या शिखरांवर आता शहरी प्रदूषणाची सावली वाढत आहे आणि वेळेवर हस्तक्षेप हा एकमेव उपाय आहे. या हिवाळ्यात आतापर्यंत हिमालयीन पर्वतरांगांवर फारच कमी बर्फ पडला आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू आणि काश्मीरच्या अनेक भागांमध्ये जानेवारीच्या मध्यापर्यंत बर्फवृष्टी झाली नव्हती.

नद्या कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. पर्यटनावर परिणाम झाला आहे आणि शेतकरी आणि बागायतदार चिंतेत आहेत; परंतु आता हवामान बदलणार आहे. हवामान विभागाच्या (आयएमडी) मते १९ जानेवारीपासून एक मजबूत पश्चिमी विक्षोभ सक्रिय होऊ लागला आहे. त्याच्या मागे आणखी एक शक्तिशाली विक्षोभ येत आहे. दोन्ही मजबूत पश्चिमी विक्षोभ सलग होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पर्वतांवर जोरदार हिमवृष्टी होण्याची अपेक्षा आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून, पश्चिमी विक्षोभ कमकुवत आणि कमी संख्येने आहेत. हे विक्षोभ भूमध्य समुद्रातून उद्भवतात आणि हिमालयात बर्फ आणि पाऊस आणतात. तथापि, या वेळी बहुतेक विक्षोभ उत्तरेकडे वळले आणि हिमालय कोरडे राहिले. जम्मू, काश्मीर आणि लडाखमध्ये हिमवृष्टीत ९७ टक्के घट नोंदवण्यात आली आहे, तर हिमाचल प्रदेशमध्ये ९२ टक्के आणि उत्तराखंडमध्ये सुमारे शून्य हिमवृष्टी नोंदली गेली आहे.

एके काळी बर्फाच्छादित असलेले पर्वत ओसाड पडले आहेत. बदलत्या वातावरणामुळे केवळ मानवांनाच नाही, तर वन्यजीवांनाही त्रास होत आहे. पाणी, शेती, वीज, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेमागे हिमालय आहे. हिमालयातील बर्फाचे प्रमाण कमी होणे ही केवळ पर्वतांची समस्या नाही, तर जागतिक संकट आहे. शास्त्रज्ञांच्या इशाऱ्यानुसार हिमनद्यांचे वितळणे आणि कमी होणारी बर्फवृष्टी पर्वतांना अस्थिर करत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान अहवालांनुसार आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या विश्लेषणानुसार संपूर्ण हिमालयीन प्रदेश हवामान बदलामुळे प्रभावित होत आहे. बर्फ पर्वतांसाठी सिमेंट म्हणून काम करतो. त्यांना एकत्र ठेवतो. बर्फाच्या अनुपस्थितीमुळे मान्सूनचे नमुने, अतिवृष्टी, वाढलेले तापमान आणि आपत्तींची वारंवारता, तीव्रता आणि व्याप्ती वाढली आहे.

गेल्या १५ वर्षांपासून चीन तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणात कृत्रिम पाऊस (क्लाऊड सीडिंग) कार्यक्रम राबवत आहे. तिबेटच्या ओसाड पठारांना खतपाणी घालण्याचा हा प्रयत्न आहे. चीनला त्यांचे नैसर्गिक आणि कृत्रिम जलसाठे भरून ठेवायचे आहेत. कृत्रिम पावसामुळे हिमालयातील नैसर्गिक वातावरण बदलू शकते. हा प्रयत्न प्रत्यक्षात पाणी किंवा पावसाची चोरी आहे. हे थेट सिद्ध करणे अद्याप शक्य नसले, तरी त्यावर संशोधन आवश्यक आहे. चीन तिबेटमधून जाणाऱ्या यारलुंग त्सांगपो (भारतातील ब्रह्मपुत्र) नदीच्या सर्वांत उंच वळणावर सर्वांत मोठा जलविद्युत प्रकल्प बांधत आहे. या प्रकल्पाची किंमत १६८ अब्ज डॉलर्स असण्याचा अंदाज आहे. हा प्रकल्प ऊर्जा क्षेत्रात चीनसाठी वरदान ठरू शकतो. तथापि, जगातील सर्वांत मोठा कार्बन उत्सर्जक चीन कोळशावर चालणाऱ्या ऊर्जेपासून दूर जाऊ शकेल.

चीनचे हे धरण उभारणे हवामानबदल कमी करण्याच्या जागतिक प्रयत्नांनाही मदत करू शकते. तरीही काही सुरक्षातज्ज्ञ या प्रकल्पाला 'वॉटर बॉम्ब' मानतात. बर्फाचा अभाव आणि पर्जन्यचक्रात बदल यांचा थेट समाजावर परिणाम झाला. ग्रामीण अर्थव्यवस्थाही कोलमडली. पाऊस आणि बर्फवृष्टीअभावी उत्तराखंडची ग्रामीण अर्थव्यवस्थाही उद्ध्वस्त झाली. आजही उत्तराखंडच्या डोंगराळ जिल्ह्यांमधील ८० टक्क्यांपेक्षा जास्त शेती पावसावर अवलंबून आहे. सरकारच्या उदासीनतेमुळे केवळ शेतेच ओसाड झाली नाहीत, तर पशुपालनावरही गंभीर परिणाम झाला. उत्तराखंडमध्ये शेती आणि पशुपालन हे एकत्रित जीवनशैलीचा भाग आहेत.

शेतातील पेंढा, गवत आणि पिकांचे अवशेष हे प्राण्यांसाठी मुख्य चारा आहेत, तर प्राणी शेती आणि इतर कारणांसाठी खत पुरवतात. हे एक पूरक चक्र आहे, त्याने डोंगराळ समुदायाला पिढ्यान्‌पिढ्या स्वावलंबी ठेवले आहे. हे चक्र तुटताच ग्रामीण व्यवस्था कोलमडू लागली. हिमालयीन शिखरे काळी पडल्याने जगाचे लक्ष वेधले गेले आहे. या हंगामात एकेकाळी बर्फाने झाकलेल्या औलीसारख्या टेकड्या अंधारात आल्या आहेत. हवामानशास्त्रज्ञांच्या मते यावेळी बर्फाच्या पांढऱ्या चादरीने झाकलेले हिमालयीन पर्वत आता कोरडे आणि खडकाळ दिसत आहेत. १९८० ते २०२० या कालावधीतील सरासरीच्या तुलनेत, गेल्या पाच वर्षांतील बहुतेक हिवाळ्यात बर्फवृष्टीत लक्षणीय घट झाली आहे. भारतीय हवामान खात्याच्या मते, डिसेंबरमध्ये उत्तर भारतातील बहुतेक भागात नगण्य पाऊस पडला. जानेवारी ते मार्च दरम्यान उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखसारख्या प्रदेशांमध्ये पाऊस सरासरीपेक्षा ८६ टक्के कमी होऊन बर्फवृष्टी होऊ शकते, असा अंदाज आहे. जागतिक तापमानवाढीमुळे युरोपमध्येही हे संकट दिसून येत आहे. जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि ईशान्येकडील प्रदेशदेखील बर्फवृष्टीच्या अभावामुळे प्रभावित आहेत. उत्तराखंडला सर्वाधिक फटका बसला आहे. या वर्षी कमी झालेल्या बर्फवृष्टीचे मुख्य कारण म्हणजे पश्चिमी विक्षोभ कमकुवत होणे. पूर्वी भूमध्य समुद्रातून येणारे थंड वारे हिमालयीन प्रदेशात मुबलक हिमवृष्टी आणत असत. हिमालय आता 'दुहेरी धक्क्या'ला तोंड देत आहे. एकीकडे, जुन्या हिमनद्या वेगाने वितळत आहेत आणि दुसरीकडे नवीन बर्फ जमा होत नाही. हिमरेषा सुमारे ६० मीटरने कमी झाली आहे. ही परिस्थिती भविष्यात दक्षिण आशियाच्या मोठ्या भागासाठी गंभीर पाणी आणि पर्यावरणीय संकट निर्माण करून जलस्रोत, शेती आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतो. शास्त्रज्ञ याला 'बर्फाचा दुष्काळ' म्हणत आहेत, जो भविष्यात मोठ्या जलसंकटाकडे निर्देश करतो. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)





## पायी विसावलो । भाग्यवंत (भाग्यवान) ।।

पुण्यवान आम्ही । भक्त विठ्ठलाचे ।।
येऊ नित्य वाचे । हरिनाम ।।१।।

परमानंदी वाट । आम्हा दिंडी-वारी ।।
गाथा-ज्ञानेश्वरी । श्रेष्ठ ग्रंथ ।।२।।

सगुण-निर्गुण । भेद नसे ठाव ।।
गोविंदची भाव । एक आम्हा ।।३।।

टाळ-मृदुंग हे । आमुचे साधन ।।।
गंधर्वी भजन । विठू डोले ।।४।।

ओवी-अभंगाशी । एकरूप झालो ।।
पायी विसावलो । भाग्यवंत ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## माझे घर!

भिंतीची एवढी पडझड की सूर्याची किरणे
थेट छेदावी आरपार इतपत !
पारदर्शक काचेप्रमाणे झालेली माझ्या
पडक्या घराची गत !
कुणाचे असावे का असेही घर ?
व्यक्त केले त्याने त्याचे निर्भीड मत !
माणसांची मने जिथे जपली जातात,
अन् जपल्या जाते जिथे माणसांची पत !
भावना जोपासणारे अन् नाते जपणारे
असेच आहे माझे घर, माझे घर
खबरदार देवा कुणाचीही दृष्ट
घराला माझ्या लागू दिली तर !

सुनील घावट

## मी

मी मी नाहीच, तर माझे काय?
मी जर इथेच, तर येणे जाणे काय!
अंतर श्वासां धील, रोज मोजतो मी!
मी देह नाहीच, तर भिणे काय!
जगण्या मरण्याच्या खुळ्या कल्पना जर,
तर रोज इथे जगणे अन् मरणे काय!
नाशवंत दुनिया सारी, यात शंका काय?
जोडिले द्रव्य आजवर, यात पुरुषार्थ काय!
जर आदि, अनादि, अनंत मी,
तर येणे काय अन् जाणे काय!
ओळख पटता परमात्म्याची,
आनंदा पारावार तो काय!

मोरेश्वर बेलसरे

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# लग्नगाणी : अभिजात लोकवाणी

भारतीय संस्कृतीत सोळा संस्कारांपैकी सर्वात आनंददायी संस्कार म्हणजे लग्नविधी; आणि या लग्नविधीच्या आशयाला अनुसरून असंख्य लग्नगीते मौखिक लोकपरंपरेच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीने जोपासली. प्रत्येक जाती-जमातीत लग्नविधींबाबत भिन्नता आहे. पण त्या विधींमागचा विचार सारखाच आहे. संस्कृती एकात्म आहे. आपली संस्कृती कलासक्त आहे. तिचा गळा गोड आहे. तिच्या पायात नाद आहे. चालण्यात लय आहे. लग्न असो किंवा लग्नानंतरचे सणसमारंभ असोत, कोणत्याही जाती- जमातीत लग्नप्रसंगी गायलेली गीते आणि तालावर थिरकलेले पाय कानाला गोड वाटतात आणि दृष्टीला सुखच देतात. साने गुरुजींनी या सुमंगल लोकगीतांना 'वत्स-लतेचा सिंधू' असे म्हटले आहे ते उगीच नाही. लग्नगीतांनी मराठी संस्कृतीला आशय समृद्धतेचा मांडव घातला. आजच्या जगात लग्नव्यवस्थाच मोडीत निघालेली दिसते. त्यामुळे लग्नगीते कुठेतरी अडगळीत पडलेली दिसतात. त्यांचे स्मरण झाले तरी आपल्या प्राचीन आशयघन संस्कृतीबद्दल मायेची सय दाटून येते.

आपल्याकडे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम आजही प्रचलित आहे. अजूनही पारंपरिक चौकटीत लग्न ठरवताना 'मुलगी पाहणे' हा शब्द वापरतातच. स्त्रीवादी मनाला हा प्रकार फारसा पटणाराच नाही, पण अजूनही आपल्या पारंपरिक विवाहसंस्थेची ही पहिली पायरी आहे. नवरा मुलगा आणि मुलगी यांची नजरानजर या प्रसंगातून पहिल्यांदाच होते. या गोड प्रसंगाचे वर्णन सुमधुर लोकगीतांमधून झालेले आहे. अशा लोकगीतांच्या संकलनाचे महत्त्वाचे काम तारा परांजपे यांनी केलेले आहे.

**'नवरी पाहे आले। बसले अंगणी।। नवरी शुक्राची चांदणी। नवरी पाहे आले। ढालजी थोपले।। चंद्रज्योतीला दिपले।।'** लोकगीतांमध्ये वापरली गेलेली शब्दकळा केवळ अवर्णनीय असते. लग्न ठरते आणि घरात लगबग सुरू होते. आत्यामावश्या घरी मुक्कामाला येतात. आंब्याच्या झाडाची फांदी, उंबराच्या झाडाचा फाटा, हळकुंड, सुपारीची परचुंडी घराच्या बाहेरील खिडकीस बांधली जाते. दारावर तोरण झुलू लागते.

**'लगीन घरामध्ये मुहूर्तमेढीचा पाया। बाळाच्या लग्नाला आली सत्त्वाची अनुसूया।।'**

आंबा प्रजोत्पादनाचे प्रतीक मानले जाते. हळकुंड,



सुपारी, उंबर ही सर्व सर्जनशीलतेची प्रतीके मुहूर्तमेढीला हवीच असतात. दारी मांडव घातला जातो. घरात काहीसे गंभीर वातावरण पसरते. मांडव उभारणीनंतर देवक बांधून तेलहळदीच्या विधीने प्रत्यक्ष लग्नसंस्कारांना सुरुवात होते. साऱ्यांच्या मनात हुरहुर दाटते. मुलगा सुखी राहील का, सून कशी नांदेल या विचारांनी घरातल्या माणसांचं मन व्याकूळ व्हायला होतं.

**'मांडव घातीला। चार कोन गं साधून।। उभा कंबर बांधून। गणराज।।'** प्रत्यक्ष गणराजच मांडव बांधणीला कंबर कसून उभा आहे. त्यामुळे कोणतेही अनिष्ट येणार नाही, अशी खात्रीच सर्व मंडळींची झाली असते. देवक बांधतेवेळी गाणी म्हटल्यावर भूतबाधा होत नाही. देवक म्हणजे घरातल्या कुलदेवतेची पूजा. काही जाती- जमातीत वृक्षाचे मूळ घेऊन किंवा पक्ष्याचे पीस घेऊनही देवक बांधले जाते. वृक्षांच्या मुळाशी कुलदेवतेचा वास असतो असं म्हणतात. एकदा देवक बांधले आणि कोणतीही आपत्ती आली तरी मंगलकार्य होणारच ही खूणगाठ आपल्या संस्कृतीने बांधून दिलेली आहे.

**'दहीभाताची शिदोरी। देवक्या चालला डोंगरी।। त्याच्या खांद्यावर कुऱ्हाडी। त्यानं तोडली सौंदडी।।'** देवकासाठी सौंदडी म्हणजे शमीच्या झाडाची फांदी त्याने तोडली आहे. देवक बांधण्याचे केवढे मधाळ वर्णन या लोकगीतातून करण्यात आले आहे. घाणा भरण्याच्या कार्यक्रमात नवऱ्या मुलाला त्याच्या घरी किंवा मुलीला तिच्या घरी पाटावर बसवून गेवळीतले म्हणजे शेतावरील गहू मुसळाने कांडत गाणी गायल्या जा-तात. त्यांच्या कपाळाला पाच वेळा मुसळ लावलं जातं. घराची समृद्धी यानिमित्त दाखवली जाते. या विधीचा आणखीन एक हेतू असू शकतो. घरात लग्नाच्या निमित्ताने धान्याचा साठा केला जातो.

**'घाणा गं भरीयला। खंडीभर जिऱ्याचा।। मंडप गं हिऱ्याचा। लखलखाट।। घाणा गं भरीयला। खंडीभर गव्हाचा।। मंडप देवाचा। शोभिवंत।।'** सुवासिनी दळण दळताना सुरेल गाणी म्हणतात. लग्नाच्या काही दिवस अगोदरही घाणा भरता येतो. हळदीच्या विधीला लग्नामध्ये फार महत्त्व आहे. वरवधूला हळद लावण्याची प्रथा प्राचीन आहे. संत एकनाथांनी हळदुलीची कथा रुक्मिणी स्वयंवराच्या वेळी सुंदर गुंफली आहे.

रुक्मिणीचा हळदी समारंभ सुरू असतो, पण ती कृष्णाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असते. रुक्मिणी म्हणते, मला ओतप्रोत भक्तिरसात भिजलेल्या हरिभक्तानेच हळद लावावी आणि जेव्हा एक सामान्य हरिभक्त तिला हळद लावतो तेव्हा ती विलक्षण उजळून निघते. कारण हळदुली हरिभक्तीने भिजलेली असते. जेव्हा आंब्याच्या पानाने पायापासून डोक्यापर्यंत हळद लावली जाते तेव्हा 'हळद चढवणे' हा शब्दप्रयोग केला जातो. आदिवासींच्या लग्नातदेखील हळद चढविण्याची प्रथा आहे.

दुर्गाबाई भागवतांनी होशंगाबादमधील तेलहळदीचे सुंदर गाणे संकलित केले होते. 'आनो आनो रे तेल तेलिन बाई, आनो आनो बाई ठिपाभर हलदी, सातही भवर तेल चघाय, सातही सुहासिन हलदी चघाय...' 'अगं तेलीण बाई, तेल आण. टोपलीभर हळद आण. साती फेऱ्यात तेल लावायचे आहे. सात सुवासिनी हळद लावणार आहेत.' मंडल्याच्या गोंडाचे सुंदर गाणं आहे. 'डोंगर उपर दियन बरत है, जेखर मैया होथय उंजार, रामे लछमनला हलदी चढत है, जेखर मैया होथय उंजार।' (डोंगरावर दिवा जळतो आहे. कोणाच्या बरे आईला हुरहुर लागली आहे मनात? मुलीचे तोंड कोमेजले आहे.

सीतेला हळद लावत आहेत आणि तिच्या आईला हुरहुर लागली आहे.) लग्नमांडवात रुखवत मांडलं आहे, पण आता विहीणबाईंना कसं शोधायचं? 'जोडवी मिरविती विहीणबाई, पिवळ्या पायांनी दारी येई... सईबाई गं.. सखुबाई गं...' हळदीच्या पायांवरून अस्सं विहीणबाईला शोधणंसुद्धा आपल्या संस्कृतीने सुरांच्या कोंदणात जपून ठेवलेलं आहे. रुखवताच्या भोवती आयाबाया जमल्या आहेत. दुरड्यांवरती विणलेले क्रोशाचे रुमाल झाकून ठेवले आहेत. वरमायने रुखवत स्वीकारायलाच हवे! दुरडीवरचा रुमाल काढून सखुबाई म्हणते, 'आला आला रुखवत, त्यात होती आरती, उघडून बघते तर विठ्ठलाची मूर्ती!' एखादी खडूस शेजारीण म्हणते, 'आला आला रुखवत, दणाणला हंडा, उघडून बघितलं तर अर्धाच मांडा!' गद्यपद्याच्या सीमेवरचे हे उखाण्याचे पक्षी सणसमारंभात प्रतिभेचे पंख लावून स्वच्छंद विहरत असतात. आता सप्तपदीचा विधी सुरू होतो. होमाच्या उत्तरेकडे तांदळाच्या सप्तराशी ठेवल्या जातात आणि वधूला प्रत्येक राशीवर उजवे पाऊल ठेवायचे असते. आदिवासींमध्ये खांबाभोवती सात फेरे घेण्याची प्रथा आहे. सात फेऱ्यांच्या वेळेची बिंद्रा नवागडच्या कमारांची प्रणयधुंद गाणी आहेत.

**'उबरिला छिंचन घरे कोत्री, अलंकधन बैठे घरे तोत्री, करिया बेल पूंछी चावरिया, रैमलीन और मै एक जंवरिया ।।'** 'रैमलून' हे प्रियकराने प्रेयसीचे प्रेमाने ठेवलेले नाव असते. सात फेरे घेताना प्रियकर म्हणतो आहे, रैमलीन, मी अख्खे तळे धुंडाळले. तेव्हा कुठे मासोळी हाती आली. इथल्या माणसांना आपले लग्न पसंत नाही. पण त्याच्याशी आपल्याला करायचं काय? काळ्या बैलाच्या शेपटीला सोन्यारुप्याच्या चवरीची शोभा असते ना! तसेच आम्ही दोघे एकमेकांना अनुरूप आहोत. आता पाठवणीची वेळ येते. आई-वडिलांच्या डोळ्याला धार लागते.

**'नवरी आली सोन्याची, वरात आली ढोलाची, ढोल ताशे वाजती पुढे, घोडा नाचे तोरणी...'** छत्तीसगडच्या गोंडांची वरातीची गाणी फार उत्कट आहेत. 'घवई अडे है घवईनी, खरीवह अडे है गाय, बिटिया अडे है अपने मायमैकुला, बिना पठोनी न जाय' घवईची फांदी महाचिवट असते. मोठ्या झाडाला धरून बसते. गाय शेतातल्या आपल्या ओळखीच्या जागी अडून बसते. तशीच मुलगीसुद्धा माहेराला सोडत नाही. पाठवणी केल्याशिवाय जात नाही.' विवाह संपन्न झाल्यावर कालांतराने-

**'लाडक्या राणीला लागले डोहाळे, पुरवा सोहळे रामराया। आनंदी आनंद कोंदला मंदिरी, सौभाग्यसुंदरी सीता माई।।'** ही गाणी डोहाळे जेवणात गायल्या जाऊन स्त्रीच्या सृजनत्वाचा गौरव आपली संस्कृती करते. मूल जन्माला आले की घराचे आनंदगोकुळ होते. मुलाचे नाव ठेवताना जी गाणी गायली जातात त्यांना 'पाळणे' असे म्हणतात. बाळाच्या जन्मापासून त्याच्या कानावर चांगले शब्द पडावेत म्हणूनच या पाळण्याचे प्रयोजन आहे. पाळणे देवतांविषयी असतात आणि काही ऐतिहासिक व्यक्तींवरही आधारलेले असतात. 'मथुरेमध्ये अवतार धरिला, कृष्ण देवकीच्या गर्भाशी आला, तोडुनी बेड्या बंदीवास सोडीला, चरणांच्या प्रतापी मार्ग दाखविला, जो बाळा जो जो रे....' मूल शांत झोपावे म्हणून गायली जाणारी अंगाई गीते स्त्रीच्या वात्सल्यभावाचे उत्कट अविष्कार आहेत. **'पाळणा पाळणा, मोत्याचा खेळणा। जोजविते बाई, माझा लाडका चिमणा।।'** लहान मुलांची बडबड गीतेदेखील अतिशय अर्थगर्भ आणि आपल्या संस्कृतीची निरागस लावण्यालेणी आहेत. त्यामध्ये शब्दांच्या ठेक्याला, तालाला आणि नादमाधुर्याला विशेष महत्त्व दिलं जातं. 'चांदोबा चांदोबा भागलास का, लिंबोणीच्या झाडामागे लपलास का, लिंबोणीचं झाड करवंदी, मामाचा वाडा चिरेबंदी...' किती इवलुसं बडबडगीत आहे हे. पण यात दिलेले संस्कार गहन आहेत. आपलं मूल दूर आकाशातल्या चांदोबाला विचारित आहे की, 'बाबा रे,तू कसा आहेस? चालून चालून तू दमला तर नाहीस!' आपली संस्कृती सतत दुसऱ्यांचा विचार करणारी संस्कृती आहे. दुसऱ्यांबद्दल आस्था बाळगणारी आपली संस्कृती आहे आणि हीच शिकवण या बडबडगीतामधून बाळाला मिळते आहे. अनेक युगांचे संदर्भ जपणारी ही सुमंगल लोकगीते बदललेल्या काळाची नवीन धून गात भगराळ मातीतून लवलवत वर येतील की लोकसंस्कृतीच्या भग्न अवशेषांची तोरणे भविष्यात दारोदारी स्वागताला उभी राहतील; काहीच सांगता येत नाही.

# प्रेम हे......!

**मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये प्रेम ही संकल्पना अगदी सुरुवातीपासून फार महत्त्वाची समजली गेली आहे. खरे तर जगाच्या पाठीवर मैत्री आणि प्रेम हे दोन नातेच हे मानवी मनाने स्वीकारलेले असतात. इतर नाते हे जैविक दृष्टीने किंवा कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर व्यक्तींवर लादले गेलेले असतात असे म्हणायला हरकत नाही. मैत्री आणि प्रेम ह्या खरे तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र त्यातही नैसर्गिक प्रवृत्तींना प्राधान्य देत स्त्री आणि पुरुष यांचे प्रेम ही संकल्पना मानव सृष्टीची एक गरज बनली आहे.**





साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

असं म्हणतात की एकदा वाळवंटातून एक मौलाना ईश्वराचे (अल्लाहचे) नामस्मरण करत जात असताना एक वेडसर आणि कफल्लक असा मनुष्य त्याच्या शेजारून जात होता. अल्लाहचे नामस्मरण करणाऱ्या मौलवीकडे त्यांने वळूनही पाहिले नाही. तो स्वतःच काही अक्षरे बुटबुटत चालला होता. ईश्वराच्या नावाकडे दुर्लक्ष करून जाणाऱ्या त्या मग्रूर अशा तरुणाला मौलवीने आवाज दिला आणि म्हणाला अरे, कंबख्त रुक तो जरा, तेरा ध्यान कहा है? तरुण थबकला, मौलवी समोर आहे हे पाहून तो वरमला आणि म्हणाला, क्या हुवा मौलाना, कुछ गलती हुयी क्या मुझसे? बेवकुफ, तू अपनी ही धून मे निकला है, मै अल्लाह का नाम लेकर सबकी खैरीयत मांगता चला हूं और तुझे उसका लिहाज ही नही मौलवी त्यांची कानउघडणी करत बोलले.

त्यावर तो बोलला, माफ किजिये मेरा ध्यान नही रहा, मै अपनी मेहबूब का नाम लेने मे इतना खोया था की अल्लाह का नाम सुनाई न दिया, त्यावर प्रचंड रागाने तो मौलवी म्हणाला, क्या तुझको तुम्हारे मेहबूब से उतनी मोहब्बत है जितनी मुझे मेरे अल्लाह से है बंदगी है? त्या हसून तो तरुण म्हणाला, हा मौलासाब यकीनन आपकी अल्लाह से जो बंदगी है उससे ज्यादा मुझे अपने मेहबूब से मोहब्बत है, क्योकी जब आप अल्लाह का नाम लेकर चले है तब मै किसीं और का नाम ले रहा हूं इसका होश तो आपको है, मगर मै लैला लैला करते हुए अपनी धूनमे इस कदर चला हूं की मुझे ना आप दिखायी दिये, ना अल्लाह का नाम सुनाई दिया....! असं म्हणून तो तरुण निघून गेला.

जर त्या मौलवीने किंवा आपणही वरील किस्सा एकदा विचारात घेतला तर खऱ्या अर्थाने प्रेम भावना कशी जोपासली गेली पाहिजे याची जाणीव होते. प्रेमाच्या भावनेमध्ये जगाचा विसर पडतो तो हा असा, नाही का?

मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये प्रेम ही संकल्पना अगदी सुरुवातीपासून फार महत्त्वाची समजली गेली आहे. खरे तर जगाच्या पाठीवर मैत्री आणि प्रेम हे दोन नातेच हे मानवी मनाने स्वीकारलेले असतात. इतर नाते हे जैविकदृष्टीने किंवा कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर व्यक्तींवर लादले गेलेले असतात असे म्हणायला हरकत नाही. मैत्री आणि प्रेम ह्या खरे तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र त्यातही नैसर्गिक प्रवृत्तींना प्राधान्य देत स्त्री आणि पुरुष यांचे प्रेम ही संकल्पना मानव सृष्टीची एक गरज होऊन बसली आहे. भारतीय संस्कृतीमधील पुराण साहित्याचा विचार केला असता शिवपार्वती, विष्णू आणि लक्ष्मी अशा संकल्पना मधून प्रेम ही संकल्पना आपल्या मनावर बिंबवली गेलेली आहे. रामायण आणि महाभारत या महाकाव्याच्या काळात रामायणामध्ये व्यवस्थावादी स्त्री पुरुष संबंध असले तरी पतीच्या प्रेमापोटी राजमहालाचे सुख त्यागून पतीसोबत वनवासात जाणारी सीता ही एक आदर्श पत्नी असून, स्त्री- पुरुषाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून सीता आणि राम भारतीय संस्कृतीमध्ये रूढ झाले. मात्र खऱ्या अर्थाने प्रेम हे कोणत्याही चौकटी शिवाय करता येते याचा खरा वस्तूपाठ कृष्णाच्या चरित्रातून भारतीय समाज मनावर बिंबविला गेला. राधा आणि कृष्ण हे प्रेमाचे परिमाण समजले जाऊ लागले.

कृष्णाच्या जीवनात रुक्मिणीला किंवा सत्यभामेला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा किंचित जास्त महत्त्व राधा ह्या त्याच्या प्रेयसीला असल्याचे आपल्याला दिसून येते. महाभारतातील दुष्यंत शकुंतला यांच्यातील प्रेमाची कथाही तेवढीच महत्वाची, शिवाय कच शर्मिष्ठा आणि देवयानी या तिघांच्या परस्पर संबंधातून प्रेम, मत्सर द्वेष त्याग या सर्वांची परस्पर संगती कशी असते ते स्पष्ट होतेच. पांडव पत्नी द्रौपदी ही जरी पाच पांडवांची पत्नी असली तरी त्यच्याा अंतिम प्रवासात तिचे सर्वात जास्त प्रेम अर्जुनावर असल्याचे सुतोवाच धर्मराज करताना दिसतो. यावरून स्त्रियांच्या मनात तडजोडीमुळे एखादेवेळी संसार गाडा कुणासोबतही चालवण्याची वेळ आली तरी त्यांच्या मनातील खरे प्रेम आपल्या कर्तृत्वाने त्या स्त्रीचे मन जिंकून घेणाऱ्या पुरुषावर असते असे म्हणायला हरकत नाही.

विल्यम शेक्सपियरच्या रोमीयो आणि ज्युलियट पासून हिर आणि रांझा, लैला आणि मजनू, युरेडिस आणि ऑरफियस अशा अनेक प्रेम कथा जागतिक स्तरावरील साहित्यामध्ये प्रेमाचे उदात्तीकरण करणारे साहित्य म्हणून प्रसिद्ध पावल्या आहेत. मात्र ह्या सर्व प्रेम कथा ह्या एक प्रकारच्या शोकात्मिका होत्या. कदाचित सुखात्मक शेवट वाचकांच्या डोळ्यात पाणी आणणार नाही म्हणून एक दुजे के लिए या चित्रपटामधील वासु सपना ही पात्रे सुद्धा ठराविक कालावधीनंतर एकमेकांना भेटून समुद्रात उडी घेतात. एक दुजे के लिए या चित्रपटात वासू आणि सपना एक वर्ष अंतर राहण्याची अट पूर्ण करतात आणि अट पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबाने त्यांचे लग्न करून देणे हा चित्रपटाचा सुखांत कथा लेखकाला आणि दिग्दर्शकाला का आवडला असेल? हे मला सांगता येणार नाही. मात्र प्रेमाची परिणीती सुखात होत असताना नायिकेची अब्रू लुटून घेणारा व्हिलन आणि आता तिचे शरीर शुद्ध नाही म्हणून ती आपल्या उपयोगाची नाही आणि तिच्या शिवाय आपल्याला जगणे शक्य नाही म्हणून तिच्यासह समुद्रात जीव देणारा कमल हसन लोकांना का आवडला असेल? त्यापेक्षा पत्नीवर अतिप्रसंग झाला तरी तिला समजून घेणारा घर ह्या चित्रपटातील विनोद मेहराचे प्रेम मला नितळ वाटले, अशारीरिक वाटले तो भाग सोडला तरी एक दुजे के लियेमधील मरून प्रेमाला अमर करणे ही संस्कृती पुढे प्रेमाला मारणे किंवा प्रेमासाठी स्वतः मरणे या मानसिकतेपर्यंत पोहोचली. खरं तर माणसाचा रुबाब हा नैसर्गिक असतो म्हणून रांझा बनून हिरसाठी भटकणारा राजकुमार हा कलावंत गरीब आणि दीन असलेला आपल्याला आवडत नाही. मग तो चित्रपट म्हणून का असत नाही.

प्रेम हा शब्द खरोखरच मनामध्ये टोचावा असा आहे का? नाही नक्कीच नाही. मात्र आजच्या काळात आकर्षण आणि प्रेम यातील फरकच समजून घेण्यात समाज आणि त्यातल्या त्यात तरुण पिढी अयशस्वी ठरत आहे. शारीरिक आकर्षण ह्या पलीकडे जाऊन मानसिक पातळीवरील प्रेम काय असते? हे नेमकेपणाने कुणाला उमगत नाही. दर चार सहा महिन्याला आपला जोडीदार बदलणाऱ्या चित्रपट कलावंतांच्या लव्ह स्टोरी आजच्या तरुण पिढीच्या समोर प्रेरणा म्हणून उभ्या आहेत हा आजच्या काळातील प्रेमाच्या उथळपणाचा दाखला आहे. एकदा एका ब्रेकअप झालेल्या नव्हे तर एका मुलीला प्रपोज करून लग्नासाठी तयार झालेल्या मुलीला स्वतः प्रपोज करणाऱ्या मुलानेच लग्नासाठी नकार दिला? त्याने ते कारण दिले ते ऐकून मला धक्का बसला, तो म्हणाला, मी तिला एकदा प्रपोज केले आणि तिने लगेच होकार दिला आणि माझ्या गाडीवर बसून लॉन्ग ड्राईव्हवर आली याचा अर्थ माझ्या आधी तिला कोणी प्रपोज केले असेल तर ती त्याच्यासोबतही लॉन्ग ड्राईव्हर गेली असेलच. इतकी फ्री विचाराची बायको माझा संसार कसा चालवेल? त्याच्या अशा विचारामुळे त्याची कीव करावी की त्याच्यासाठी आपल्या घरच्यांचा विरोध करणाऱ्या मुलीची कीव करावी? असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला.

आजच्या पिढीला जीन्स मधली गर्लफ्रेंड पाहिजे मात्र बायको साडीमधीलच पाहिजे, आपण कुणाच्यातरी बहिणी सोबत प्रेमाच्या आणा- भाका घ्याव्या, मात्र आपल्या बहिणीला सातच्या आत घरात यावे असा आपला हेका असतो. प्रेम करावे की न करावे हा व्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. मात्र प्रेमाच्या नावाने आयुष्याची वाट सोपी होत असत असा भ्रम मनात न ठेवता काही चुकीचा अट्टाहासामुळे ती आणखी अवघड होऊ शकते याची जाणीव तरुण पिढीने ठेवली पाहिजेत. पुन्हा कुणा एका व्यक्तीसाठी त्या व्यक्तीच्या प्रेमासाठी आई वडील बहीण भाऊ नातेवाईक यांच्याकडून मिळणारे प्रेम दुरावणार असेल तर प्रेम प्रेम ज्याला म्हणतात त्याबद्दल नव्याने विचार करावा लागेल. शारीरिक आकर्षणाच्या पलीकडे जाऊन विशुद्ध प्रेम म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहेच.

एकमेकांच्या भावनांचा सन्मान करणे, प्राप्ती पेक्षा समर्पण आणि त्याग ह्यात आनंद मानने, वासना आणि शारीरिक आकर्षण याच्या पल्याड जाऊन एकमेकांच्या सहवासात एकमेकांच्या आदराची भावना जोपासणे, अहंकार आणि घृणा यांचा चुकूनही स्पर्श न होणे अशा काही जाणीवा मधून शुद्ध प्राप्त होऊ शकते.

**एक प्यार का नगमा है, मौजोकी रवानी है**
**जिंदगी और कुछ भी नही 'तेरी मेरी कहाणी है**

समुद्राच्या लाटांप्रमाणे जीवनामध्ये अनेक चढ-उतार येत राहणार. प्रचंड आवेगाने येणारी सुख दुःखाची लाट जीवनाच्या किनाऱ्यावर आदळणार हा निसर्ग नियम आहे. निसर्ग त्याचे कार्य करतो आहेत संपूर्ण सृष्टीचे कार्य करत आहे, ती करतच राहणार मात्र कोणत्याही क्षणी, सुखात किंवा दुःखात एकमेकांचा विसर न पडता एकमेकांना जपणे हीच विशुद्ध प्रेमाची खरी व्याख्या होय. आज जरी अभावाने हे खरे प्रेम सापडत असले तरी स्वच्छ आणि सच्चा मनाच्या माणसाची ते कायमस्वरूपी वाट पाहत असते. आपण जितके प्रांजळ असणार तितकी प्रांजळ व्यक्ती आपल्याला भेटत असते हेही लक्षात ठेवणे गरजेचे आहे. निर्मळ पाणी स्वच्छ काचेच्या भांड्यात जास्त आकर्षक दिसते असे समजायला काही हरकत नाही. ना उम्रकी सीमा हो, ना जन्म का हो बंधन या प्रसिद्ध गीताच्या ओळीप्रमाणे खऱ्या प्रेमाला कोणतीही सीमा नसते. मात्र जात धर्म या द्वेष पूर्ण जंजाळात ऑनर किलिंग पासून अनेक प्रेमीयुगलांच्या आत्महत्या अशा अनेक घटना पाहायला मिळत आहेत.

अर्थात वर्तमान काळातील पूर्णतः अस्वस्थ काळात आणि अंधकारमय भविष्याचा विचार करून आजच्या तरुण वर्गाने सकारात्मक वळणावर काही ठोस निर्णय घ्यायला हवेत. जे आई वडील आपलं संपूर्ण आयुष्य लेकरांचे जीवन घडविण्यासाठी गहाण ठेवतात, अर्पण करतात (पान ६ वर)

# हाय स्पीड कॉरिडॉर्स: ५ बिझनेस हब्स जोडणार




वेध
प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

हाय स्पीड कॉरिडॉर्समुळे पाच बिझनेस हब्स जोडले जाणार आहेत. त्यातील एक तीर्थस्थळ (वाराणसी)दिल्लीशी जोडणारा, दुसरा वाराणसीला सिलिगुडीशी जोडणारा. चला बघुया किती महत्वाचे आहेत. हे हाय स्पीड कॉरिडॉर्स. हे कॉरिडॉर्स पूर्ण व्हायला १० ते १५ वर्षे नक्की लागतील आणि खर्च सद्यस्थितीत अंदाजे २.५ लाख ते ३.०० लाख करोड रुपये. सध्याच्या जास्तीत जास्त १८० किमी/तासवरून साधारण ३०० किमी/ तास असा असेल. तरीही त्याचे महत्व जाणून घेऊ...

१. मुंबई, पुणे भारताची आर्थिक राजधानी महाराष्ट्रातील IT हबशी जोडणार. १५० किमी, सध्याचा वेळ साधारण २ तास ४५ मिनिटे. हाय स्पीड नंतर ४० ते ४५ मिनिटे.

२. पुणे, हैदराबाद दोन्ही IT हब एकमेकांशी जोडणार. ६०० किमी, सध्याचा वेळ साधारण १० तासांपेक्षा जास्त. हाय स्पीडनंतर साधारण २ तास २० मिनिटे.

३. हैदराबाद, बंगळुरू दोन्ही IT हब एकमेकांना जोडणार. ५०० किमी, सध्याचा वेळ साधारण ८ तासांपेक्षा जास्त. हाय स्पीडनंतर २ तास १५ मिनिटे.

४. हैदराबाद, चेन्नई दोन्ही IT हब एकमेकांशी जोडणार. ६५० किमी, सध्याचा वेळ साधारण १० तासांपेक्षा जास्त. हाय स्पीडनंतर २ तास ३० मिनिटे.

५. चेन्नई, बंगळुरू दोन्ही IT हब एकमेकांशी जोडणार. ३६० किमी, सध्याचा वेळ साधारण वंदे भारतने ५ तास. हाय स्पीडनंतर साधारण १ तास २० मिनिटे.

६. दिल्ली, वाराणसी. दिल्लीला अध्यात्मिक केंद्राशी जोडणार. ८१३ किमी, सध्याचा वेळ साधारण १० तासांपेक्षा जास्त(शताब्दी). हाय स्पीडनंतर साधारण ३ तास ५० मिनिटे.

७. वाराणसी सिलिगुडी अध्यात्मिक केंद्राला, देशाच्या एका महत्वाच्या स्थानाशी जोडणार. तिथूनच पुढे ईशान्य भारतातील प्रदेशांशी आपोआप संपर्क व्यवस्था वेगवान होईल. साधारण ७२४ किमी, सध्याचा वेळ साधारण १६ तासांपेक्षा जास्त. हाय स्पीडनंतर २ तास ५५ मिनिटे.

**आता मुख्य काही मुद्दे पाहूया...**

मुंबई, चेन्नई सध्याचा सुपर फास्ट एक्स्प्रेसने साधारण २२ तास लागतात. पण हाय स्पीडनंतर मुंबई- पुणे- हैदराबाद- चेन्नई या रुटने गाड्या बदलणं, इत्यादी सर्व वेळ पकडून साधारण ६ तास ३० मिनिटे लागू शकतात.

दिल्ली, सिलिगुडी सध्या साधारण २० तास लागतात. पण हाय स्पीडने हेच अंतर दिल्ली वाराणसी आणि वाराणसी सिलिगुडी जास्तीत जास्त ७ तासात पार केलं जाईल. आता असा रूट करण्याचं कारण म्हणजे त्या मार्गातील काही शहरं जोडून, प्रगती पुढे नेता येईल.

अगदी मुंबई, बंगळुरू डायरेक्ट साधारण १८ ते २० तास लागतात. हेच हाय स्पीडनंतर via पुणे, हैदराबाद आणि बंगळुरू मार्गे जास्तीत जास्त ६ तास लागतील. यात फक्त वेगाचा प्रश्न नाही, तर लवकर पोचून एखादा व्यक्ती त्याच दिवशी काम उरकून आपल्या घरी परत येऊ शकतो.

यात अजून एक hidden उद्देश हा सुद्धा असेल की, उद्या युद्धजन्य परिस्थितीत सैन्याच्या जलद हालचालीसाठी या सोयींचा उपयोग होऊ शकतो.

उदाहरणार्थ, सिलिगुडीसारख्या संवेदनशील आणि सुरक्षेच्यादृष्टीने महत्वाच्या स्थानाशी दिल्ली, वाराणसी आणि वाराणसी सिलिगुडी असं जलद गतीने काही तासांच्या अवधीत सैन्याची हालचाल करणं शक्य होईल. म्हणजेच या सर्व कॉरिडॉर्सची घोषणा इकॉनॉमिक, इन्फ्रास्ट्रकचर, स्ट्रॅटेजिक अशा अनेक दृष्टीने आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे २०४७ पर्यंत, सद्यस्थितीतील विकास अग्रणी भारताला, पूर्ण विकसित भारत करण्यासाठी दळणवळण सोयी, सुविधा ही खूप मोठी पायाभरणी असणार आहे. हे मोदीं इतकं दुसरं कुणी जाणू शकेल, असं वाटत नाही.


**दळणवळण उद्देश-** अर्थातच वेग आणि दळणवळण सुविधा हा बऱ्याच अंशी प्रगतीचा, विकासाचा खूप महत्त्वाचा घटक व आधार आहे.

**आर्थिक उद्देश-** दळणवळण सोयींशी आर्थिक गुंतवणूक, कर्मचारी व्यवस्था, इत्यादी अनेक बाबी निगडित आहेत. व्यवस्थापकीय कर्मचारी हालचाली कमी वेळात, कमी पैशात आणि जलद गतीने होण्यासाठी या दळणवळण सोयी सुविधा यांचं महत्व अनन्यसाधारण आहे.

**धोरण व डावपेच उद्देश-**
देशाशी निगडित सुरक्षा व अनेक धोरणात्मक निर्णय हे अशा गतिमान व्यवस्थेशी निगडित असतात. अशा पब्लिक ट्रान्सपोर्ट व्यवस्थेने नेणं सोयीस्कर आणि सुरक्षित सुद्धा आहे.

**तंत्रज्ञान विकास उद्देश-**
भारताचं पाहिल्यापासून हे धोरण आहे की, जी सुविधा आपण आयात करतो, त्याचं तंत्रज्ञान सुद्धा आपण त्या अंतर्गत धरून मगच ती सोय वा व्यवस्था अंमलात आणतो. त्यामुळे मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात आपण तंत्रज्ञान घेऊन मगच जपान कडून हा प्रकल्प बांधून घेत आहोत. म्हणजेच भविष्यातील, हे घोषणा झालेले आणि घोषित होतील ते सर्व प्रकल्प आपण स्वतः तंत्रज्ञान घेऊन, स्वतः विकसित करू.

अर्थातच भविष्यात ही व्यवस्था आणि प्रकल्प आपण इतर देशांना बांधून देऊ शकतो. हा झाला दीर्घकालीन व्यापारी उद्देश. या सुविधा लवकरात लवकर पूर्ण होवोत, हीच सदिच्छा. या आणि अशा अनेक कॉरिडॉर्सची निर्मिती होऊन, भविष्यातील, विकसित, सुजलाम्, सुफलाम् भारत घडो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.




ललित
हेमा नागपूरकर

राजस्थानातील त्या रणरणत्या वातावरणात सकाळी साडेसातला ऊन चांगलंच जाणवू लागल होतं. मॉर्निंग वॉक करून परतलो तो घामाने चिंब भिजूनचं. आता पटकन आंघोळ करून तयार व्हायचा होतो. नेहमीच्या रुटीन कामात साडेआठ वाजता आम्ही कामाला सुरुवात करीत असतो.

माझा मित्र श्रीनिवास कधी त्याच्या तर कधी माझ्या गाडीतून सोबतच जायचो. राजस्थानातील एलओसीजवळच्या एअर बेस कॅम्पवर राहत असलो, तरी तिथला परिसर एवढा मोठा होता की, आम्हाला जवळजवळ १० किलोमीटर जावं लागायचं. माझं काम रडार नियंत्रण कक्षातलं. माझं युनिट जरा लांब होतं. मग मला सोडून श्रीनिवास आपल्या कामावर जायचा. आंघोळ-नास्ता करून तयार होतोय तोच बाहेरून श्रीनिवासची हाक आली. 'अमर चलो.' आम्ही माझ्या युनिटपाशी पोहोचलो तेव्हा श्रीनिवास म्हणाला, ''खाना साथ मे खायेंगे. मी येतो तुला न्यायला.'' 'बरं' असं म्हणत मी आत वळलो. हाताखालच्या स्टाफला आवश्यक त्या सूचना देऊन काही पेपर वर्क करू लागलो. तेवढ्यात माझा एक ज्युनिअर धावत आला. ''सर मॉनिटर पे देखो बहूत बडा हादसा हुआ है!'' मी मॉनिटर लावला. बैसास व्हॅलीत दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. बैसास व्हॅलीतील हे स्थळ अतिशय रमणीय हिरव्यागार वृक्षराजींनी वेढलेले; त्याला 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणतात. हनिमूनसाठी अथवा पर्यटन करण्यासाठी अनेक लोक तिथे येत असत. व्हॅली आत असल्याने तिथे मोबाईलसुद्धा चालत नसत. याचाच फायदा घेत दहशतवाद्यांनी तिथे निर्घृण हत्याकांड चालवले.

हिंदू की मुस्लिम असे विचारत हातातल्या बंदुकींनी त्यांनी तब्बल २६ लोकांचे प्राण घेतले होते. हे सगळं ऐकून सर्वांगातून संतापाची लहर शिरशिरत गेली. श्रीनिवासही आला तेवढ्यात. तोही संतापाने खदखदत होता. ''सुना तुमने! ये नापाक पाकडेही है इसके पीछे. चांगलं हानायला पाहिजे यांना! तब कई अकल ठिकाणे आयेगी'' या अतिरेकी दहशतवादी संघटना कोणाच्या छायाछत्राखाली राहतात, हे साऱ्या जगालाच ठाऊक होतं. पाकिस्तानी शासनकर्ते, पाकिस्तानी लष्कर या अतिरेक्यांचे बटिक आहेत. त्यांनी दिलेल्या पैशांचे मिंध्ये. हे माहीत असल्यामुळे त्याचा अगदी बीमोड म्हणजे पाकिस्तानवर हल्ला हे समीकरण असणार होतं. हल्ल्याच्या निषेधार्थ पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांनी दिलेले भाषण पुढल्या कारवाईची सूचना देणारे. 'असल्या अतिरेकी कारवाया आता खपवून घेतल्या जाणार नाहीत. दहशतवादाचे उच्चाटन करण्याचा आम्ही विडा उचलला असून दहशतवादाविरोधातील लढाई त्याचा संपूर्ण नाईनाट करूनच थांबेल.' पंतप्रधानाच्या या भाषणानंतर आता मोठे काहीतरी घडणार, अशी आम्ही सर्वांनीच अटकळ बांधली. दहशतवादविरोधातील लढाईचे भारताने जणू रणशिंग फुंकले. अर्थात पाकिस्तानच्या सीमेलगतच्या कुरापतींनी सगळे लष्करी जवान संतापलेले होतेच. दहशतवाद्यांना आणि पर्यायाने पाकिस्तानलाही धडा शिकवण्याची खुमखुमी होतीच. आम्हा सर्वांना तयार राहण्याचे आदेश मिळाले. यावेळची कारवाई बरीच मोठी असणार, याबद्दल शंकाच नव्हती. लष्करात दाखल झालेला प्रत्येक जवान युद्धजन्य परिस्थितीला तोंड कसे द्यावे, ती कशी हाताळावी याबद्दलचे ट्रेनिंग घेत असतो.

आपले कौशल्ये सिद्ध करण्यासाठी तो उत्सुक असतो. लष्करात दाखल होण्याला मला उणीपुरी दोन वर्ष झालेली. एवढ्या लवकर आपल्या शिक्षणाचा कस लागणार, आपल्याला आपले शौर्य दाखवायला वाव मिळणार या जाणिवेने समाधान वाटत होते. माझ्या इतर मित्रांचीही अशीच अवस्था होती. आम्ही सारे देशप्रेमाने भारावलेलो. जयशेमोहम्मद, लष्कर- एतोयबा, हिजाब- अल- मुजाहिद्दीमा या व अशा दहशतवादी संघटनांनी आलिशान कार्यालये आणि त्यांच्या प्रमुखांची अद्ययावत घरे पाकिस्तानात उभी आहेत, हे उघड गुपीत होतं. दहशतवाद्यांच्या लिडर्सना ताबडतोब आपल्या हवाली करण्यात यावे अन्यथा परिणामांना तयार असावे अशा आशयाचे पत्र भारताकडून दिले गेले. पाकिस्तानची अरेरावी अर्थातच कमी झाली नाही. दहशतवादाविरोधात आपण कारवाई करू शकतो, हे भारताने साऱ्या जगालापण जाहीर केले.

## झोपडीत माझ्या...

झोपडीत माझ्या असे
शेणामातीचा गिलावा
मायेचा तो रे ओलावा... लाखमोल
उखरल्या अंगणात
माय टाकतसे सडा
शिकवत असे धडा... जीवनाचा
भविष्य ते घडविल
शाळेतला तो रे फळा
जाऊ नको देऊ तडा... ई ानाले
राबताना रे शेतात
येई कष्टाचा तो वास
होईल रे तो सुवास... कवातरी
दळतसे माय माझी
जात्यावरी त्या दळण
बाप फोडी सरपण... भाकरीला
केलीच नाही कधीच
स्वतःची ती रे पर्वा
वेचला तो रे सर्वा...माझ्यासाठी
विसरले ते घ्यायला
क्षणभर ती उसंत
येण्यास तो रे वसंत... जीवनात
होऊन रे ती पणती
जलतसे दिनरात
बाप पणतीची वात... होता माझा
नको मन आता काही
दिले न मागता खूप
ईश्वराचं ते रे रूप... माय-बाप

प्रकाश इंगळे

## वापस जाणे नाही


भाग्याने नरजन्म लाभला
साधून घ्यावे काही.
जगणे म्हणजे आले तैसे,
वापस जाणे नाही...१
किडे माकोडे असंख्य असती,
मुंग्या-झुरळांचीही वस्ती,
त्यांच्या सम का जगणे व्हावे?
ऐसे कदापि करणे नाही...२
नाचून घ्यावे, गाऊन घ्यावे,
आनंदाने खिदळून घ्यावे,
मुक्त मनाने फिरून घ्यावे,
फिकीर उद्याची नाही...३
सुखासीन जरी रोज असू दे
दुःखालाही सोबत घ्यावे,
जनमनातही मिसळून जावे,
एकलकोंडे होणे नाही...४
फूल-झाडातही खूप रमावे,
पशु-पक्ष्यांवर प्रे करावे,
निसर्गाशीही सख्य असावे,
रम्य वनातून भटकंती व्हावी...५
जन्म जयाने दिधला आम्हा,
त्या भगवंताला ना विसरावे,
खुल्या मनाने जगून घ्यावे,
पुन्हा येथे येणे नाही...६

मुकुंद मोरोणे

# शक्ति युक्ति जये ठायी, तेथे श्रीमंत धावती

संत
प्रकाश एदलाबादकर

फेब्रुवारी महिना म्हणजे भक्ती, शक्ती आणि युक्ती या त्रिवेणीचा संगम आहे. संत दासगणू महाराजांनी वर्णन केल्यानुसार श्रीसमर्थांचे अवतार असलेल्या श्रीगजानन महाराजांचा समाधी दिन, समर्थ रामदास स्वामी यांचा समाधी दिन आणि तोच दिवस नरशार्दूल तानाजी मालुसरे यांचा बलिदान दिन आहे. क्रांतिकारकांचे मुकुटमणी सशस्त्र क्रांतीचे प्रणेते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचा आत्मार्पण दिन आणि या सर्वांवर कळस म्हणजे 'जाणता राजा' छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती. श्रीसंत गजानन महाराज हे भक्तीचे ब्रह्मकमळ आहेत तर समर्थ, स्वातंत्र्यवीर, नारशार्दूल तानाजी मालुसरे आणि छत्रपती शिवाजी महाराज ही सर्वच भक्ती, शक्ती आणि युक्तीचे बिल्वदले आहेत. भारतमातेच्या कंठात शोभणाऱ्या नररत्नांच्या मालेतील हे तेजःपुंज हिरे! कोणती उपमा द्यावी या लोकोत्तर विभूतींना? त्यातही छत्रपती शिवाजी महाराज, नारशार्दूल तानाजी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे तीन थोर राष्ट्रभक्त म्हणजे शिवाच्या पिंडीवरील बेलाचे पान की प्रलयंकारी रुद्राच्या त्रिशूळाची तीन लखलखीत पाती? महाराष्ट्राच्या भूमीतील ही तीन नररत्ने म्हणजे आमच्या अभिमानाचा आणि श्रद्धेचा विषय आहे.



परकीय आक्रमकांच्या विषारी मिठीतून मातृभूमीची मुक्तता करण्यासाठी मराठी तनमनांमध्ये स्वतःच्या अमोघ वाणीने, बलसंपन्न कर्तृत्वाने तेजाचा स्फुल्लिंग जागृत करणारे युगद्रष्टे समर्थ आणि मातृभूमीच्या असीम प्रेमाखातर स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर सर्वस्व अर्पण करणारे क्रांतदर्शी पुरुषसिंह विनायक दामोदर सावरकर या दोघांच्याही जीवनातील घटनांचा, त्यांच्या जीवन तत्त्वज्ञानाचा, त्यांच्या कर्मयोगी निष्ठेचा, विचारसंपन्नतेचा तसेच जीवनादर्शांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास, या लोकोत्तर विभूतींचे जीवनसूत्र एकाच विणीने गुंफलेले आहे, याची विलक्षण जाणीव मनाला होते. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत। आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः॥' गीतेमधील या श्लोकाचा मथितार्थ आहे तरी काय? स्वतःचा उद्धार आणि स्वतःची मुक्ती करून घेणे याचाच अर्थ हा विचारस्वातंत्र्याचा आणि आचारस्वातंत्र्याचा पुरस्कारच आहे. परंतु असे स्वत्व अशी मुक्ती भोगायची असेल तर परिसरातील सामाजिक, राजकीय, वैचारिक वातावरणही त्याला पोषक असणे आवश्यक असते. असे वातावरण काही सहजासहजी मिळत नसते. ते तयार करावे लागते, घडवावे लागते. त्यासाठी अपरंपार कष्ट करावे लागतात. सतत फिरते असावे लागते. विजनवासात राहून स्वजनांसाठी झिजावे लागते. पारतंत्र्य आणि परकीय दास्य यांच्या विरोधात विद्वेषाचा अग्नी मनामध्ये अखंड, अप्रतिहत धगधगत ठेवावा लागतो. हा अग्नी धगधगत ठेवण्याचे कार्य समर्थांनी आणि सावरकरांनी आपापल्या कालखंडात सर्वस्व पणाला लावून केले. समर्थांच्या काळी राज्यकर्ते परकीयच होते असे नाही तर त्यांची राजकीय, सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि धार्मिक मूल्येही या राष्ट्राच्या मातीतील कधीच नव्हती. त्यांची दृष्टी वेगळी होती, ध्येये वेगळी होती, त्यांचे जगण्याचे अर्थ वेगळे होते, स्वार्थही वेगळे होते. त्या काळातील जनतेच्या पिचलेल्या मनांची आणि खंगलेल्या शरीरांची तडफड आपल्या प्रवासात समर्थांनी पाहिली होती. समर्थ म्हणतात...

'कां परचक्र गाढे। सकळ राष्ट्राचे झाले गुढे। तेव्हा लागवेग नेता पुढे। कां पा जावे। देश काळ वर्तमान। सर्वही अवेवधान। कोणते विधिविधान। सावधान सावधान ॥' म्हणून समर्थ विवेक बुद्धीस आवाहन करून म्हणतात... 'कित्येक ते भले भले। त्या मधेचि गुंतले। विचार सार जाणावा। तुम्ही तुम्हास उगवा ॥ तू सिंहाचे पिल्लू। काळ काय बापुडे भालू भालू। मशक मेरुस पाहे तोलू। धडका हाणोनी ॥' पारतंत्र्याची आणि पराभूत मनोवृत्तीची समर्थांना विलक्षण चीड होती. समाजाचे शारीरिक आणि मानसिक दुबळेपण नष्ट व्हावे यासाठी समर्थांनी प्रभू रामचंद्रास साकडे घातले होते.



'परतंत्र जीणे कंठू किती रे। उच्चाट माझे मनी वाटतो रे। ललाटरेखा तरी पालटेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ अहा रे विधी असे त्वां काय केले। पराधीनता पाप माझे उदेले। बहुता मधे तूकतां तूक तुटे। उदासीनता काळ कोठे न कंठे ॥' उपरोक्त ओळींमध्ये समर्थांची स्वातंत्र्याची लालसा आणि ओढ प्रकट होते. हीच विजिगीषू मनोवृत्ती सावरकरांनी जन्मभर जोपासली. 'लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या' असे समस्त सारस्वतांना जळजळीत आवाहन साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून सावरकरच करू जाणे! 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' आणि 'जोसेफ मॅझिनीचे चरित्र' म्हणजे सावरकरांच्या प्रतिभेची अग्निफुले आहेत. मॅझिनीच्या चरित्राच्या प्रस्तावनेत सावरकर लिहितात- 'ज्याचा जन्म पारतंत्र्यात झाला आहे, परंतु जे आपल्या पराक्रमाने त्या परतंत्रतेचे निर्दालन करून आपला देश स्वतंत्र झालेला पाहतात व त्या स्वतःच्या कर्तबगारीने दास्यमुक्त केलेल्या भूदेवीच्या अंकावर आपले शुभ्र मस्तक ठेवून चिन्मय होतात त्यांच्या आनंदाला सीमा नाही. जर जगात काही निर्मल सुखाचे क्षण असतील तर त्यांच्यात तो शुद्ध क्षण; शुद्ध सुखाची परमसीमा करणारा होय की, ज्या क्षणी आपल्या अत्यंत प्रिय देशजननीला ज्याने असह्य दुःख दिले तो शत्रू मार खात खात देशाच्या हद्दीबाहेर पळून चाललेला आहे हे पाहता येणे.' चाफेकर आणि रानडे यांच्या हौतात्म्यातून सावरकरांच्या मनात स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतले होते. या बलिदानाने शत्रुन्जय वृत्ती निर्माण झालेली आहे, ती नष्ट होऊ न देता, या स्वातंत्र्ययुद्धाच्या यज्ञकुंडात समिधेमागून समिधा टाकणे आणि त्याची परिणती स्वातंत्र्य युद्धाच्या महायज्ञात करणे हाच त्यांचा निदिध्यास होता. याच प्रज्वलन्त भावनेतून सावरकरांनी प्रत्यक्ष मृत्यूचाही थरकाप उडविणारी भीषण प्रतिज्ञा आपल्या कुलस्वामिनीच्या साक्षीने घेतलेली होती. इंग्रजांनी या देशावर दहशतीचा वरवंटा फिरवून स्वातंत्र्याचा शाब्दिक उच्चार करणेही अशक्यप्राय करून सोडलेले होते

आजच्या त्याकाळीही सत्ताधारी राज्यकर्त्यांचे लांगूलचालन करणे प्रतिष्ठेची बाब झाली होती. संपूर्ण समाजच्या पौरुषाची, स्वाभिमानाची राखरांगोळी झाली होती. 'मला काय त्याचे?' या मानसिकतेमुळे सारा समाज षंढ, बलहीन आणि हतप्रभ झाला होता. समाजिक मानसिकतेच्या याच राखरांगोळीवर आपली प्रज्ञा, प्रतिभा, तेजस्वी विचार आणि निधड्या कर्तृत्वाची सावरकरांनी फुंकर मारली. त्याच राखेतून देशभक्तीचा आणि स्वातंत्र्यलालसेचा अंगार बाहेर काढला. त्या अंगाराची प्रत्येक ठिणगी बोलू लागली. 'जयोस्तुते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे। स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे॥' निष्क्रिय आणि झोपलेल्या समाजाला सावरकरांनी जागे केले. महाबलाढ्य ब्रिटिश साम्राज्याच्या छाताडावर पाय रोवून स्वातंत्र्यासाठी सर्व जगात गर्जना करणारी सावरकरांची तेजःपुंज प्रतिमा केवळ नजरेसमोर आणण्याची शक्ती आज खरोखरच आमच्या समाजाच्या मनात आहे काय, हा खरा चिंतेचा आणि विचार करण्याचा प्रश्न आहे. त्यांनी संपूर्ण देशातील जनतेला विचारांची एक दिशा दिली. समर्थांचा उपदेश त्यांनी तंतोतंत अंमलात आणला.

'बहुत लोक एक करावे। एक विचारे भारावे। कष्ट करुनि घसरावे। शत्रूवरी॥ जनांचा प्रवाहो चालिला। म्हणजे कार्यभाग साधला। जन ठायी ठायी तुंबला। म्हणजे खोटे॥' सशस्त्र क्रांती आणि शक्तीची उपासना ही परस्परांच्या हातात हात घालून जातात हे लक्षात ठेवायला हवे. दुबळ्या व्यक्तीच्या हाती शस्त्र म्हणजे त्या शस्त्राचा अपमान होय. शक्तिपूजेचे सामर्थ्य त्याकाळी समर्थांनी जसे पुरेपूर जाणले होते, तसेच सावरकरांनी आपल्या काळी ओळखलेले होते. महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्रीतुळजाभवानी आणि कोदंडधारी प्रभू श्रीरामचंद्राची आराधना हा मार्ग समर्थांनी शक्तिउपासनेसाठी सिद्ध केला. समर्थांची चळवळ ही कृतिशील होती, तिला परमेश्वराचे अधिष्ठान होते, शक्तिसाधनेचा पाया होता. सामर्थ्याशिवाय स्वातंत्र्य नाही, बालसंपन्नता हाच क्रांतीचा आधार आहे, हेच तत्त्वज्ञान सावरकरही सांगतात. सावरकरप्रणीत सशस्त्र क्रांतीचा मार्ग अत्यंत दाहक होता. जळत्या निखाऱ्यांवरून जाणाऱ्या या वाटेच्या वळणावळणावर मृत्यूचे दूत दबा धरून बसलेले होते. सावरकरांचे 'माझी जन्मठेप' वाचताना याची शब्दाशब्दात प्रचीती येते. मॅझिनीचे चरित्र म्हणजे सशस्त्र क्रांतीची गीताच. सैन्य बळाच्या आवश्यकतेवर भर देताना त्यात सावरकर स्पष्टपणे लिहितात, 'परकीय सरकारला स्वदेशीय सैन्य ठेवल्याविना कोणत्याही देशावर राज्य करता येणे शक्य नसते. एकतर परक्याचा विश्वास उडून जातो आणि आयत्या वेळी ते घाबरे होतात. दुसरे असे की, राष्ट्रपक्षास आयते शिकलेले सशस्त्र लोक मिळू शकतात. कारण परकीयांचा तिरस्कार व स्वकीयांचा लोभ हा मनुष्यमात्रात निसर्गतःच कायम असतो. त्यास चेतना देणारा मॅझिनी मात्र भेटला पाहिजे.' सावरकरांनी मॅझिनीचा उल्लेख 'इटलीचा रामदास' असा केला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. धर्म आणि नीती यांचे अधिष्ठान ठेवूनच कृती करा, असा जो संदेश समर्थांनी दिला, तेच सूत्र कायम ठेवून सावरकरांनी राष्ट्रधर्म जागविला. त्यांनी समर्थांच्याच पावलावर पाऊल ठेवून कार्य केले, असे निःसंदिग्धपणे म्हणता येते. 'शक्तीने मिळती राज्ये, युक्तीने यत्न होतसे, शक्ति युक्ति जये ठायी, तेथे श्रीमंत धावती' असे सांगणारे समर्थ आणि 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' हीच जीवननिष्ठा असणारे सावरकर! किती विलक्षण साम्य आहे नाही? बलोपासना, शक्तीची आराधना, निर्भेळ स्वातंत्र्य यासाठी समाजमनाची सिद्धता करणे ही जबाबदारीही या महापुरुषांनी पार पडली. समाजसुधारणेची तळमळ हा या दोन महापुरुषांमधला दुवा आहे. महाराष्ट्रातील संतपंचकात समर्थांचे स्थान वेगळे आहे. त्यांनी अत्यंत स्वच्छ आणि स्पष्ट शब्दात कर्ममार्गाचा पुरस्कार केला आहे. नागपूरच्या गेल्या पिढीतील साहित्यिक डॉ. शं. दा. पेंडसे यांनी 'राष्ट्रगुरू समर्थ रामदास' हा ग्रंथ लिहिलेला आहे. गीतेतील नेमक्या कोणत्या श्लोकांचे अनुसरण समर्थांनी केले, याचे विवरण त्यांनी ग्रंथाच्या परिशिष्टात दिले आहे. ते सर्व श्लोक कर्ममार्गाचा पुरस्कार करणारे आहेत. त्याकाळी समर्थांनी समाजाच्या ऐहिक स्थितीचा मुळापासून विचार केला होता. समाजातील जटिल प्रश्न सोडविण्याचे सोपे व्यवहारी मार्ग त्यांनी सांगितले होते. त्या दृष्टीने 'दासबोध' हा ग्रंथ केवळ पारायण करून, लाल बासनात गुंडाळून देवघरात ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्याचे सतत मनन, चिंतन आणि अनुसरण करावे असा व्यवहारकोश आहे, हे प्रकर्षाने लक्षात ठेवले पाहिजे.

(पान ६ वर)



# काय हवे: विद्वत्ता की चातुर्य?

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

माझे एक मित्र आहेत, नाव त्यांचे पंडित. आणि या पंडित नावाच्या मित्राचा जेव्हा जेव्हा फोन येतो, तेव्हा तेव्हा माझ्या मनात एक विचार येतो आणि लगेच कविवर्य मोरोपंतांच्या एका सुभाषितातल्या ओळींची आठवण होते: केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार। शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार॥ मी स्वतःशीच हसतो, कारण मोरोपंतांनी 'पंडित मैत्री'तून मनुष्याला चातुर्य येतं असं सांगितलं आहे. गंमत थोडा वेळ बाजूला राहू देऊ पण माझ्या मनात एक प्रश्न नेहमी घोळत राहतो. तो हा की. मोरोपंत हे स्वतः इतके मोठे विद्वान असूनही त्यांनी या चार मार्गातून मिळणार्या अंतिम फळाला 'विद्वत्ता' न म्हणता, 'चातुर्य' असे का म्हटले असेल बरं? त्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षाही काहीतरी अधिक महत्त्वाचे सांगायचे आहे, हे निश्चित!

येथेच विद्वत्ता आणि चातुर्य यातील सूक्ष्म पण महत्त्वाचा फरक स्पष्ट होतो, जो जीवनातील यशाची गुरुकिल्ली आहे. विद्वत्ता आणि व्यावहारिक चातुर्य यातील फरक स्पष्ट करण्यासाठी एक गोष्ट बर्याच वेळा सांगितली जाते. आपल्यापैकी बहुतेकांनी ती वाचलीही असेल. एक अत्यंत विद्वान गृहस्थ होते. अनेक शास्त्र आणि ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला होता. एकदा ते नदी ओलांडण्यासाठी एका नावाड्याच्या बोटीत बसले. नावेत बसल्यावर पंडितजींनी नावाड्याला विचारले, अरे, तू कधी व्याकरण, तत्त्वज्ञान किंवा धर्मशास्त्र वाचले आहेस का?

नावाड्याने नम्रपणे उत्तर दिले, महाराज, मला हे काहीच माहीत नाही. पंडितजी उपहासाने म्हणाले, तुझ्या आयुष्यातील पाव भाग तर व्यर्थ गेला! थोडे पुढे गेल्यावर नदीत अचानक वादळ आले आणि बोट डळमळू लागली. घाबरलेल्या नावाड्याने पंडितजींना विचारले, महाराज, तुम्हाला पोहता येते का? पंडितजी घाम पुसत म्हणाले, मी फक्त शास्त्रे वाचली आहेत; मला पोहता येत नाही! यावर नावाड्याने शांतपणे उत्तर दिले, महाराज, तुमचे तर पूर्ण आयुष्यच व्यर्थ गेले! कारण ही बोट बुडणार आहे. ही कथा आपल्याला सांगते की, केवळ 'ज्ञान' (विद्वत्ता) पुरेसे नसते, तर ते ज्ञान आणि त्यासोबत जगण्याचे 'व्यवहारिक शहाणपण' (चातुर्य) असणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्वान माणूस आपल्या विषयात पारंगत असतो, पण अनेकदा तो जगापासून, व्यवहारापासून आणि 'लोकांच्या स्वभावा'पासून अनभिज्ञ असतो. तो आपल्या ग्रंथसिद्ध भूमिकेवर किंवा नियमांवर ठाम असतो. तो 'जे योग्य आहे' तेच करायचा हट्ट धरतो. याउलट, चतुर माणूस लवचिक भूमिका घेतो. चतुर माणूस आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता परिस्थितीनुसार, वेळेनुसार आणि समोरच्या व्यक्तीनुसार आपली रणनीती बदलतो. ही लवचिकता म्हणजे नैतिकतेचा त्याग नव्हे, तर उद्देशापर्यंत पोहोचण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करण्याचे व्यावहारिक ज्ञान आहे. तो 'काय करायचे आहे' यावर लक्ष केंद्रित करतो, तर विद्वान 'कसे करायचे' यावर ठाम राहतो. विद्वत्ता आपल्याला ज्ञान देते, पण चातुर्य आपल्याला ते ज्ञान वापरण्याची कला शिकवते. मोरोपंतवरील श्लोकात चातुर्य मिळवण्यासाठी चार मार्ग सांगतात, आणि ते सर्व केवळ ग्रंथपठणाचे मार्ग नाहीत, तर प्रत्यक्ष जीवनातील अनुभवाचे मार्ग आहेत: देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार आणि शास्त्रग्रंथविलोकन. या चार क्रियांमध्ये मोरोपंत केवळ शास्त्रग्रंथ वाचून पांडित्य मिळवण्याऐवजी, देशाटन, मैत्री आणि सभेतला संचार यांसारख्या प्रत्यक्ष कृतीतून व्यवहारी चातुर्य प्राप्त करण्यावर भर देतात. चांगदेव महाराजांनी तब्बल १४०० वर्षे तपश्चर्या केली. त्यांची प्रचंड विद्वत्ता आणि कठोर साधना यामुळे लक्षात येते. मात्र, ज्ञानेश्वरांना पाठवलेल्या पत्रात मायना काय लिहावा हे एवढ्या मोठ्या विद्वान संताला कळू शकले नाही. जेव्हा ते संत ज्ञानेश्वरांना भेटायला वाघावर बसून आले, तेव्हा ज्ञानेश्वरांनी त्यांना चक्क भिंत चालवून प्रती-उत्तर दिले. १४०० वर्षांच्या तपश्चर्येनंतरही त्यांना व्यावहारिक शहाणपण (चातुर्य) आले नव्हते, हे या प्रसंगातून स्पष्ट होते.बिरबल हा अकबराच्या दरबारातील 'विद्वान' असण्यापेक्षा 'चतुर' म्हणून अधिक प्रसिद्ध होता. त्याने दरबारातील गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी मानवी स्वभावाचे अचूक निरीक्षण केले आणि हजरजबाबीपणा वापरला. मानवी मनाचा त्याचा अभ्यास उत्तम होता. त्याचा वापर करण्यातून त्याचे चातुर्य दिसून येते. श्रीकृष्णाचे जीवन म्हणजे चातुर्याचा आदर्श नमुना आहे, कारण त्यांनी वेळप्रसंगी घेतलेली लवचिक भूमिका. जेव्हा त्यांना जाणवले की बलवान अशा जरासंधासमोर उघडपणे टिकाव लागणे शक्य नाही, तेव्हा त्यांनी आपल्या प्रजेच्या रक्षणासाठी मथुरेहून द्वारकेला स्थलांतर केले. त्याचप्रमाणे, कालयवनापासून बचाव करण्यासाठी त्यांनी रणांगणातून पळ काढला आणि प्रसंगी 'रणछोड' हे नाव आनंदाने स्वीकारले. दुसर्या एखाद्या व्यक्तीने 'युद्ध करणे हा क्षत्रियाचा धर्म' म्हणून लढून प्राण दिला असता; पण श्रीकृष्णाने तत्त्वांची तडजोड न करता धर्माचे रक्षण करण्यासाठी रणनीतीत लवचिकता आणली.

(पान ६ वर)

# वेदपुरुष

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर



वेदांगाची देहकल्पना: वेदांना अपौरुषेय असले तरी वेद मात्र पुरुषच असल्याचे कल्पिले आहे. छंद हे त्यांचे पाय आहेत, कल्प म्हणजे बाहू, ज्योतिष हे डोळे तर निरुक्त हे कान, स्मृती ही शिक्षा अर्थात शिर. छंदांना पाय म्हटले. कारण त्यांच्याशिवाय वेद उभेच राहू शकत नाहीत. ही कल्पना पाणिनींची आहे. गायत्री, अनुष्टुप, त्रिष्टुप हे सर्व छंदाचे अनेक प्रकार असून त्यांचे शेकडो उपप्रकार आहेत. हजारो वर्षे वेद टिकून आहेत ते लेखनामुळे नाही तर मौखिक पद्धतीमुळे. यासाठी विविध छंदच आवश्यक आहेत. त्यांच्या कोटेकोर शिस्तीमुळेच लय, मात्रा, लघु, गुरू, उच्चारांची शुद्धता टिकून राहिली. या पायांमुळेच वेदांचा प्रवास आज इतक्या पिढ्या निर्दोष आणि अस्खलित पद्धतीने निरंतर सुरू आहे. मूळ वचन असे: 'छन्दःपादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोऽथ पठ्यते। ज्योतिषामयनंचक्षु निरुक्तं श्रोत्रमुच्यते॥' वेदांविषयी हीच देहकल्पना स्मृती आणि नंतर स्कंदपुराण, मत्स्यपुराणातही आढळते. छंद म्हणजे वेदांचे पाय हे केवळ रूपक नसून वेदरक्षणाची तांत्रिक उद्घोषणा आहे. आता यापुढे विविध अवयवांचा संबंध वेदपुरुषाच्या शरीराशी कसा लावला हे बघणे उद्बोधक आणि ज्ञानरंजक होईल.

१) शिक्षा-मुख, नासिका, प्राण: वेदांच्या पोथ्यात अक्षरांच्या वर आणि खाली रेषा, टिंब, आणि इंग्रजीतील एस आकाराची एक किंवा कधी दोन चिन्हे दाखविली जातात. या सर्व चिन्हांमधून स्वरांचे उदात्तत्त्व, अनुदात्तत्त्व, दीर्घता, ऱ्हस्वता आणि प्लुतता दर्शविली जातात. हेच अवयव का तर वेदांचा उच्चार मुखातून निघण्यापूर्वी श्वास, नाद-नासिका हे महत्त्वाचे. नाहीतर वेदभंग समजला जातो. ऋचा उच्चारताना वैदिकांचा उजवा हात हलणे हे स्वाभाविक नसून त्यातही एक शिस्त आहे.

२) छंद : मंत्र आणि ऋचांची मात्रा, लय, गती सांभाळल्यामुळे पाठांतरास मदत होते. छंद म्हणजे वेदांचे पाय. पायांमुळे मनुष्य चालतो तसे छंदामुळे वेदांची मंत्रपरंपरा अखंड चालत राहते.

३) व्याकरण: मुख आणि जिव्हा, देहशुद्धी यामुळे अचूक शब्दरचना, विभक्तीचे भान आणि उचित अर्थनिर्णय करता येतो. शरीराच्या अंतर्गत शुद्धीसाठी मुख हे महत्त्वाचे तसेच वेदांच्या शुचितेसाठी व्याकरण. म्हणून पाणिनीने व्याकरणाला वेदांचे मुख असे म्हटले आहे.

४) निरुक्त: श्रोत्र म्हणजे कान. ऐकण्यासाठी कान हवेत. पण कान कसे तर तज्ज्ञ संगीत दिर्गदर्शकासारखे. तो जसा वादकांच्या ताफ्यामधून एखादे बेसूर वाजणारे वाद्य ओळखतो तशा तयारीचे. निरुक्त नसतील तरी शब्द ऐकू येईल, पण सूक्ष्म भेद समजणार नाही. दुर्बोध शब्दांची व्युत्पत्ती उलगडून अर्थ लावण्यास निरुक्ताची मदत होते. उदा. सुधीर फडके ष, श आणि स यांचे उच्चार अचूक करत, कारण त्यांचे कान त्या अर्थाने तयार होते.

५) कल्प: म्हणजे वेदपुरुषाचे हात. आपण हातांनी क्रिया करतो तसे कल्पामुळे यज्ञविधीतील आचार आणि क्रियाविधान केल्या जातात. कल्प म्हणजे वेदांचा व्यवहार.

६) ज्योतिष: हे वेदांचे चक्षु म्हणजे डोळे आहेत. ज्योतिषातील ग्रह नक्षत्रगती आणि स्थितीमुळे कालाचे भान होते, दिशा समजतात, प्रकाश दिसतो, त्याचा अभाव म्हणजे अंधार समजतो. वरील सहा अवयवांपैकी एकही विकृत असला तर शरीराने विकृत किंवा अपंग व्हावे तसे वेदही अपंग होतात. म्हणून वेदांच्या रचनेला पुरुष असे समजून वेदपुरुष म्हटले जाते.

वेद म्हणजे पुरुषाची वाङ्मयीन मूर्ती पुरुष शब्दाचा अर्थ: पुरी शेते इति पुरुषः पुरात राहतो तो पुरुष. याअर्थाने स्त्री-पुरुष असा लैंगिक भेद अपेक्षित नसून कर्ता, धर्ता, चैतन्य असा अर्थ घ्यावा. ही तत्त्वज्ञानाची भाषा आहे. वेदांचे अवयव आपण ठरवले. वेद हे केवळ ग्रंथ नसून ती एक सजीव चालणारी व्यवस्था आहे. वेद ही पुरुषाची वाङ्मयीन मूर्ती आहे. याच दृष्टीने वेद आणि देव हे दोघेही पुरुषच. देव व्यवस्था धारण करतात. ऋग्वेदीय सूक्त सांगते- 'पुरुष एवेदं सर्वं।' देवांचा विस्तार हाच विश्वपुरुष. आता देवच का, देवी का नाही हेही समजते. शक्तीशिवाय शिव असेल तर ते शव आणि शिवरहित शक्ती ही अचल होईल. पुरुष म्हणजे देव किंवा चैतन्य आणि देवी म्हणजे प्रकृती. देव आणि वेद ही एक अनुक्रमे सृष्टी आणि वेदांचे अंग अशी समन्वयात्मक रचना आहे. येथे लैंगिक अर्थ किंवा पुरुषप्रधान संस्कृतीचा अर्थ घेईल; त्याला भारतीय तत्त्वज्ञानाची बैठकच समजली नाही. येथे एका वैचारिक घोटाळ्याचा आरोप करता येईल. धारण करतात असे जर आपण म्हणतो वेदांना स्त्री का म्हणून नये? कारण धृ या धातूतून धारण आणि धात्री-जी धारण करते ती पृथ्वी असा स्त्रीदर्शक असे दोनही शब्द तयार झाले. याचे तर्कशुद्ध उत्तर असे आहे- पुरुष म्हणजे चैतन्य, कर्तृत्व, चेतना, धारकता. ते धारण करते-प्रसवते ती शक्ती. वेदांच्या बाबतीत सृजन नव्हे तर ज्ञानाची पूर्ण व्यवस्था आहे. तेथे सृजनता अपेक्षित नाही म्हणून केवळ वेद हे पुरुष आहेत, स्त्री नाहीत. वेद हे धर्म धारण करतात, पण त्याची तुलना देहधारणा या शब्दाशी करू नये. तत्त्वांचे, ऋतांचे म्हणजे नियमांचे धारण करून व्यवस्था टिकविणे हा अर्थ अपेक्षित आहे. धात्री हा शब्द देहगत आहे. दोघांचेही तत्त्वज्ञानातील स्तर भिन्न आहेत. एकाच धातूतून दोन भिन्न वाटणारे शब्द कसे तयार होतात, आढळतात ते राजवाडेंच्या धातुकोषावरून समजते.

थोडक्यात पुरुष हा शब्द जैविक नसून तात्त्विक आहे. देहात राहतो पण देह नाही तर लगेच पुढचा प्रश्न उद्भवतो की, मग बाहेर कोण आणि आत कोण? कारण की कर्ता? तत्त्वज्ञान सांगते पुरुष हा कर्ता, साक्षी, अधिष्ठाता म्हणजे देहात आहे, पण देहाचा परिणाम नाही. म्हणून आतबाहेर या प्रश्नाला अर्थच नाही. मग पुरुष आत आणि प्रकृती बाहेर म्हणावी का? वेद आणि उपनिषदे म्हणतात आत-बाहेर ही देहाची भाषा आहे. आमच्या तत्त्वांची नाही. तात्त्विक उत्तर असे की, पुरुष प्रकृतीला धारण करतो. कारण ऋत- नियम, चैतन्य हे त्याच्याकडून येते. व्यावहारिक उत्तर असे की, प्रकृती पुरुषाला धारण करते. कारण ती देह, जन्म, पोषण देते. थोडक्यात दोनही उत्तरे खरीच आहेत. कठोपनिषदाने हा गुंता सोडवला. ते म्हणते देह हा रथ, आत्मा हा रथी आहे. आता नवीनच गोंधळ वाढला. रथ रथीला धारण करतो की रथी रथाला चालवतो? उपनिषद उत्तरते की दोघेही एकमेकांना. म्हणून स्त्री ही धात्री आणि पुरुष हा धारक या विधानातील विरोध मावळतो. वेद एका वाक्यात समारोप करतात. जो आत आहे तोच बाहेर. धारक आणि धारणा एकच. अद्वैत. 'नेह नानास्ति किंचन:।' विष्णू हा शब्द असाच आहे. 'वेवेष्टि यत् व्याप्नोति तत् विष्णूः।' जो आत आणि बाहेरही व्यापतो तो विष्णू. माउली भाषांतर करतात. 'सबाह्य अभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी।' ही भक्ती नसून उपनिषदांची गूढ भाषा सोप्या अभंगात उतरली असे दिसते. कोण कोणाला धारण करते याचे योग्य उत्तर हेच. नामसहस्रातील विष्णु कसा तर 'अधिष्ठानं अप्रमत्तः प्रतिष्ठितः।' पुरातही आहे, पुराबाहेरही आहे आणि पूर टिकविणाराही तोच. म्हणून विष्णू हाच पुरुष, तोच वेदपुरुष. हाच विषय पुढेही ताणता येतो. पुरुषसूक्त म्हणते, 'सभूमिंविश्वतोवृत्व: अत्यतिष्ठः दशांगुलं।' मोरोपंतांनी भाषांतर केले. 'स्थिरचर व्यापूनी तो परमात्मा दशांगुळे उरला॥' आतबाहेर सर्व व्यापूनही तो परमात्मा दहा अंगुळे शिल्लकच राहिला. दश पूर्णतादर्शक संख्याह आहे आणि दहा दिशांची प्रतिनिधी पण आहे. म्हणजे सर्व मोजमापात बसूनही दशदिशांनी विस्तारत जाणाऱ्या एक्सपाँडिंग युनिव्हर्सची निर्देशक आहे. शिल्लकच राहिला म्हणजे आतही आहे, बाहेर आहे, पसरत चालणाऱ्या पसाऱ्याचा अधिष्ठानही आहे. म्हणून तर व्यापणे शक्य आहे. म्हणजे विश्व पुरुषात आहे, पुरुष विश्वाने संपत नाही. थोडक्यात व्याप्ती म्हणजे संपणे नव्हे तर अधिष्ठान होणे. वामनावतारात- 'त्रिणी पदा विचक्रमे विष्णूर्गोपा अदाभ्यः। अतो धर्माणि धारयन्।' म्हणजे विष्णूने तीन पावलांनी त्रिलोक व्यापून धर्माला स्थैर्य दिले. वामनकथा ही पुरुषसूक्ताने दिलेल्या सूत्राचे प्रात्यक्षिक आहे. दशांगुळे उरला हे सांगण्यासाठी मोरोपंतांनी आर्या निवडली. आर्या गणांवर नाही तर मात्रांवर चालते. येथे त्यांनी अनंत न म्हणता दश ही संख्या मुद्दामच सांगितली.

पुरुषसूक्त, वामनकथा यातील व्यापूनही उरणे यासाठी मोरोपंतांनी आर्येचा उपयोग करणे या सर्वात हे छंदांद्वारे वेदांचे अविरत चालणेच दिसते. सारांश म्हणजे पुरुषसूक्त, वामनावतार, विष्णू शब्दाची व्याख्या आणि वेद हे सर्व एकसूत्री आहेत. म्हणून वेद हे वेदपुरुष आणि वेद जाणतो तो वेदोनारायण।

# ग्रहसंकेत

**(रविवार, ८ फेब्रुवारी ते शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✲ **रविवार, ८ फेब्रुवारी-** भानुसप्तमी, पुर्वेद्युः श्राध्द, गजानन महाराज प्रकट दिन शेगांव, जोतिबा खेटे प्रारंभ, उज्जैनगिरी महाराज पुण्यतिथी सप्ताह प्रारंभ सोमेवाडी (ता. सांगोला), ✲ **सोमवार, ९ फेब्रुवारी-** कालाष्टमी, अष्टका श्राध्द, शांडिल्य मठ उत्सव लोंढा, सदानंद महाराज पुण्यतिथी तयापूर धारवाड, आनंद स्वामी पुण्यतिथी जालना, अंबाबाई यात्रा हुपरी व माद्याळ (ता. कागल) ✲ **मंगळवार, १० फेब्रुवारी-** अन्वष्टका श्राध्द, नवमी श्राध्द ✲ **बुधवार, ११ फेब्रुवारी-** रामदास नवमी, सज्जनगड यात्रा, संत मुक्ताबाई यात्रा मुक्ताईनगर (जि. जळगाव), नरवीर तानाजी मालुसरे पुण्यतिथी, दत्तगिरीजी महाराज पुण्यतिथी सोरडी (जत), श्री देवी करंजेश्वरी उत्सव गोवळकोट ✲ **गुरुवार, १२ फेब्रुवारी-** रवि कुंभ (२८: ०८), म्हस्कोबानाथ व जोगेश्वरी यात्रा गोपाळवाडी, चिंतामणी महाराज पुण्यतिथी आरग (ता. मिरज), भैरवनाथ यात्रा भुदरगड, स्वामी दयानंद सरस्वती जयंती, देव घूतपापेश्वर यात्रा धोपेश्वर ✲ **शुक्रवार, १३ फेब्रुवारी-** विजया एकादशी, सिध्देश्वर यात्रा टोके, लक्ष्मीनारायण सप्ताह जागर पुंगाव ✲ **शनिवार, १४ फेब्रुवारी-** शनिप्रदोष, पंढरीनाथ महाराज पुण्यतिथी देवळा

**मुहूर्तः-** ✲ **साखरपुडा-** ८ (१६ नंतर) फेब्रुवारी, १०, १२ (१४ नंतर) फेब्रुवारी, १३ (१६ पर्यंत) फेब्रुवारी
✲ **बारसे-** १३ फेब्रुवारी

### मेष :- समस्यांवर मात

मस्यांवर मातसर्वात घातक सवय काळजी करणे, असे श्री सोपान महाराज यांनी लिहिले आहे आणि हे खरेच आहे. सध्या आर्थिक समस्या असली तरी चिंता, काळजी मुळीच करू नका. अनावश्यक खर्च टाळणे ही सुद्धा एक बचतच असते. गुरुकृपेने विविध समस्यांवर मात करू शकाल. कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. आवडत्या क्षेत्रात रममान व नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. १०, १४

### वृषभः- विचाराने रहावे

सर्वात मोठे नुकसान आत्मसन्मान हरवणे. राशीत हर्षल त्यामुळे सर्व बाबतीत विचाराने रहावे. व्यवहारात गुणवैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष करू नका. क्षणिक लाभासाठी केलेल्या तडजोडी पुढे त्रासदायक ठरू शकतात. आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. आत्मसन्मान हरवू देऊ नका. शुभ ता. १०, १३

### मिथुनः- दगदग टाळावी

सर्वात मोठी समस्या भीती. अष्टमात रवि- मंगळ असल्याने मनात थोडी धास्ती वाटत असली तरी कसलीही भीती बाळगू नका. राशीतील गुरुमुळे सर्व समस्या वेळीच सुटत जातील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. गुंतवणूक विचाराने करावी. सुसंधीचे स्वागतच करावे. दूरचे प्रवास शक्यतो टाळावेत. शुभकार्याच्या दृष्टीने अनुकूल कालावधी आहे. फार दगदग टाळावी. शुभ ता. १०, १४

### कर्कः- सामंजस्याने रहावे

सर्वात प्रभावी झोपेची गोळी मनशांती. सप्तमातील रवि- मंगळामुळे सध्या थोडी अस्वस्थता वाटत असली तरी आपल्या दिनचर्येवर परिणाम होऊ देऊ नका. आपल्या आवडत्या कार्यक्षेत्रात अधिक लक्ष घातल्याने मनशांती राहील. उत्तरार्धात शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. धार्मिक कार्यात लक्ष घालू शकाल. सरकारी कामे विचाराने करावीत. शुभ ता. १३

### सिंहः- वादाचे प्रसंग टाळावेत

सर्वात शूद्र सवय कुजबूज करणे. राशीतील केतूच्या समोर रवि- बुधादि ग्रह आहेत. त्यामुळे गैरसमज निर्माण होईल, अशा घटना टाळण्यास योग्य होईल. नोकरीत वरिष्ठांच्या सूचनांकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. घाईने निर्णय घेणेही टाळावे. आर्थिक बाबतीत चिंता करू नका. वेळीच सर्व मनासारखे घडत जाईल. उष्णतेपासून सावध रहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १०, १३

### कन्याः- आनंदी- आशावादी रहावे

सर्वात महत्त्वाचा सोबती आशावाद. सुखेश, सप्तमेश गुरु कर्मस्थानी असल्याने आनंदी, आशावादीच रहावे. माझे सर्व काही चांगलंच होणार आहे, अशीच नेहमी मनोभावना ठेवावी. व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. व्यवहार विचारपूर्वक करावेत. शुभ ता. १०, १४

### तुलाः- शांततेत रहावे

सर्वात घातक शस्त्र माणसाची जिभ. सुखस्थानी पापग्रह, अष्टमात हर्षल त्यामुळे थोडे जरी मनाविरुद्ध घडले तरी लगेच अस्वस्थ होऊ नका. प्रतिक्रिया ही देऊ नका. गुरुवारनंतर मनासारख्या घटना घडतील. थोडे शांततेत रहावे. आर्थिक प्रगतीने नवे मार्ग लागतील. स्थावर प्रश्न वाढवू नका. वाहनांपासूनही जपून असावे. अंगिकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. शुभ ता. १०, १४

### वृश्चिकः- स्वास्थ्य टिकवा

सर्वात मोठी संपत्ती विश्वास. कर्मेश रवि सुखस्थानी राहू, बुधादि ग्रहांवर येत आहे. त्यामुळे आपले स्वास्थ्य बिघडू देऊ नका. प्रवास गरजेच करावे. यांत्रीक, विधी अशा क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. सर्वच षडःरिपूंपासून दूरच व सावध रहावे. आपले व्यक्तिमत्व निष्कलंक कसे राहील याकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. मोजकेच बोलावे. शुभ ता. १०, १३

### धनुः- अडचणी कमी होतील

सर्वात सुंदर अलंकार स्मितहास्य. धनात रवि, मंगळ तर चतुर्थात शनि त्यामुळे त्रास वाढला तरी आपले स्मितहास्य कमी होऊ देऊ नका. ग्रहदशा ही चक्रगतीची असल्याने ती बदलत असते. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. उत्तरार्धात महत्त्वाची कामे होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. उपजत कलागुणांचा विकास होईल. अडचणी कमी होतील. शुभ ता. १०, १३

### मकरः- अपेक्षित संधी लाभतील

सर्वात चैतन्यशाली गोष्ट उत्साह. राशीतच रवि- मंगळादि ग्रह आहेत. त्यामुळे उत्साह, धडाडी राहील. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. अपेक्षित संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सर्व काही मनासारखे होत जाणार आहे. बिनधास्त रहावे. नियोजनपूर्वक पावले उचलल्यास यश आपलेच आहे. सरकारी कामे होतील. शुभ ता. १०, १४

### कुंभः- घाईने व्यवहार नकोत

सर्वात क्षुद्र कृती सूडभावना. धनात शनि तर व्ययात रवि, मंगळ त्यामुळे सद्यस्थितीत कोणालाही दोष देणे टाळावे. गुरुवारनंतर महत्त्वाची कामे मार्गी लागतील. अडचणींवर मात कराल. विलंबाने पण निश्चितच चांगल्या घटना घडतील. विद्या, संतती बाबत अनुकूल कालावधी आहे. विचाराने रहावे. गुरुवारनंतर अनुकूलता वाढेल. घाईने व्यवहार करू नयेत. शुभ ता. १०

### मीनः- थोडा धीर धरावा

महानपणाचे लक्षण क्षमाशिलता. गुरुवारी रवि बारावा होत आहे. त्यामुळे महत्त्वाची कामे गुरुवारपर्यंत करून घ्यावीत. व्यवसायातील चढउताराने आपल्या दिनचर्येवर परिणाम होऊ देऊ नका. दैवी कृपेने सर्व मनासारखेच घडत जाईल. कुटुता वाढेल असे प्रसंग टाळावेतच. सर्व आपले हितचिंतकच समजावे. परिस्थिती बदलत जाणार आहे. थोडा धीर धरावा लागेल. शुभ ता. १०, १३

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# किल्ले प्रतापगड



जावळी म्हणजे वाघाची जाळी! जावळीचे खोरे हा सह्याद्रीतील अतिदुर्गम परिसर. येथे आदिलशाहीचे मांडलिकत्व स्वीकारून मोरे घराणे सत्ता गाजवीत होते.चंद्रराव मोरे स्वराज्याच्या विरोधात उभे होते म्हणून महाराजांनी त्यांना भेटीस बोलविले. मोरे सत्तेमुळे उन्मत्त झाले होते. त्यांनी महाराजांच्या पत्राला उद्दामपणे उत्तर पाठविले, ''जावळी जिंकून दाखवा'' असे उघड उघड आव्हान महाराजांना दिले. महाराजांचा नाईलाज झाला. जावळीच्या परिसरात हैबतराव, कान्होजी जेधे, संभाजी कावजी सैन्य घेऊन दाट जंगलात शिरले. घनघोर लढाई झाली. जावळी हातची जाते हे पाहून मोरे विजापूरला पळाले. शंभू महादेवाची जावळी स्वराज्यात आली. याचवेळी मुरारबाजी देशपांडे सुद्धा स्वराज्याच्या बाजूने झाले. जावळीच्या जवळचे चंद्रगड, मकरंदगड तसेच इतर काही किल्लेही स्वराज्यात सामील झाले. इ. स. १६५६ मध्ये जानेवारी महिन्यात महाराज जावळीत आले. त्यानंतर हिरोजी इंदुलकरांनी, मोरोपंतांच्या साथीने दोन वर्षात किल्ल्याचे बांधकाम पूर्णत्वास नेले. जावळीतील भोरप्या डोंगराला महाराजांनी तटा- बुरुजांनी सजविले आणि बुलंद 'प्रतापगड' आकाराला आला. प्रतापगड म्हटला की आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो अफझलखान वधाचा प्रसंग! महाराजांनी प्रतापगड बांधला त्यामुळे आदिलशाही सत्तेचा कोंडमारा झाला. त्यांचा महाड पोलादपूर रस्त्यावरचा राबता कमी झाला. यावर उपाय निघावा म्हणून अफझलखानाला वाईचा सुभेदार नेमण्यात आले. काफिरांची हत्या करणारा आणि देवतांच्या मूर्तीचा विध्वंस करणारा खान आपल्या अफाट सैन्यासह विजापूरवरून निघाला.

आई तुळजा भवानी आणि पंढरीच्या विठुरायाला तसदी देऊन, मराठी मुलखात आतंक पसरवीत शत्रू स्वराज्यात शिरला. अफझलखानाने वाईत तळ ठोकला. त्यानंतर पावसाळा असल्यामुळे खान शांत बसला होता. त्यातही त्याने शिरवळचे ठाणे, तळकोकणचा काही भाग काबीज केला. खान आला होता शिवाजी राजांना संपविण्यासाठी, त्याचा मनसुबा होता राजांना वाईत बोलवावे आणि दरबारात विडा उचलून बडी बेगमसाहेबाला दिलेले वचन पूर्ण करावे. महाराजांचे गुप्तहेर सगळीकडे पसरले होते. वाईतील बातम्या गडावर येत होत्या. राजेही युद्धाच्या तयारीला लागले. या कठीण समयी एक अत्यंत वाईट बातमी गडावर आली. राजगडावर सईबाईंनी अखेरचा श्वास घेतला. महाराजांनी हे दुःख समोरील बिकट प्रसंग ध्यानात ठेवून शांतपणे पचविले. प्रतापगडावर लोकांची जमवाजमव सुरू होती. देशमुख मंडळी कान्होजीसह शिवाजी राजांना येऊन मिळाली. मालुसरे, बांदल, कंक, बाजीप्रभू, फुलाजी देशपांडे, नेताजी पालकर आणि अनेक शूर सरदार महाराजांच्या साथीला होते. खानाचे वकील कृष्णाजी भास्कर पत्र घेऊन गडावर आले. खानाला भेटायला वाईत यावे असा निरोप त्यांनी महाराजांना दिला. महाराज म्हणाले, ''मी आजवर फार चुका केल्या तेव्हा मला खानसाहेबांची भीती वाटते. कृष्णाजी, तुम्हीच त्यांना जावळीत आणावे ही विनंती.'' शिवाजी राजांचे वकील म्हणून पंताजीकाका खानासाठी भेटवस्तू घेऊन गेले. त्यांनीही शिवाजीराजे कसे घाबरले याचे यथोचित वर्णन केले त्यामुळे खानाने महाराजांना जावळीत भेटण्याचे कबूल केले. पंताजीकाकांनी खानाच्या सैन्याचा नीट मागोवा घेतला आणि प्रतापगडावर येऊन राजांना सर्व तपशील कथन केला. महाराज आणि अफजलखान भेटीसाठी तंबू सजला. अखेर भेटीचा दिवस उजाडला. बंदोबस्त चोख होता. तरीही कोणी गाफील राहू नये असे सांगून महाराज जगदंबेचे स्मरण करून निघाले. शामियान्यात महाराज आल्याबरोबर खान आनंदाने उभाच राहिला. खान म्हणाला, ''आपली सगळी मस्ती सोडून शरण ये, मी तुला मोठी जहांगीर देईन.'' अचानक दोन्ही हात पसरून ''आओ गले मिलो'' असे खानाने म्हटल्यावर महाराज सावध झाले. खानाच्या अजस्त्र देहापुढे महाराज अंगयष्टीने लहान, त्यांचे डोके खानाच्या छातीपर्यंतच आले आणि दगा झाला. खानाने डाव्या काखेत महाराजांची मान दाबली आणि कट्यार काढून कुशीत खुपसली. महाराजांचा अंगरखा फाटला मात्र आत चिलखत होते. अत्यंत चपळाईने बिचव्याचे तीक्ष्ण पाते महाराजांनी खानाच्या पोटात खुपसले आणि आपल्या वाघनखांनी खानाचा कोथळाच बाहेर काढला. खान ओरडला. कृष्णाजीपंत धावले. त्यांनी राजांवर वार केला. प्रतिकार करताना त्यांचा घात झाला. तितक्यात बाहेरून सय्यद बंडा शामियान्यात आला आणि तो महाराजांवर वार करणार इतक्यात जीवा महालाने तो वार आपल्या अंगावर अडवला आणि सय्यद बंडाला कंठस्नान घातले. जखमी खान पालखीतून पळून जाताना संभाने खानाचा शीरछेद केला आणि त्याचे मुंडके घेऊन महाराजांकडे आला. जावळीच्या खोऱ्यात दबा धरून बसलेले सैनिक खानाच्या फौजेवर 'हर हर महादेव' गर्जना करीत तुटून पडले. महाराजांनी आपल्या हिमतीच्या आणि बुद्धीच्या बळावर पुन्हा एकदा बिकट प्रसंगावर मात केली. स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा साक्षीदार असलेला प्रतापगड आजही इतिहासाच्या पाऊलखुणा जपत, दिमाखात उभा आहे.

प्रतापगड महाबळेश्वरपासून २४ कि. मी. अंतरावर असून किल्ल्याची उंची ३५४० फूट आहे. प्रतापगडच्या दक्षिणेला असलेल्या टेहळणी बुरुजाखाली वाहनतळ आहे. येथून काही पायऱ्या चढून आपला पश्चिमाभिमुख दरवाज्यातून गडप्रवेश होतो. महाद्वाराच्या आतल्या बाजूला पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. आत गेल्यावर उजवीकडे जाणारी वाट प्रतापगडाचे मुख्य वैशिष्ट्य असलेल्या माचीवर, सूर्य बुरुजावर जाते. बुरुजावरील ध्वजस्तंभावर भगवा डौलाने फडकत असतो. परत महाद्वाराकडे येऊन पायऱ्या चढून गेल्यावर श्री भवानी मातेचे मंदिर आहे. महाराजांनी अष्टभुजा महिषासुरमर्दिनी भवानीची प्रतापगडावर स्थापना केली. देवीची अत्यंत देखणी मूर्ती त्यांनी घडवून घेतली. नेपाळचे राजे लीलासेन यांच्याकडे मंबाजी नाईक पानसरे यांना पाठवून श्वेतगंडकी, त्रिशूलगंडकी आणि सरस्वतीच्या तीरावरील उत्कृष्ट शिळा मागवून ही भवानी घडविली आहे. अतिभंग अवस्थेतील या अष्टभुजा भवानीच्या मूर्तीच्या उजव्या बाजूस सूर्य, डाव्या बाजूस चंद्र आणि मस्तकी शिवलिंग आहे. भवानीच्या डाव्या हातात शंख, ढाल, धनुष्य असून देवीने एका हाताने महिषासुराची शेंडी पकडली आहे. देवीच्या उजव्या हातात खडग, बाण आणि चक्र आहे, एका हातातील त्रिशूळ महिषासुराच्या शरीरात खुपसलेला आहे. महिषासुराच्या एका बाजूस नाग आणि दुसऱ्या बाजूस सिंह आहे. प्रतापगडावर मूर्तीची स्थापना मोरोपंतांच्या शुभ हस्ते करण्यात आली. महाराज स्वतःला देवीचे भोपे सेवक म्हणत. नवरात्रात आरतीच्या वेळी महाराज स्वतः कवड्याच्या माळा, मळवट, हाती पेटलेला पोत घेऊन भवानीची आरती करत. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेस यथासांग पूजा आणि पालखी प्रदक्षिणा होत असे. महाराजांच्या मनावर अगदी लहानपणापासून धार्मिक संस्कार होते. परंतु यासोबत त्यांची कर्तव्यावर अपार निष्ठा होती. राज्याभिषेकाच्या आधी महाराज प्रतापगडावर श्री भवानीच्या दर्शनास गेले होते. त्यावेळी त्यांनी देवीला सुवर्णछत्र आणि मौल्यवान अलंकार अर्पण केले. मंदिरातील अमूल्य वस्तू आणि दागिने १९२९ मध्ये दरोड्यात लुटले. मंदिरावर तीनदा वीज कोसळली, आग लागली. या मंदिराने भूकंपाचा सामना केला. तरीही मंदिर उत्तम अवस्थेत आहे. याच मंदिरात नितळ पारदर्शक असे हातभर उंचीचे स्फटिकाचे शिवलिंग देखील आहे. सभामंडप, कीर्तनमंडप, पुराणमंडप आणि गाभारा अशा दालनांनी युक्त असलेल्या प्रशस्त मंदिरासमोरील दीपमाळा लक्षवेधी आहेत. भवानी मंदिरात दर्शन घेऊन माचीवर आलो की बालेकिल्ल्यावर जाणाऱ्या पायऱ्या चढून जावे. बालेकिल्ल्याच्या दारावर 'श्रीराम' ही अक्षरे कोरली आहे. शाळेशेजारी श्रीवेताळाची देवळी आहे, केदारेश्वर महादेवाचं सुंदर मंदिर आहे. दर्शन घेऊन देवीचे तळे, मोठे तळे, गोड तळे हे गडावरील तलाव पाहावेत. त्यानंतर केदार बुरूज, दक्षिण बुरूज, यशवंत बुरूज, टेहळणी बुरूज, दिंडी दरवाजा, रेडे बुरूज असा गडाचा विस्तीर्ण परिसर पाहून घ्यावा. बालेकिल्ल्यावर शिवरायांचा पुतळा आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले आहे. मराठ्यांच्या पराक्रमाने पावन झालेला जावळी परिसर आणि शिवकालीन दुर्गबांधणीचा उत्तम नमुना असलेला प्रतापगड हे आपले शक्तिस्थान आहे.

पान १ वरून

## मै झुकेगा नही...!

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही १० ऑगस्ट रोजी ट्रम्प यांचे नाव न घेता म्हटले होते की, 'कॅटलान लोक भारताच्या विकासावर खूश नाहीत. त्यांना वाटते की आपण सर्वांचे बॉस आहोत, भारत इतक्या वेगाने कसा विकास करत आहे.' यानंतर, पीएम मोदींनी 'एससीओ' शिखर परिषदेसाठी चीन दौऱ्यावर असताना त्यांनी जिनपिंग आणि पुतिन यांची भेट घेतली. अमेरिकेने या भेटीवर निशाणा साधला. ट्रम्प यांचे आर्थिक सल्लागार पीटर नवारो म्हणाले होते की, 'पीएम मोदींना पुतिन आणि जिनपिंग सारख्या जागतिक नेत्यांची गरज आहे. दोन मोठ्या हुकूमशहांना भेटताना पाहणे लज्जास्पद होते. भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे आणि युक्रेनवर हल्ला करण्यासाठी पैसे देत आहे. म्हणूनच त्याला सर्वाधिक शुल्क सहन करावे लागत आहे. अमेरिकन पत्रकार आणि लेखिका सीमा सिरोही यांनी बीबीसीला बोलताना सांगितले होते की, 'गेल्या २५ वर्षात भारतासोबत संबंध प्रस्थापित करण्यावर काम करणारे अमेरिकेतील लोक म्हणत आहेत की, ही ट्रम्प यांची सर्वात मोठी चूक आहे.' तज्ज्ञांच्या मते, 'ही विरोधाभासी विधाने ट्रम्प यांची चूक नसून त्यांची राजकारणाची पद्धत आहे. ट्रम्प यांच्या भारताबाबतच्या धोरणाला अमेरिकेचा विरोध आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन आणि जेक सुलिव्हन, संयुक्तपणे अनेक अधिकारी आणि अमेरिकेचे माजी राजदूत निक्की हेली यांच्यासारखे अनेक नेते ट्रम्प यांना पाठिंबा देत आहेत. पण भारताबाबतच्या त्यांच्या धोरणांना विरोध करत आहेत. एका मुलाखतीत बोल्टन यांनी सांगितले होते की, 'व्हाईट हाऊसने अमेरिका-भारत संबंध दशके मागे ढकलले आहेत, ज्यामुळे मोदी रशिया आणि चीनच्या जवळ आले आहेत. जॅक सुलिव्हन यांनी मुलाखतीत असेही म्हटले होते की, 'ट्रम्प पाकिस्तानसोबत कौटुंबिक व्यवहारात आहेत. त्यामुळे ट्रम्प पाकिस्तानला खूश करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर अमेरिका नेहमीच भारताशी चांगले आहे. काही तज्ज्ञ असे म्हणतात, भारत, रशिया आणि चीन एकत्र आल्यास अमेरिका एकाकी पडेल. तर सामरिक आणि मुत्सद्दीदृष्ट्या भारत चीनपेक्षा अमेरिकेच्या जवळ आहे. 'अशा परिस्थितीत भारत- अमेरिकेतील संबंध बिघडू नयेत, अशी ट्रम्प यांची इच्छा आहे. एसीओ शिखर परिषदेत रशिया आणि चीनसोबत उभे राहून भारताने अमेरिकेला स्पष्ट राजनयिक संदेश दिला.' 'भारत कधीही आपल्या शेतकर्यांच्या, पशुपालकांच्या हिताची तडजोड करणार नाही. वैयक्तिकरित्या, मला मोठी किंमत मोजावी लागेल, पण मी त्यासाठी तयार आहे.', असे सांगत विश्वगुरु मोदींनी अमेरिकेला ठणकावले मै झुकेगा नही. त्याचेच परिणाम म्हणजे अमेरिकेने मवाळ धोरण घेत भारत कसा जागतिक पातळीवर आगेकूच करीत यावर शिक्कामोर्तब केले आहे.

पान ४ वरून

## प्रेम हे.....!

त्या आई वडिलांच्या प्रेमाचे महत्व जास्त की काल परवा आपल्या जीवनात आलेल्या व्यक्ती आणि क्षणिक सुख, प्रेम की आकर्षण या भावनाही नीट न कळता जपावसे वाटणारी नाते महत्त्वाचे याचाही विचार झाला पाहिजे. कृष्णा आणि राधा याचे प्रेम आजच्या पिढीला फक्त नावाविषयी माहिती असते, आम्ही राधाकृष्णासारखे प्रेम करतो वाक्याच्या पलीकडे जाऊन राधा ही कृष्णापेक्षा वयाने मोठी होती, अनय नावाच्या गवळ्या सोबत तिचा विवाह झालेला होता, द्वारकाधीश झाल्यावर मथुरेतील गरीब गवळ्यावर बल प्रयोग करून राधेला कायम आपल्या सोबत ठेवणे कृष्णाला अवघड नव्हते, किंवा कृष्णाच्या राजवैभवात अनय सोबतचा संसार त्याग करून राधेला कृष्णार्पण होणे शक्य होते. मात्र, त्या दोघांनीही तसे केले नाही. राधा मथुरेत तिच्या संसारात मग्न राहिली तर कृष्णा जगाच्या राजकारणात व्यस्त, ह्या कर्तव्यपूर्तीसह ते आपले जीवन जगले, थोडक्यात आपल्या कर्तव्याच्यामध्ये त्यांचे प्रेम आले नाही किंवा त्यांच्या प्रेमामुळे त्यांच्या कर्तव्याला त्यांनी कोणतीही कसूर केली नाही.

पान ५ वरून

## शक्ति युक्ति जये ठायी, तेथे श्रीमंत धावती

त्याच बरोबर हेही लक्षात ठेवायला हवे की, समर्थांनी समाजाला डोळस श्रद्धेचे धडे दिले. पाखंड आणि वृथा कर्मकांड यांचे वाभाडे काढून समाजाला खऱ्या अर्थाने कर्मप्रवण केले. सावरकरांनीही तीच वाट चोखाळली. आधुनिकता आणि विज्ञाननिष्ठा ही सावरकरांच्या समाजशास्त्रीय विचारांची बैठक होती. त्यांची समाजधारणा हे समर्थांच्या 'हे तो प्रचीतीचे बोलणे' या उक्तीनुसार बुद्धिनिष्ठ वैचारिक धारणा आहे. वर्तमानकाळचे डोळस निरीक्षण आणि इतिहासातील अनुभवसिद्ध घटना यांची सांगड घालून सावरकरांनी एका नव्या समाजरचनेचे स्वप्न पहिले. त्याला प्रखर विज्ञाननिष्ठेचा आधार होता. सावरकर परमेश्वरपूजक अवश्य होते, परंतु ते देवभोळे नव्हते. ते एका ठिकाणी लिहितात, 'देव ना कोणाला संकटात ढकलतो, ना कोणाला संकटातून मुक्त करतो. आपणच आपल्या मूर्खपणाने, अज्ञानाने अशक्तपणाने, दुर्बलतेने आपल्याला संकटात ढकलतो आणि आपल्याच शहाणपणाने, सामर्थ्याने संकटातून स्वतःची मुक्तता करीत असतो. मनुष्य देवाच्या ठायी ज्या भावना कल्पितो, त्या विश्वाच्या देवाच्या ठायी अनाठायी व असमंजस ठरतात. विश्वात आपण आहोत, विश्व आपले तर नाहीच. परंतु ते थोड्या अंशी मनुष्याला अनुकूल व फार मोठ्या अंशी प्रतिकूल असते. त्याला नीटपणे समजून घेऊन धीटपणे तोंड देणे हीच माणुसकी.' समर्थ संपूर्ण मानवजातीच्या उन्नयनासाठी हेच सांगतात ना? **'ऐका ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पाहावे आपणास आपण। या नाव ज्ञान।। तैसे प्रचीतीवीण ज्ञान। तेथे नाही समाधान। करुनि बहुतांचे अनुमान। अनहित केले।। हे प्रचीतीने जाणावे । विचारे खुणेसी बाणावे। विचारेवीण शिणावे। तोचि मूर्खपणा।।'** सावरकर जरी क्रांतिकारक असले, तरी ते भावनाप्रधान वृत्तीचे नव्हते.त्यांची हिंदुत्वनिष्ठादेखील प्रखर बुद्धिवादी होती. एक देव, एक देश, एक आशा, एक जाती, एक जीव, एक भाषा अशी गर्जना करणारे सावरकर म्हणत, 'आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका। पितृभू : पुण्यभू:श्चैव स वै हिंदुः रिती स्मृताः' हिंदुधर्मनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे सावरकर म्हणत. समर्थ आणि सावरकर संपूर्ण विश्वाची विचारलेणी आहेत. वेगवेगळ्या काळातील स्वातंत्र्ययुद्धाचे एकेक पर्व आहेत हे दोघे महापुरुष. ऊर्जस्वल राष्ट्रभक्तीची परंपरा सावरकरांनी आपल्या अंगी बाणविली. **'शिवरायाचे आठवावे। रूप शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।।'** ही समर्थांची वाणी प्रत्यक्षात आणून त्यांनी- **'हे हिंदुशक्ति संभूत दीप्तीतमतेजा। हे हिंदूतपस्यापूत ईश्वरी ओजा। हे हिंदुश्री सौभाग्यभूतीच्या साजा। हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजी राजा।'** अशी महाराजांची केवळ आरतीच गायिली नाही, तर महाराजांच्या भवानी तलवारीचे तेज, आपली वाणी, करणी आणि लेखणी यात तसेच जनसामान्यात संक्रमित केले आणि ते कल्पांतापर्यंत टिकून राहण्यासाठी अभिमानाने सांगितले की... **'की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने। लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने।। जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे। बुद्धयाचि वाण धरिले करि हे सतीचे।।'** या देशात अनेक नेते आले, गेले. काळाच्या उदरात गडप झाले. परंतु समर्थ आणि सावरकर या अशा व्यक्ती नाहीत. त्या विभूती आहेत. व्यक्तिमत्त्वाला परतत्त्वाचा स्पर्श झाला की, त्यात विभूतिमत्त्व येते. मग जग त्यांना कल्पांतापर्यंत विसरत नाही. ते आमचे दीपस्तंभ ठरतात. आमच्या संस्कृतीची अजर, अमर, अक्षय्य आणि अविनाशी तत्त्वे ठरतात. या अर्थानेच समर्थ आणि सावरकर ही चिरंजीव तत्त्वे आहेत, मूल्ये आहेत.

पान ५ वरून

## काय हवेः विद्वत्ता की चातुर्य?

अशा प्रकारची लवचिकता छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुद्धा अनेक प्रसंगात दाखवली. परंतु महाभारत युद्धात भीष्माचार्य, द्रोणाचार्य किंवा कृपाचार्य यांना ती दाखवता आली नाही. आपल्या तत्त्वांना किंवा प्रतिज्ञाला थोडी मुरड घालून त्यांनी अधर्माची बाजू सोडली असती तर त्यांच्यासारखे महान कोणी ठरले नसते. परंतु तसे न केल्यामुळे त्यांचा रणांगणामध्ये अंत झाला.

अगदी रामायणातील हनुमान सुद्धा चातुर्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. ही सांगितलेली सगळी माणसे विद्वान, बुद्धिमान तर होतीच परंतु विद्वत्ता आणि चातुर्य त्यांच्या व्यक्तिमत्वात हातात हात घालून चालत होते आणि नेमके हेच आपल्या शिक्षण पद्धतीने करणे अपेक्षित आहे. आजच्या शिक्षण पद्धतीकडे पाहता अनेकदा असे जाणवते की, आजची शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना ज्ञान देते, पण त्यांच्यात व्यावहारिक शहाणपण निर्माण करण्यात कमी पडते. अशी परिस्थिती निर्माण होत आहे. पुस्तकी ज्ञान (विद्वत्ता) मिळते, पदवी मिळते पण मिळालेले ज्ञान कसे वापरावे याचे व्यावहारिक शहाणपण (चातुर्य) येण्यास वेळ लागतो. मोरोपंतांनी याच व्यावहारिक चातुर्यावर भर दिला. म्हणूनच, ते आपल्याला 'विद्वान' होण्यापेक्षा 'चतुर' होण्याचा संदेश देतात. जीवनात पुढे जाण्यासाठी, समस्या सोडवण्यासाठी, आणि आनंदी राहण्यासाठी ही व्यावहारिक बुद्धिमत्ता किंवा चातुर्यच खरे उपयुक्त ठरते.

आज आपल्या हातात माहितीचा अपार साठा आहे, ज्ञानाचे दरवाजे उघडे आहेत; पण जीवन जगताना, निर्णय घेताना, नाती सांभाळताना आणि संकटांचा सामना करताना आपल्याला मदत करते ते चातुर्य, म्हणजेच व्यावहारिक शहाणपण. मोरोपंतांनी शतकांपूर्वी दिलेला संदेश आजही तितकाच लागू आहे. विद्वत्ता महत्त्वाची आहेच, पण चातुर्य त्याहूनही महत्त्वाचे! म्हणूनच, चला, फक्त जाणकार न बनता, जाणिवेने वागणारे बनूया! फक्त माहिती गोळा न करता, त्या माहितीचे जीवनात रूपांतर करू या! फक्त शहाणे न बनता, शहाणपणाने चालणारे बनूया! विद्वत्तेची कास धरत, चातुर्याचा दीप पेटवू या! आणि जीवन अधिक सुंदर, सुकर आणि सुजाण बनवू या....

# बस्तरच्या अरण्यछायेतील सेवाकार्य!

**छत्तिसगढ- बस्तरमध्ये दोन तपाहून अधिककाळ प्रत्यक्ष राहून काम करणाऱ्या डॉ. राम व सुनीता गोडबोले यांना यंदाचा 'पद्मश्री पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला. इतके प्रदीर्घ काळ सामाजिक कार्यात राहूनही महाराष्ट्राला अपरिचित असणाऱ्या या सेवासमर्पित दांपत्याच्या कार्याचा सविस्तर परिचय देणारा हा विशेष लेख !**

गौरव
विवेक गिरीधारी
भ्र. ९४२२२३१९६७

तरुण वयात आयुष्यभर सामाजिक सेवा करण्याची स्वप्न बघणारे अनेक जण असतात. काहीजण तसे बोलूनही दाखवत असतात. परंतु फारच थोडे मोजके लोक ते प्रत्यक्षात आणण्याचे धाडस दाखवू शकतात. अश्या मोजक्या लोकांपैकीच डॉ. राम व सुनीता गोडबोले हे सेवासमर्पित दांपत्य आहे. हे दांपत्य गेली तीन तपांहून अधिक काळ वनवासी जनजाती समाजाच्या सेवेत रममाण झाले आहे. नक्षलवादामुळे सर्वांना परिचित असलेल्या छत्तीसगढ राज्यातील बस्तर परिसरातील दंतेवाडा जिल्ह्यात सध्या हे दांपत्य काम करीत आहेत. दीड तपाहून अधिककाळ त्या वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बस्तरमध्ये आदिवासी जनजाती महिलांमध्ये काम करीत आहेत.

मूळच्या पुणेकर असणाऱ्या सुनिताताई या सहकारनगरमधील पूर्वाश्रमीच्या सुनीता पुराणिक आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थीदशेत त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अ.भा.वि.प.) संपर्कात आल्या व सामाजिक कामाशी अधिकाधिक संलग्न होत गेल्या. अभाविप तत्कालीन ज्येष्ठ नेते यशवंतराव केळकर व बाळासाहेब आपटे यांच्या अभ्यासवर्गातील मांडणीमधून त्यांना सामाजिक कार्याची दृष्टी मिळाली. स्वतःकडे न बघता समाजाकडे बघितले पाहिजे या दृढ संस्काराचा वसा मिळाला. त्यातूनच त्यांचे आयुष्यभर आदिवासी भागात प्रत्यक्ष राहून काम करण्याची दिशा निश्चित होत गेली. त्यानुसारच त्यांनी मग ठरवून सामाजिक सेवेच्या संदर्भातील एम एस डब्लू (M.S.W.) चे पदव्युत्तर शिक्षण कर्वे शिक्षणसंस्थेतून शिक्षण पूर्ण केले. काहीकाळ पुण्यातील एका सामाजिक संस्थेत अनुभवासाठी दोन वर्ष नोकरी केली. परंतु आयुष्यभर आदिवासी भागात काम करण्याचे स्वप्न काही त्यांना स्वस्थ बसू देईना.

### वनवासी क्षेत्राचा परिचय :

तत्कालीन संघप्रांत प्रचारक कै. दामुअण्णा दाते यांच्याशी बोलणे करून त्यांच्या योजनेनुसार प्रत्यक्ष वनवासी क्षेत्रातील सुनिताताईंच्या पूर्ण वेळ कामास सुरुवात झाली. १९८४ मध्ये सुरवातीला सहा महिने त्या ठाणे जिल्ह्यातील तलासरी केंद्रावर राहिल्या. त्यावेळेस कै. केशवराव केळकर हे ज्येष्ठ संघप्रचारक वनवासी क्षेत्रात अत्यंत आत्मियतेने कार्यरत होते. त्यांची त्यावेळेसची वनवासी भगिनींसाठी दिवाळीची 'साडी- चोळी भाऊबीज' योजना अनेकांच्या आजही स्मरणात आहे. अशा या केशवरावांबरोबर वनवासी क्षेत्रात प्रासंगिक फिरण्याची संधी सुनिताताईंना मिळाली. त्यातून त्यांना वनवासी समाजाची खरी ओळख झाली. सुरवातीला फक्त काही वर्षे वनवासी क्षेत्रात काम करण्याचा त्यांना विचार होता. सहा महिन्याची उमेदवारी संपल्यानंतर सुनिताताईंची रायगड जिल्ह्यातील जांभिवली केंद्रावर वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्ण वेळ काम करण्यास रीतसर सुरुवात झाली. त्यावेळेस जांभिवली केंद्रावर काम करण्यास नुकतेच कुंटे काका-काकूंनी सुरुवात केली होती. या जोडगोळीची आणि सुनिताताईंची चांगली गट्टी जमली.

आदिवासी महिलांमध्ये प्रत्यक्ष राहून त्यांच्यात मिसळून काम करण्याची संधी त्यांना जांभिवलीतील वास्तव्यात मिळाली. तेथील चार वर्षाच्या वास्तव्यात त्यांचा आत्मविश्वास दुणावला व आयुष्यभर आदिवासी भागात काम करण्याचा निश्चय अधिकच दृढ झाला. या त्यांच्या निश्चयाला अनुकूल असणाऱ्या जीवनसाथीदाराची निवड करण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे आदिवासी भागात प्रत्यक्ष राहून वैद्यकीय सेवा देण्याची स्वप्ने पाहणाऱ्या डॉ. राम गोडबोले यांच्याशी त्यांचे १९९०मध्ये लग्न झाले. लग्नानंतर छत्तिसगढ-बस्तरला जाण्याचे आवाहन या नवविवाहित दांपत्याला वनवासी कल्याण आश्रमाचे तत्कालीन संघटनमंत्री भास्करराव कळंबी यांनी केले. या प्रस्तावास अनुकुलता दर्शवत लगेचच या नवविवाहित दांपत्याने बस्तरमधे वनवासी कल्याण आश्रमाचे एक तपासाठी पूर्णवेळ राहून काम करण्याचा निर्णय निर्धारपूर्वक घेतला. अन लगोलग दाखलही झाले.





### बस्तरमधील सेवामय सहजीवनाची सुरुवात:

दंतेवाडा जिल्ह्यातील बारसूर (ता. गीदम) येथील आदिवासी मुलीच्या छात्रावासाची महत्वाची जबाबदारी सुनीताताईंनी स्वीकारली आणि डॉ. राम गोडबोले यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बारसूरमध्येच दवाखाना सुरु करून आदिवासींना वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली. पूर्वायुष्य पूर्णपणे शहरात गेलेल्या या सुशिक्षित नवविवाहित दांपत्याची सहजीवनाची सुरुवात बस्तरमधील मातीच्या घरात झाली. दीड वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या व पडक्या स्थितीत असलेला दवाखाना आता पुन्हा आदिवासी रुग्णांनी गजबजू लागला. सुनिताताईंमुळे बारसूरला आदिवासी मुलींचे वसतिगृह नव्याने १९९१मध्ये चालू करण्यात आले. वसतिगृहात शिकायला मुली आणण्यासाठी आदिवासी पाड्यांमध्ये सुरुवात झाली. या कामाशी सुनीताताई एवढ्या समरस झाल्या की त्यांनी झटपट तेथील आदिवासींची स्थानिक 'गोंडी व हल्बी' भाषा शिकून घेतली. त्यातून त्यांचा स्थानिक आदिवासींशी सहजपणे व सफाईदारपणे संवाद होऊ लागला. आदिवासी महिलांशी जवळीक वाढून मोठे संघटन हळूहळू उभे राहिले. त्यातून काही वनवासी महिला



कार्यकर्त्या हिरीरीने कामाला त्यांच्यासोबत पुढे आल्या. स्थानिक भाषा येण्याचा मोठा फायदा डॉ. राम गोडबोले चालवत असलेल्या दवाखान्यातील रुग्णांची संख्या स्वाभाविकपणे वाढण्यात झाला. प्रतिवर्षी बस्तर दौऱ्यात गोडबोले पती- पत्नीची भेट घेऊन त्यांच्या कामाची जिव्हाळ्याने विचारपूस करण्याचा भास्करराव कळंबी यांचा परिपाठ २००१ पर्यंत चालू होता. कार्यकर्त्यांना सांभाळणे व कायम प्रेरणा देत रहाणे. हे भास्कररावांचे स्वभाववैशिष्ट होते.

आजही भास्कररावांच्या आठवणी या गोडबोले पती-पत्नींसाठी एक हळवा कोपरा आहे. ठरविल्याप्रमाणे एक तप पूर्णवेळ काम केल्यानंतर २००२मध्ये सुनिताताईंना कौटुंबिक आजारपण व अन्य कारणांमुळे महाराष्ट्रात येण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. या दरम्यान त्यांनी पालघर जिल्ह्यातील विक्रमगड परिसरात किशोरी मुलींचे आरोग्य शिक्षण व वनवासी महिलांच्या संघटनाचे काम प्रत्यक्ष राहून केले. दहा वर्षे तेथे काम केल्यानंतर त्यांना पुन्हा बस्तरची ओढ वाटू लागली. महाराष्ट्रातील आदिवासी तुलनेने सुशिक्षित आहे, त्यामुळे आपली खरी गरज बस्तरमधील आदिवासींसाठीच आहे. महाराष्ट्रात अनेकजण सुदैवाने काम करतात. बस्तरमध्ये आपल्याशिवाय कोण जाणार? असा विचार करून अखेरीस २०१२ साली पुन्हा बस्तरमध्ये पुढील दहा वर्षांसाठी कामाला जाण्याचा निर्णय डॉ. राम व सुनिता गोडबोले यांनी घेतला व ते परत बस्तरमध्ये लगेचच दाखल झाले.

### बस्तरमधील कामाचे बदलत जाणारे स्वरूप :

दरम्यानच्या काळात २००० साली छत्तिसगढ स्वतंत्र राज्य झाले. पुढे टप्प्याटप्प्याने मूळ बस्तर प्रदेशाचे सात आदिवासी जिल्हे झाले. बदलत्या परिस्थितीनुसार व स्थानिक कामाच्या गरजेनुसार बस्तरमधील कामाचे स्वरूप बदलत गेले. दोघेही वनवासी कल्याण आश्रमाच्या बारसूर कार्यालयात सध्या रहात आहेत. आदिवासी मुलींच्या वसतिगृहात प्रासंगिक लक्ष घालून सुनिताताई आजूबाजूच्या परीसरातील आदिवासी पाड्यांवरील स्थानिक महिला आरोग्य सेविकांबरोबर काम करीत आहेत. बालकांच्या कुपोषणावर मात करण्यासाठी त्यांची आरोग्यविषयक प्रशिक्षणे घेत आहेत. नियमित प्रशिक्षणाचा महत्वाचा आयाम सध्या त्याला जोडला गेलेला आहे. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या प्रथम श्रेणी न्यायाधीशांचे अधिकार प्राप्त असणाऱ्या न्यायपिठाच्या अधिकारी सदस्या म्हणून सुनीताताईंनी अलिकडे पाच वर्षे काम केलेले आहे. याशिवाय शासकीय यंत्रणेत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून प्रतिबंध करणाऱ्या समितीच्या अध्यक्षा राहिलेल्या आहेत. पोलीस व वन विभागाच्या अशाच स्वरूपाच्या जिल्हा समितीच्या त्या सदस्या होत्या. महिला व लहान मुलांच्या आरोग्यासाठी अतिशय घातक असणारे व रॉकेलवर चालणारे दिवे प्रकाशासाठी आजही बस्तरमध्ये वापरले जातात. त्याला समर्थ व सक्षम आधुनिक पर्याय म्हणून शेकडो वनवासींच्या घरांमध्ये सुनीताताईंनी सौर दिवे मध्यंतरी तीन वर्षात पोहोचवले. हे दिवे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी कृतज्ञता ट्रस्टचे सहकार्य लाभले.

डॉ. राम गोडबोले हेही आता पूर्वीसारखा एका जागी दवाखाना चालवत नसून गावोगाव आरोग्य शिबिरे घेत आहेत. हैद्राबादवरून रातोरात लांबचा प्रवास करून अत्यंत नियमितपणे आरोग्य शिबिरांना उपस्थित राहणारे डॉ. करमाळकर या तज्ञ डॉक्टरांची मोलाची साथ गेले काही वर्ष मिळत आहे. स्थानिक आदिवासी रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित राहून ही शिबिरे यशस्वी करण्यातही सुनिताताईंचा मोठा वाटा आहेच. सर्वात महत्वाचे म्हणजे गंभीर आजाराने त्रस्त असलेले परंतु पैश्याअभावी अथवा अज्ञानामुळे



उपचार टाळणाऱ्या रुग्णांना जगदलपुर (७५ की.मी.) व रायपुर (४०० की.मी.) येथे पुढील तपासण्यांसाठी व प्रत्यक्ष शस्त्रक्रियांसाठी या वनवासी रुग्णांना राजी करण्याच्या अवघड कामात डॉ. गोडबोले व सुनीताताई अथकपणे प्रयत्न करीत आहेत. एकेका रुग्णाचा पाठपुरावा करून उपचाराची प्रक्रिया पूर्ण करण्यात दमछाक होते आहे. शिवाय अश्या सर्व रुग्णांपर्यंत पोहोचून ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आपण अपुरे पडतो आहोत याची जाणीव होऊन होणारी मानसिक घुसमट तर वेगळीच!

### बस्तरमधील विधायक कामाचे ऊर्जा केंद्र :

गेल्या पाच-दहा वर्षात बस्तरसारख्या दुर्गम प्रदेशात सामाजिक काम करण्याच्या ऊर्मीने अनेक युवक-युवती देशभरातून येऊन दाखल होत आहेत. वर्ष-दोन वर्ष काम करून परतणारे अनेक जण असले तरी मोजक्या संख्येने का होईना पण स्थिरावण्याची स्वप्न बघणारेसुद्धा काहीजण आहेत. तेलंगणातील प्रणित सिंम्भा तसेच महाराष्ट्रातील आकाश बडवे, ज्योती पटाले, श्रीराम देशपांडे आणि उत्तरप्रदेशमधील आशिष-शालिनी श्रीवास्तव हे यापैकी काहीजण आहेत. ही सर्व मंडळी ठीकठिकाणाहून विभिन्न प्रेरणा घेऊन आली असून आपापल्या परीने सामाजिक कामाचे वेगवेगळे प्रयोग तेथे करीत आहेत. या सर्वांसाठी गोडबोले पती-पत्नींचे बस्तरमधील प्रदीर्घ वास्तव्य हा अनुभवाचा आणि प्रेरणेचा आश्वासक ठेवा आहे! घरादारापासून हजारो किलोमीटर असणाऱ्या या तरुण मंडळींसाठी तो एक प्रकारचा हक्काचा कौटुंबिक-मानसिक आधार आहे.

देशातला सर्वात मागास प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बस्तरसारख्या सुदूर परिसरात आरोग्य, शिक्षण व कुपोषण ह्या क्षेत्रात हे सेवासमर्पित दांपत्य भरीव योगदान करीत आहे. असे असले तरी अनेक वर्षे महाराष्ट्रापासून दूर राहिल्यामुळे डॉ. गोडबोले पती-पत्नींचे कामही महाराष्ट्रात अनेकांना फारसे माहित नाही. जीवघेणे दुखणे जीव मुठीत धरून महिनोंमहिने अंगावर काढणाऱ्या आदिवासी रुग्णांना जीवदान मिळवून देण्याचे फार मोठे पवित्र व मानवतेचे कार्य हे दोघेजण तेथे चिवटपणे करीत आहेत. शहरवासीयांच्या ते खिजगणतीतही नाही. तरीपण त्यांच्या अविरत चालणाऱ्या कामाची दखल घेऊन त्यांना पुण्यातील नातू प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार देऊन यापूर्वी गौरविण्यात आले आहे. वनवासी रुग्णांना जीवदान मिळवून देणाऱ्या त्यांच्या सेवाभावी मानवतावादी कार्याची दखल बाया कर्वे पुरस्कारामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राने घेतली. आता तर 'पद्मश्री' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेच्या सन्मान पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे. 'बस्तरमधील आदिवासींचे शोषण, भ्रष्टाचार, सन्मान नसणे, दुय्यम नागरिकत्वाची वागणूक मिळणे हे प्रमुख प्रश्न आहेत. यासर्वांकडे शहरी समाजाचे झालेले मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष कारणीभूत आहे. यातून मग एखादा आदिवासी माणूस बंदूक उचलायला राजी होतो. म्हणून वर्तमानकाळात तरी आपण या समाजाच्या उत्थानासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले पाहिजेत', हे सुनिताताईंचे म्हणणे विचार करायला लावणारे आहे.

खरे, तर पर्यटनात आघाडीवर असणारी महाराष्ट्रीय मंडळी देश-विदेश धुंडाळत फिरत असतात. यापैकी काहींनी तरी वाकडी वाट करून पर्यटनाच्या निमित्ताने बस्तरला जाऊन गोडबोले पतीपत्नींना भेटायला काय हरकत आहे?

# जागतिक विवेकाची परीक्षा

**जागतिक तापमानवाढ ही आता भविष्यातील समस्या नसून, ते वर्तमानाचे कटू वास्तव आहे. वाढते तापमान, वितळणारे हिमनग, समुद्रपातळीतील वाढ, अतिवृष्टी, दुष्काळ, वणवे आणि चक्रीवादळांची आवर्तने या सर्व घटना, मानवी हस्तक्षेपाच्या मर्यादा ओलांडून पुढे गेल्याचे स्पष्ट संकेत देत आहेत. अशा अशांततेच्या टप्प्यावर निसर्गचक्राच्या रक्षणासाठी जागतिकसमुदायाने सामूहिक जबाबदारी म्हणून 'पॅरिस हवामान करारा'च्या माध्यमातून किमान एक समान दिशा निश्चित केली होती.**



वेधक
कौस्तुभ वीरकर

'पॅरिस हवामान करार' हा केवळ पर्यावरणविषयक करारच नव्हता, तर तो जागतिक राजकारणातील एक दुर्मीळ सहमतीचा क्षण होता. अनियंत्रित कार्बन उत्सर्जनामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान मर्यादेत ठेवणे, हेच या कराराचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यासाठी प्रत्येक देशाने आपापल्या क्षमतेनुसार उत्सर्जन कमी करण्याची स्वैच्छिक; पण नैतिकदृष्ट्या बंधनकारक उद्दिष्टे निश्चित करणे, दर पाच वर्षांनी त्यांचे पुनरावलोकन करणे, तसेच विकसित देशांनी विकसनशील राष्ट्रांना उद्दिष्टपूर्तीसाठी आर्थिक व तांत्रिक मदत करणे, हीच या कराराची मूलभूत रचना होती. या करारात अमेरिका एक प्रमुख प्रेरक शक्ती होती.

गेल्या काही वर्षांत जागतिक पातळीवर तापमानवाढीच्या कार्यामध्ये अमेरिका मोठे आर्थिक योगदान देत असली, तरीही अमेरिकेला स्वतःच्या देशातच या कराराची उद्दिष्टे साधण्यात सातत्याने अपयश येत असल्याचे अनेक अहवालामधून उघड झाले होते. यामुळेच जगातील सर्वाधिक ऐतिहासिक कार्बन उत्सर्जन करणारे राष्ट्र असलेल्या अमेरिकेने या करारातून पुन्हा एकदा माघार घेणे, ही केवळ धोरणात्मक भूमिका नसून जागतिक विवेकालाच आव्हान देणारी कृती ठरते. या निर्णयातील सर्वांत गंभीर बाब म्हणजे, अमेरिकेला स्वतःला हवामानबदलाचे दाहक परिणाम भोगावे लागूनही त्यातून कोणतेही दीर्घकालीन शहाणपण त्यांना आलेले दिसत नाही. कॅलिफोर्नियातील वणवे, फ्लोरिडातील तीव्र चक्रीवादळे, टेक्सासमधील भीषण थंडी, न्यूयॉर्कपासून पॅसिफिक किनाऱ्यापर्यंत अनुभवलेली विक्रमी उष्णता या सर्व घटना हवामानबदलाचे प्रत्यक्ष परिणाम म्हणून अमेरिकेच्या सामाजिक व आर्थिक-व्यवस्थेवर मोठे आघात करत आहेत. अब्जावधी डॉलर्सचे नुकसान, विस्थापित लोकसंख्या, विमा-व्यवस्थेवरील ताण आणि सार्वजनिक आरोग्यावर होणारे परिणाम याची यादी मोठीच आहे. तरीही, या अनुभवांतून बोध घेण्याऐवजी अमेरिका हवामान धोरणाकडे राजकीय सोयीच्या चष्म्यातून पाहते, ही बाब सर्वाधिक चिंताजनक अशीच. 'पॅरिस करारा'तून बाहेर पडणे, हे अमेरिकेचे एकाकी पाऊल नाही; ते तिच्या सातत्याने बदलणार्या जागतिक भूमिकेचेही द्योतक आहे. अमेरिकेत सत्तेवर कोणता पक्ष आहे, त्याची विचारधारा कोणत्या टोकाची आहे, यावर सध्या अमेरिकेची धोरणे अवलंबून असतात. अमेरिकेचा सध्याचा निर्णय अल्पकालीन राजकीय फायद्यांसाठी आंतरराष्ट्रीय बांधिलकी किती सहज मोडता येते, याचे उत्तम उदाहरण ठरावे. जागतिक करार, बहुपक्षीय संस्था आणि त्यांची दीर्घकालीन धोरणे ही एखाद्या देशाच्या अंतर्गत राजकारणाची बळी ठरत असतील, तर त्या देशाला जागतिक नेतृत्वाचे केंद्रस्थान देणे कितपत सुरक्षित आहे, हा प्रश्न उपस्थित होणे अपरिहार्यच. यातील उदासीनतेचा फटका आफ्रिकेतील दुष्काळग्रस्त देशांना, आशियातील किनारी भागांना आणि लहान बेट राष्ट्रांच्या अस्तित्वालाही बसतो.

आज जग एका निर्णायक वळणावर उभे आहे. जर प्रमुख महाशक्तींची धोरणे सत्ताबदलानुसार झुलत राहणार असतील, तर जागतिक विकासाचा प्रवाह स्थिर राहणे अशक्य आहे. म्हणूनच, आता जागतिक समुदायाने अमेरिकेकडे केवळ सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून नव्हे, तर अस्थिर धोरणांचा धोका असलेला घटक म्हणूनही पाहण्याची वेळ आली आहे. हवामानबदलाच्या संघर्षात नेतृत्व हे शब्दांनी नव्हे, तर सातत्यपूर्ण कृतीने सिद्ध होते. जर विज्ञान, अनुभव आणि मानवी भविष्य यांपेक्षा राजकीय विचारधारा वरचढ ठरणार असेल, तर अशा नेतृत्वाखालील जागतिक- व्यवस्थेला भविष्य ते काय उरणार? जगाच्या पुढील पिढ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवायचे असेल, तर 'हवामान करारा'विषयी नेतृत्वाची गरज आहे, अन्यथा होणारा घात केवळ अमेरिकेपुरता मर्यादित राहणार नाही. त्यामुळे यापुढे निर्णय घेताना जागतिक विवेकाच्या परीक्षेचा काळ असेल, हे नक्की!

**जगामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हे सर्वांत शक्तिशाली शस्त्र आहे, असे मत नेल्सन मंडेला यांनी व्यक्त केले होते. केवळ दक्षिण आफ्रिकाच नव्हे, तर जगभरात कृष्णवर्णीयांसाठी, पिचलेल्या घटकांच्या सन्मानासाठी लढणाऱ्या लोकांचे ते आदर्श ठरले. वसाहतवाद, गुलामगिरी, शोषण या सगळ्याविरोधात लढा देण्यासाठी, जगभरामध्ये माणसं रस्त्यावर उतरली. या संघर्षाचा पाया म्हणजे, ज्ञानातून आलेली मुक्तीची जाणीव. शिक्षणाच्या अभावामुळे माणसं आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहिली आणि गुलामीच्या जोखडात अडकली. २१ व्या शतकामध्ये तर ज्ञानाधारित क्रांतीनेच जगात परिवर्तन घडले.**

# विद्येची सत्ताकेंद्रे



समाजभान
मुकुल आव्हाड

उच्चशिक्षणाला राष्ट्राच्या समूहजीवनातसुद्धा अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तर तंत्रज्ञानावर आधारित साक्षरता, हा व्यावसायिक जगाचा पायाच झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये विद्यापीठांमध्ये दिले जाणारे शिक्षण, त्यातली गुणवत्ता, या ज्ञानकेंद्रांतून घडणारे विद्यार्थी यांच्यावरच प्रत्येक राष्ट्राची भिस्त असल्याचे लक्षात येते. अशा या विद्यापीठांचे मानांकन वेळोवेळी होत असते. अशातच सध्या जागतिक स्तरावरील विद्यापीठांच्या संदर्भातील, सीडब्ल्यूटीएस लीडेन रँकिंगचा अहवाल सध्या सगळीकडे चर्चेत आहे. विकसित तथा विकसनशील राष्ट्रांमधील विद्यापीठांविषयी आपल्याला या अहवालातून माहिती तर मिळतेच, मात्र त्याचबरोबर वेगवेगळ्या देशातील शिक्षणविषयक धोरणांवरसुद्धा हा अहवाल भाष्य करतो.

या गुणतालिकेमध्ये चीनच्या झिजियांग विद्यापीठाने पहिले स्थान पटकावले असून, हार्वर्ड विद्यापीठ तिसर्या क्रमांकावर आहे. आश्चर्याची बाब म्हणजे पहिल्या दहा विद्यापीठांतील आठ विद्यापीठे ही, चीनमधील आहेत. जागतिक स्तरावर आज आपल्याला जो सत्तासंघर्ष बघायला मिळतो, त्यामध्ये चीनचा वाटा दिवसेंदिवस चढता आहे. त्याव हा अहवाल बरेच काही सांगून जातो. या अहवालाच्या निकषांसंदर्भात भाष्य करताना 'सेंटर फॉर सायन्स ण्ड टेक्नोलॉजी स्टडीज'चे सेवा संचालक मार्क नेजसेल म्हणतात की, 'क्लॅरिव्हेट' या डेटा कंपनीकडे असलेल्या शैक्षणिक प्रकाशनांचा संचच, या गुणतालिकेसाठी अभ्यासला जातो. या शैक्षणिक नियतकालिकांच्या अभ्यासातून रँकिंगची श्रेणी तयार होते. या अहवालामध्ये अमेरिका आणि चीन यांच्यातील शिक्षणधोरणावर प्रकाश टाकण्यात आला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हिसाच्या कडक नियमांमुळे अमेरिकेत शिक्षणासाठी येणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होय. ट्रम्प प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सरकारी अनुदानामध्ये झालेली घट लक्षात घेता, अमेरिका नेमक्या कुठल्या वळणावर आहे यावरच प्रश्न उपस्थित केले आहे. तिथेच दुसऱ्या बाजूला चीनने मात्र, आपल्या विद्यापीठांमध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित संशोधनासाठी, व्यवसायासाठी विशेष व्हिसा देण्याची सुरुवातसुद्धा चीनने केली आहे. वैज्ञानिक वर्चस्वावर राष्ट्राची जागतिक शक्ती अवलंबून असते, असाच विचार चीनच्या शीर्षस्थ नेतृत्वाचा या धोरणामागे आहे. अमेरिका आणि रशियासारख्या बलाढ्य राष्ट्रांसोबत स्पर्धा करायची असेल, तर प्रथमतः आपले ज्ञानकेंद्र बळकट व्हायला हवे, असाच विचार केल्याचे दिसून येते. काही राष्ट्रांमधील विद्यापीठांचे अस्तित्व राजकारणाचे आखाडे आणि वामपंथीयांचे अड्डे इतक्या मर्यादित स्वरुपात उरलेले आहेत. यातून नेतृत्व उदय होत नाहीच; परंतु देशाची वाताहत नक्की होते. त्यामुळे येणाऱ्या काळात विद्यापीठं म्हणजे केवळ ज्ञानाची केंद्रं नसून, ती विद्येची आंतरराष्ट्रीय सत्ताकेंद्रेसुद्धा होऊ शकतात, याचा विचार होणे गरजेचे आहे.



# संकल्प विकासाचा, मार्ग 'एआय'चा!

**आकलन**

**विजय कुलकर्णी**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या नवव्या अर्थसंकल्पात 'एआय' तंत्रज्ञानावर विशेषत्वाने भर देण्यात आला. 'एआय' कौशल्यापासून ते डेटा सेंटर, ते अगदी कृषी क्षेत्रापर्यंत 'एआय'चा सरकारने खोलवर विचार केलेला दिसतो. त्याचे आकलन करणारा हा लेख...**

१ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातील एक ठळक आणि वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, विकासाच्या केंद्रस्थानी असलेले 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधा. 'एआय'चा सरकारने स्वतंत्र क्षेत्र म्हणून विचार न करता प्रशासन, कृषी, शिक्षण, रोजगार आणि सेवा क्षेत्रातील विकासाचे साधन म्हणून त्याची उत्तम सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे 'डिजिटल इंडिया' आणि 'विकसित भारत' या संकल्पनांना पुढील टप्प्यावर नेण्यासाठी 'एआय'ला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात डेटा सेंटर गुंतवणूक आणि 'लाऊड' सुविधांसाठी प्रोत्साहनापासून ते कृषी क्षेत्रात 'भारत- विस्तार'सारख्या महत्त्वाकांक्षी योजनांचा समावेश आहे. त्याचबरोबर कौशल्य आणि रोजगाराच्या क्षेत्रातही 'एआय'ला अंतर्भूत करण्यासाठीचे सरकारचे 'व्हिजन' यंदाच्या अर्थसंकल्पातून प्रामुख्याने अधोरेखित झाले.

'एआय'विषयी अजूनही मतमतांतरे असली, तरी त्याच्या व्यापक वापराबद्दल बहुतांशी एकमत झाल्याचे दिसते. तेव्हा, 'एआय'कडे कदापि दुर्लक्ष करुन चालणार नाही, हे खासगी क्षेत्रासह सरकारी स्तरावरही आता स्वीकारार्हच. म्हणूनच यंदाच्या अर्थसंकल्पात 'एआय' संशोधन आणि नवोपक्रमासाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. देशांतर्गत डेटा सेंटर्स, उच्च क्षमतेची संगणकीय साधने, तसेच स्टार्टअप्स आणि शैक्षणिक संस्थांना संशोधनासाठी आवश्यक असलेली साधने उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. यामागील प्रमुख उद्देश म्हणजे, भारताला केवळ 'एआय' वापरणारा देश एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता, 'एआय' विकसित करणारा आणि निर्यात करणारा देश म्हणून नावारूपाला आणणे. यामुळे तंत्रज्ञान क्षेत्रातील आत्मनिर्भरतेला चालना मिळेल, तसेच परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्वही कमी होण्यास हातभार लागेल. एकूणच, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने अर्थव्यवस्थेत 'एआय'चे प्रमाण वाढवण्यासाठी पायाभूत सुविधा, धोरणात्मक प्रोत्साहने याबाबत अधिक संरचनात्मक दृष्टिकोन निवडलेला दिसतो. अर्थसंकल्पातील सर्वात परिणाम कारक घोषणांपैकी एक म्हणजे, 'लाऊड' आणि डेटा सेंटर गुंतवणुकीसाठी दीर्घकालीन कर प्रोत्साहन. याअंतर्गत जागतिक ग्राहकांना सेवा प्रदान करण्यासाठी भारतीय डेटा सेंटर्स वापरणाऱ्या परदेशी 'लाऊड' सेवा पुरवठादारांना २०४७ पर्यंत म्हणजे तब्बल २१ वर्षांची करसवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे साहजिकच, भारत 'क्लाऊड हब' म्हणून विकसित होऊ शकतो.

डिजिटल पायाभूत सुविधांविषयी बोलताना मंत्री अश्विनी वैष्णव सांगतात की, डेटा सेंटर्स, विशेषतः एआय डेटा सेंटर्स, एआय आर्किटेचरच्या पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या क्षेत्रात भारतात सुमारे ७० अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक आधीच सुरू आहे. आणखीन ९० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली आहे. यावरून या क्षेत्राकडे मोदी सरकार किती गांभीर्याने पाहते आहे, त्याचा अंदाज यावा. नोकऱ्या आणि कौशल्यांवर 'एआय'च्या प्रभावाचे मूल्यांकन करून २०४७ पर्यंत जागतिक सेवा बाजारपेठेत दहा टक्के वाटा सरकारने लक्ष्य केला आहे. त्यासाठीच विविध क्षेत्रांमध्ये 'एआय'चा कसा सकारात्मक वापर करता येईल, यावर सरकारचा कटाक्ष दिसून येतो. कृषी क्षेत्रात 'एआय'च्या वापरामुळे उत्पादनक्षमता वाढवण्याचा मार्ग अर्थसंकल्पात अधोरेखित करण्यात आला आहे. हवामानाचा अंदाज बांधणे, पिकांचे रोग ओळखणे, मातीच्या गुणवत्तेचे विश्लेषण आणि योग्य खत व पाण्याचे नियोजन यासाठी 'एआय' आधारित प्रणालींचा वापर केल्यास शेतकऱ्यांचे खर्च कमी होऊन उत्पन्नही वाढू शकते. दीर्घकालीन विचार करता, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होईल आणि कृषी क्षेत्रातील अनिश्चितता कमी होईल. ही बाब भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी आर्थिक आणि सामाजिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून तितकीच महत्त्वाची म्हणावी लागेल.

कृषी क्षेत्रानंतर आरोग्य क्षेत्रातील 'एआय'चा वापर हादेखील यंदाच्या अर्थसंकल्पातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा. रोगनिदान, वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण, रुग्णांची माहिती व्यवस्थापन आणि टेलिमेडिसीन यासाठी 'एआय' आधारित उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होतील. भविष्यात आरोग्य खर्चावर होणारा ताण कमी होऊन प्रतिबंधात्मक उपचारांना चालना मिळेल, असा अपेक्षित फायदा या धोरणातून दिसतो. शिक्षण क्षेत्रात 'एआय'मुळे वैयक्तिक गरजांनुसार शिक्षण आता शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता आणि आवडी-निवडी लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची आता आखणी करता येईल. शिक्षकांसाठी मूल्यांकन आणि प्रशासकीय कामे अधिक सुलभ होतील, तर विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षणाची दारे उघडतील. दीर्घकाळात यामुळे रोजगारक्षम मनुष्यबळ तयार होईल. प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये 'एआय'चा वापर केल्यास निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम होऊ शकते. करसंकलन, लाभार्थी ओळख, फसवणूक प्रतिबंध आणि सार्वजनिक योजनांची अंमलबजावणी याम ध्ये 'एआय'आधारित प्रणाली वापरल्यास सरकारी खर्चातील गळती कमी होण्याची शयता आहे. यामुळे 'किमान सरकार, कमाल शासन' या तत्त्वाला प्रत्यक्ष स्वरूप मिळू शकते. एकूणच, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात दिलेला 'एआय'वरील भर लक्षात घेता, भारताच्या आर्थिक वाढीचा वेगही वाढवू शकतो. नव्या रोजगार संधी, उच्च मूल्याची कौशल्ये, जागतिक स्पर्धेत स्थान आणि सामाजिक समावेशकता हे सर्व घटक 'एआय'च्या प्रभावी वापराशी जोडलेले आहेत. मात्र, डेटासुरक्षा, नैतिकता आणि रोजगारांवरील संभाव्य परिणाम यांसारख्या आव्हानांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याचबरोबर 'एआय'संबंधी केलेल्या सर्व घोषणांची कालबद्ध स्वरूपात अंमलबजावणी होईल; त्या घोषणा, प्रस्तावित निधी हा केवळ कागदावर राहणार नाही, याकडेही तितकेच गांभीर्याने पाहणे गरजेचे. सरकार त्याबाबतीत तत्परता आणि सजगता दाखवेल, यात शंका नाहीच. एकूणच पाहता, यंदाचा अर्थसंकल्प भारताला तंत्रज्ञानाधिष्ठित, नवोन्मेषी आणि भविष्योन्मुख अर्थव्यवस्थेकडे मार्गस्थ करणारा ठरला आहे, हे मात्र निश्चित!

# डिझाइन क्षेत्रातील करिअर:

## भविष्यातील आव्हानांवर नाविन्यपूर्ण उत्तर



**करिअरच्या वाटा**

**धर्मेश टांक**

आजच्या वेगवान युगात बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर बहुतांश विद्यार्थी आणि पालकांचा ओढा अजूनही इंजिनिअरिंग (BE), बी.बी.ए. (BB), बी.कॉम किंवा बी.एस्सी. अशा पारंपरिक पदव्यांकडेच दिसतो. मात्र, बदलत्या जागतिक बाजारपेठेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि ऑटोमेशनमुळे या क्षेत्रांतील नोकऱ्यांचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. अशा वेळी 'बॅचलर ऑफ डिझाइन' (B.Des) हा कोर्स विद्यार्थ्यांसाठी केवळ एक पदवी नसून भविष्यातील सुरक्षित करिअरची गुरुकिल्ली ठरणार आहे.

**एआय आणि भविष्यातील संकट**

गेल्या काही वर्षांत AI ने कोडिंग, डेटा एन्ट्री आणि अकाउंटिंग यांसारखी पुनरावृत्ती होणारी (Repetitive) कामे अधिक प्रभावीपणे करण्यास सुरुवात केली आहे. ज्या कामांमध्ये केवळ तर्क आणि ठराविक पॅटर्नचा वापर होतो, अशा सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग किंवा बँकिंग क्षेत्रातील अनेक नोकऱ्यांवर आज धोक्याची तलवार आहे.

विशेषतः साध्या कोडिंगचे काम आता AI मिनिटांत करू शकते, ज्यामुळे या क्षेत्रातील 'रटाळ' आणि 'म्युंडेन' (Mundane) प्रोफाइल्स भविष्यात इतिहासजमा होऊ शकतात.

**डिझाइन का निवडावे?**

डिझाइन हे क्षेत्र केवळ 'चित्रकला' नसून ते 'समस्या निवारण' (Problem Solving) आहे. AI कितीही प्रगत झाले तरी मानवी भावना, सहानुभूती (Empathy), सांस्कृतिक संदर्भ आणि सर्जनशीलता (Creativity) यांची जागा घेऊ शकत नाही.

एखादे उत्पादन वापरताना माणसाला काय वाटेल, हे केवळ एक मानवी मेंदूच समजू शकतो. त्यामुळेच प्रॉडक्ट डिझाइन, यूआय/यूएक्स (UI/UX), फॅशन डिझाइन आणि ग्राफिक्स या क्षेत्रांना मोठी मागणी आहे.

**भारतातील संधी**

भारतात 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन' (NID), 'आयआयटी' (IIT) आणि निफ्टच्या (NIFT) सारख्या नामांकित संस्था जागतिक दर्जाचे शिक्षण देतात. बी.डिस. (B.Des) पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, कला आणि व्यवसाय यांचा सुवर्णसंगम शिकवला जातो. ॲपल, गुगल आणि टाटा यांसारख्या कंपन्या आता इंजिनिअर्सपेक्षा 'डिझाइन थिंकर्स'ला अधिक महत्त्व देत आहेत.

**निष्कर्ष-**

जर तुम्हाला चौकटीबाहेरचा विचार करायला आवडत असेल, तर मेंढपाळांच्या शर्यतीत सामील होऊन साध्या पदव्यांमागे धावण्यापेक्षा 'बॅचलर ऑफ डिझाइन' निवडा. लक्षात ठेवा, यंत्रे केवळ गणना करू शकतात, पण नवनिर्मिती केवळ मनुष्यच करू शकतो. सर्जनशील करिअर हेच खऱ्या अर्थाने 'AI प्रूफ' करिअर आहे.

**व्हिज्युअल कम्युनिकेशन: सर्जनशीलतेच्या नवनवीन वाटा**

डिझाइन क्षेत्रात केवळ फॅशन किंवा इंटिरिअर नाही, तर 'कम्युनिकेशन डिझाइन' (Communication Design) अंतर्गत अनेक आधुनिक करिअर पर्याय उपलब्ध आहेत. जेव्हा जग डिजिटल होत आहे, तेव्हा माहिती मांडण्याची पद्धत सर्वात महत्त्वाची ठरत आहे.

**१. UI/UX डिझाइन** (User Interface User Experience):-

आज आपण वापरत असलेले प्रत्येक प किंवा वेबसाईट ही 78 डिझाइनरची कमाल आहे. तंत्रज्ञान आणि मानवी गरजांचा मेळ घालून डिजिटल अनुभव सुखकर बनवण्याचे काम हे डिझाइनर करतात. Interaction Design Foundation च्या मते हे क्षेत्रातील सर्वात जास्त मानधन देणाऱ्या नोकऱ्यांपैकी एक आहे.

**२. ग्राफिक आणि व्हिज्युअल डिझाइन** (Graphic Visual Design):-

ब्रँडिंग, जाहिराती आणि सोशल मीडिया पोस्ट्सच्या माध्यमातून प्रेक्षकांशी संवाद साधण्याचे काम ग्राफिक डिझाइनर्स करतात. केवळ सॉफ्टवेअर चालवणे म्हणजे डिझाइन नाही, तर रंगांचा वापर आणि मांडणीतून संदेश प्रभावीपणे पोहोचवणे ही एक कला आहे.

**३. आयडेंटिटी आणि इन्फॉर्मेशन डिझाइन** (Identity Information Design):-

एखाद्या कंपनीची ओळख (Logo) निर्माण करणे म्हणजे 'आयडेंटिटी डिझाइन'. तसेच, क्लिष्ट माहिती सोप्या आणि आकर्षक स्वरूपात मांडणे म्हणजे 'इन्फॉर्मेशन डिझाइन'. डेटा व्हिज्युअलायझेशनच्या युगात या तज्ज्ञांची मोठी गरज आहे.

**४. निमेशन, फिल्म आणि व्हिडिओ डिझाइन** (nimation, Film Video):-

मनोरंजन क्षेत्रात क्रांती घडवणारे हे क्षेत्र आहे. चित्रपट, जाहिराती आणि गेमिंग इंडस्ट्रीमध्ये कथा सांगण्यासाठी (Storytelling) निमेशन आणि व्हिडिओ डिझाइनचा वापर होतो. AI व्हिडिओ बनवू शकत असले तरी, त्यातील मूळ भावना आणि 'दिग्दर्शन' हे मानवी कल्पकतेशिवाय अपूर्ण आहे.

हे सर्व करिअर मार्ग केवळ तांत्रिक कौशल्यावर आधारित नसून ते मानवी बुद्धिमत्तेचे दर्शन घडवतात. त्यामुळेच, पारंपरिक कोडिंगच्या नोकऱ्यांवर गदा आली तरी, या सर्जनशील क्षेत्रातील मागणी दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे.

**विशेष**


**विजय पांढरीपांडे**

**परीक्षा जवळ आल्या आहेत. हे दिवस अभ्यासाचे, खरे म्हणजे अभ्यासाच्या उजळणीचे आहेत. कारण प्रत्येक विद्यार्थ्याने वर्षभर नियमित अभ्यास करणे अपेक्षित असते. आजकाल सारख्या टेस्ट होत असतात शाळा- महाविद्यालयात. त्यामुळे ज्यांना अभ्यासाचे, परीक्षेचे गांभीर्य माहिती आहे, ते विद्यार्थी टाळाटाळ न करता नियमित अभ्यास करतात. तरीही वार्षिक परीक्षा म्हटली की ताण असतोच. त्यातही १० वी १२ वीचे विशेष दडपण असते. कारण त्यावर पुढील भवितव्य, करीअर अवलंबून असते. या निकालावर पुढील अभ्यासक्रमाची दिशा ठरणार असते.**

# दिवस अभ्यासाचे, काय कसे करायचे?

परीक्षेचं हे दडपण न घेता परीक्षेची तयारी करणे ही प्राथमिक गरज आहे. कारण मला हवा तो अभ्यासक्रम मिळेल की नाही, हव्या त्या संस्थेत प्रवेश मिळेल की नाही, या काळजीत राहिले की त्याचा परिणाम मन:स्थितीवर पर्यायाने अभ्यासावर होणारच. तेव्हा पुढचा फारसा विचार न करता, सध्या केवळ परीक्षेवर, अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. ज्या संकल्पना नीट समजल्या नाहीत, त्यावर आधी भर द्यावा. खरे तर कठीण, सोपे असे काहीच नसते. कठीणदेखील पाठपुरावा करून सोपे करता येते. त्यासाठी वर्गातल्या दुसऱ्या मुलांची, शिक्षकांची, पालकांची मदत घेता येते. आपल्याला जे समजले नाही, ते दुसऱ्या योग्य व्यक्तीकडून समजून घेतले की, सोपे होते. आपल्याला जे सोपे वाटले, नीट समजले, ते दुसऱ्याला समजावता येते. त्याने आपलीही उजळणी होते. उत्तरे लिहिताना आधी प्रश्न नीट समजून घेणे गरजेचे असते. त्यासाठी आधी संपूर्ण प्रश्न पत्रिका नीट वाचा. त्यातील आपल्याला सोपे वाटतात ते प्रश्न आधी सोडवा. त्यामुळे लिहितानाच तुचा आत्मविश्वास वाढेल. त्याचा फायदा अप्रत्यक्षपणे कठीण प्रश्न सोडवताना होतो. प्रश्नात नेमके काय विचारले आहे, ते नीट जाणून घ्या अन् तेवढेच मोजक्या शब्दांत, पण पूर्णपणे लिहा. कुठलाही मुद्दा सुटता कामा नये. उत्तर पाल्हाळीक नको. अक्षर सुस्पष्ट हवे. हवे तिथे, मुद्दा संपला की परिच्छेद बदला. लेपींळर्पीी लिहू नये. काही महत्त्वाचे शब्द, मुद्दे अधोरेखित करायला हरकत नाही. ते परीक्षकांच्या डोळ्यात भरतात. तुम्हाला समजले, हे त्यांनाही समजते. गुण व्यवस्थित मिळतात. विज्ञान, गणित किंवा तत्सम विषयात फिगर, चित्रं, रेखाटने काढावी लागतात. ती देखील सुस्पष्ट अन् बोलकी हवीत. आवश्यक ती सर्व माहिती त्या फिगरमध्ये, चित्रात हवी. चित्र डोळ्यात भरले पाहिजे. ते उत्तराशी सुसंगत असेल पाहिजे, पूरक असले पाहिजे.

गणित सोडविताना सर्व स्टेप्स एका पाठोपाठ यायला हव्यात. पाठ केलेले जसेच्या तसे न उतरवता, लॉजिकली लिहावे. हेच तत्त्व भाषेच्या पेपरला लागू होते. वर्णनात्मक उत्तर लिहितानादेखील मुद्देसूद लेखन हवे. विषयांतर करू नये. विचारले एक अन् आपण लिहितोय् भलतेच असे गाडी रुळावरून घसरल्यासारखे व्हायला नको. अभ्यास करताना, वाचताना, या भागावर काय प्रश्न अपेक्षित असू शकतात, याचा विचार करावा. त्यासाठी बोर्डाचे आधीचे पेपर बघावे. त्यात कोणते प्रश्न नेहमी रीपिट होतात, कोणत्या भागावर नेहमी सारखे प्रश्न विचारले जातात, याचा अभ्यास केला, नोंद ठेवली, तर तयारीसाठी त्याचा चांगला उपयोग होतो. खरे तर मागचे पेपर पाहून या वर्षीचा पेपर कसा असेल, याचा अंदाज घेता येतो. आजकाल संभाव्य प्रश्नांची यादीच आधी प्रसिद्ध होत असते. मार्गदर्शक म्हणूनही त्याचा



उपयोग करता येतो. पण तेवढाच अभ्यास करायचा, त्याच प्रश्नांची तयारी करायची असा जुगारही खेळायला नको! अभ्यास करताना काहीही सोडू नये. कठीण भागाचीदेखील उजळणी करावीच. कारण केव्हा काय उपयोगी येईल सांगता येत नाही. कठीण प्रश्नाचा सामना करताना, सर्वच बरोबर नाही, तरी काहीतरी सुसंगत उत्तर तुम्ही देऊ शकाल, या तयारीने अभ्यास करावा. उत्तरे लिहिताना ती ठोकळेबाज पद्धतीने न लिहिता, तुचे स्वत:चे असे खास वैशिष्ट्य दाखविणारी असली तर त्याचे देखील परीक्षकावर छान इम्प्रेशन पडते. मग एखादी चूकदेखील दुर्लक्षित केली जाऊ शकते. प्रश्नाला पूरक असेच उत्तर लिहिणे, मुद्देसूद, विषयाला धरून तेवढेच लिहिणे, स्वत:ची वेगळी शैली उत्तरातून प्रतिबिंबित होणे, लिहिलेले एकदा तरी तपासून चुका असल्यास दुरुस्त करणे हे सारे यशासाठी, म्हणजेच उत्तम गुण मिळवण्यासाठी महत्त्वाचे असते.

शेवटी यश-अपयश या रीलेटिव्ह टर्म्स आहेत. भरपूर टक्केवारी म्हणजे ९०-९५ टक्के मिळविणारे हुशार, म्हणजे बुद्धिमान असतातच असे नाही. तरी या टक्केवारीवर पुढचे प्रवेश अवलंबून असतात हे कटु सत्यही नाकारता येत नाही. आपले गुण अन् आपली गुणांची टक्केवारी हेदेखील परस्परांना पूरक असले पाहिजे. तरच आपण पुढे स्पर्धेत टिकून राहू शकू. म्हणजेच विषयाचे आकलन, संकल्पनांची समज, स्वतंत्र विचार करण्याची कुवत जास्त महत्त्वाची. आपण एखादा विषय शिकतो तो कशासाठी, त्याचा नेका कुठे, काय उपयोग होतो, त्यातल्या कठीण संकल्पना कोणत्या, सोप्या कोणत्या, त्यामागे तर्क काय, कोणत्या समस्या सोडविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो या गोष्टींचा विचार अभ्यास करताना केला की सगळे सहज सोपे होत जाते. एरवी तेच क्लिष्ट, कठीण, रटाळ वाटायला लागते. अभ्यासाचे ओझे न वाटता, अभ्यास करताना मजा वाटली पाहिजे. आनंद मिळाला पाहिजे.य ाच आनंदाचे रूपांतर पुढे परीक्षेतील यशात निश्चित होते, याचा विश्वास बाळगा. यश तुचेच आहे.

अभ्यास केव्हा करावा असाही प्रश्न विचारला जातो. याचे उत्तर तुच्या सोईने, आवडेल तेव्हा केव्हाही करावा असेच आहे. अर्थात त्यासाठी एकाग्रता हवी. चित्त स्थिर हवे म्हणजे झाले. पहाटे उठून शांत वातावरणात अभ्यास करणे केव्हाही चांगले. अनेकांना रात्रीच्या जागरणाचा त्रास होतो. त्यांनी पहाटे उठून अभ्यास करावा. ज्यांना पहाटे उठण्याचा कंटाळा येतो त्यांनी दिवस, रात्री उशिरा अभ्यास करावा. सराव प्रश्नांची उत्तरे ठरावीक वेळेत लिहून काढण्याची देखील प्रॅक्टिस करावी. ही उत्तरे दुसऱ्याकडून, मित्र, शिक्षकाकडून तपासून घ्यावीत. कोणत्या प्रश्नाला किती वेळ द्यायचा, ठरावीक वेळेत सर्व प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित, अचूक कशी लिहायची, याचादेखील सराव केला तर प्रत्यक्ष परीक्षेत सोपे जाईल. थोडक्यात कसलेही दडपण मनात न बाळगता, आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा. आताच पुढचा विचार करून ताण घेऊ नका. यश तुचेच आहे. ते निश्चित मिळणारच, याची खात्री असू द्या. बेस्ट ऑफ लक!